म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : नाटक
दा. क्र. : २२६८५

IRBK-0122684

२२९८४
नाटक

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. २२९८४ नों. दि. [illegible]
वि. नाटक क्र. ..........

# कौंतेय

## कुसुमाग्रज ऊर्फ वि. वा. शिरवाडकर यांची ग्रंथसंपदा

### नाटके

दूरचे दिवे, दुसरा पेशवा, कौंतेय, वैजयंती, राजमुकुट, ऑथेल्लो, आमचं नाव बाबूराव, ययाती आणि देवयानी, वीज म्हणाली धरतीला, नटसम्राट, विदूषक, बेकेट, एक होती वाघीण, मुख्यमंत्री, चंद्र जिथे उगवत नाही.

### एकांकिका

दिवाणी दावा, देवाचे घर, नाटक बसते आहे.

### काव्यसंग्रह

जीवनलहरी, विशाखा, समिधा, किनारा, मेघदूत, मराठी माती, हिमरेषा, वादळवेल, रसयात्रा, छंदोमयी.

### कादंबऱ्या

वैष्णव, जान्हवी, कल्पनेच्या तीरावर.

### कथासंग्रह

फुलवाली, सतारीचे बोल, काही वृद्ध काही तरुण, प्रेम आणि मांजर, बारा कथा, अपॉइंटमेण्ट.

### ललित लेख

आहे आणि नाही, विरामचिन्हे, एकाकी तारा, प्रतिसाद.

# कौंतेय

## वि. वा. शिरवाडकर

IRBK-0122684

कॉन्टिनेन्टल

कॉन्टिनेन्टल प्रकाशन
पुणे ३०

प्रकाशक : अनंत अंबादास कुलकर्णी
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे ३०

पुनर्मुद्रण : एस. एस. सहस्रबुद्धे
बालोद्यान प्रेस नानूबाग, पुणे २

प्रकाशन क्रमांक : ४४७

©

सर्व हक्क सुरक्षित

आवृत्ती पहिली : १९५३
पुनर्मुद्रिते : १९६४, १९६५, १९६६,
१९६८, १९७०, १९७३, १९८३.

किंमत पाच रुपये

नाटकाच्या प्रयोगाच्या हक्कासंबंधी विनंती

या नाटकाचा, कोणत्याही स्वरूपाचा आणि कोणत्याही कारणासाठी, प्रयोग करावयाचा असल्यास, लेखकाची आगाऊ लेखी परवानगी घेणे कायद्याने आवश्यक आहे. प्रत्येक प्रयोगाचे शुल्क रु. ५० असून ते परवानगी मागतानाच पाठवावे.

पत्ता : वि. वा. शिरवाडकर, पटेल कॉलनी
शिवाजी पथ, नासिक १

# पहिल्या आवृत्तीचे प्रास्ताविक

कर्णाचे जीवन हा महाभारतातील एक अत्यंत नाट्यानुकूल असा विषय आहे. मराठीमध्ये आतापर्यंत तीन-चार लहानमोठी नाटके कर्णाच्या चरित्रावर लिहिली गेली आहेत. आज त्यांत आणखी एका नाटकाची भर पडत आहे. नाटकाच्या दृष्टीने कोणताही नाट्यपूर्ण विषय कधी जुना होऊ शकत नाही. त्यातील नाट्यातच त्याचे चिरस्थायी नावीन्य भरलेले असते.

पहिल्या बाजीरावाप्रमाणेच कर्णाच्या चरित्रातील शोकान्त नाट्याचेही गाढ आकर्षण मला कित्येक वर्षांपासून वाटत आले आहे. त्या आकर्षणातूनच या नाटकाचा जन्म झाला आहे. हे नाटक म्हणजे समग्र 'कर्णपर्व' नव्हे. कर्ण आणि कुंती यांच्यातील संबंधाचे सूत्र घेऊन त्यावरतीच नाटकाची उभारणी करण्यात आली आहे.

माझ्या पूर्वीच्या नाटकांप्रमाणे हे नाटकही मुंबई येथील मराठी साहित्य संघाच्या नाट्यशाखेतर्फे रंगभूमीवर येत आहे. संघाने उभारलेल्या नाट्यगृहात होणाऱ्या पहिल्याच नाट्योत्सवात हे नाटक रंगभूमीवर येत आहे हे त्या नाटकाचे व लेखकाचेही मोठे भाग्य होय.

नाट्यशाखेच्या सर्वच कार्यकर्त्यांनी, विशेषतः डॉ. भालेराव व श्री. अंधृटकर यांनी प्रारंभापासून या नाटकासाठी अपरिमित श्रम घेतले आहेत. श्रीमती दुर्गाबाई खोटे यांनी दिग्दर्शनाची जबाबदारी स्वीकारून आपल्या अभिजात नाट्यकलेचा या नाटकास लाभ करून दिला आहे. या सर्वांचे आणि पहिल्या प्रयोगात भूमिका करणाऱ्या सर्व नटवर्गाचे मी हार्दिक आभार मानतो.

जानेवारी ५, १९५३ — वि. वा. शिरवाडकर

या नाटकाचा पहिला प्रयोग मुंबई मराठी साहित्य संघाच्या नाट्यशाखेच्या विद्यमाने वार्षिक मराठी नाट्योत्सवाच्या मंडपात मंगळवार दि. ६ जानेवारी १९५३ रोजी रात्री ९ वाजता झाला. पहिल्या प्रयोगात भूमिका करणारांची नावे :

| | | |
|---|---|---|
| कर्ण | ... | मा. दत्ताराम |
| दुर्योधन | ... | शंकरराव भोसले |
| शल्य | ... | सुकुमार |
| कृपाचार्य | ... | भानप |
| त्रिगर्त | ... | हिंदळेकर |
| जांघिल | ... | पाटील |
| शकुनी | ... | केळुस्कर |
| भीम | ... | दाजी भाटवडेकर |
| अर्जुन | ... | बाबा नाईक |
| नकुल | ... | देवधर |
| सैनिक | ... | घारपुरे |
| माधवी | ... | कुसुम आठवले |
| वासंतिका | ... | सरोज पटवर्धन |
| कुंती | ... | दुर्गाबाई खोटे |

दिग्दर्शन : दुर्गाबाई खोटे

दा. क्र. २२६८४ नों. दि. ३१.८.१८
कि. ०१-१२०१

# अंक पहिला

## प्रवेश पहिला

[ रात्रीचा प्रारंभकाल. दुर्योधनाचे राजमंदिर. समोर मध्यभागी रिकामे सिंहासन, डाव्या हाताच्या पहिल्या आसनावर कृपाचार्य बसले असून दोन्हीकडील इतर आसनांवर शल्य, त्रिगर्ताधीश वगैरे राजे व मानकरी बसलेले आहेत. ]

**कृपाचार्य :** परमेश्वराची कृपा म्हणून आज सूर्य अस्ताला गेला !

**त्रिगर्त :** सूर्य रोजच अस्ताला जातो ! सूर्यास्तात ईश्वराची कृपा असेल तर प्रत्येक सायंकाळी हे सोनेरी वरदान जगाला लाभत असतं !

**कृपाचार्य :** रोज घडणाऱ्या गोष्टींची महती माणसाला एखाद्या दिवशीच कळून येते. सूर्यास्ताचं महत्त्व आजच्याइतकं कौरवांना कधीच वाटलं नसेल. आज सूर्यास्तानंच कौरवांना वाचवलं. संपूर्ण पराभवाच्या जबड्यातून त्यांची सुटका केली !

**त्रिगर्त :** म्हणजे सूर्य कौरवांच्या पक्षाला आहे.

**शल्य :** होय, कारण सूर्यपुत्र म्हणून ज्यांचं संकीर्तन केलं जातं ते कर्णमहाराज कौरवांच्याच पक्षात आहेत !

**कृपाचार्य :** सूर्य कौरवांचा पाठीराखा असेल, पण जिच्या स्वामित्वासाठी हे युद्ध सुरू झालं आहे ती पृथ्वी मात्र पांडवांचा कैवार घेत आहे !

**त्रिगर्त :** पृथ्वी पांडवांचा कैवार घेत आहे ?

**कृपाचार्य :** पृथ्वी पांडवांच्या पक्षाची नसती तर भीष्म-द्रोणांसारख्या अलौकिक वीरांच्या पराक्रमाची आणि शरीराची अशी माती झाली नसती ! भीष्माचार्य सेनानायक असतांनाच कौरव विजयी होतील अशी आमची श्रद्धा होती. पण भीष्माचार्य गेले आणि आज-आज द्रोणाचार्यहि गेले. कौरवांच्या शिबिरातील सारं ब्रह्मतेज आज विलयाला गेलं !

**त्रिगर्त :** महाराज, आपणच हे म्हणता आहात म्हणून ठीक आहे. नाहीतर कृपाचार्य हातांत शस्त्र धारण करीत असताना कौरवांच्या शिबिरातील ब्रह्मतेज विलयाला गेलं असं म्हणण्याची कुणाचीही प्राज्ञा होणार नाही !

**कृपाचार्य :** दोन श्रेष्ठांची कर्तबगारी जिथे अपुरी पडली तेथे माझ्या ब्रह्मतेजाचा काय पाडाव लागणार ? या युद्धाचा शेवट कसा होणार याची मला धास्ती वाटू लागली आहे !

**त्रिगर्त :** द्रोणाचार्यांवर आज मात केली ती पांडवांच्या पराक्रमानं नव्हे, तर अधर्मानं !

**कृपाचार्य :** आजच्या युगात अधर्मच धर्मापेक्षा अधिक बलवान ठरत आहे !

**त्रिगर्त :** (अधर्माला एखादी लढाई जिंकता येईल, पण युद्ध जिंकता येणार नाही !)(विनाशाच्या मार्गावर अधर्माच्या मोहक कमानी उभारलेल्या असतात.(पाप ओठाला अमृतासारखं वाटलं तरी पोटात पोहोचेपर्यंत त्याचं विष झाल्याशिवाय राहात नाही !) द्रोणाचार्यांचा नीचपणानं वध करून पांडवांनी जो अधर्माचा डोंगर रचून ठेवला आहे त्याच्याखालीच ते चिरडून जाणार आहेत !

**शल्य :** आचार्यांच्या मृत्यूनं कौरवांचं अपार नुकसान झालं आहे यात शंकाच नाही. परंतु आचार्य गेले तरी युद्ध संपणार नाही ! कर्णासारखे जगद्‌विख्यात धनुर्धारी, कृप-त्रिगर्तांसारखे अतिरथी— महारथी, दुर्योधन— दुःशासनासारखे असामान्य गदाधारी आपल्या शिबिरात असताना पराभवाची धास्ती वाटण्याचं कारण नाही !

**त्रिगर्त :** सर्वांचा पराक्रम आता सेनानायक कोण होणार यावर अवलंबून आहे.

**शल्य :** तोच प्रश्न आहे ! आता कौरवेश्वर आल्यावर याच प्रश्नाचा विचार व्हायचा आहे.

**त्रिगर्त :** कर्ण ?

**शल्य :** कर्ण ? ते सर्वस्वी अशक्य आहे ! महाराजांच्या मनात काहीहि असलं तरी राजे आणि रथकार यांच्यांतील अंतर ते ओळखल्याशिवाय राहाणार नाहीत !

**त्रिगर्त :** हा अधिकार आचार्यांचा आणि क्षत्रियांचा आहे. मला वाटतं, उद्याचे सेनापती म्हणून महाराज कृपाचार्यांचंच नाव जाहीर करतील.

**शल्य :** त्यांचाच अधिकार आहे तो !

**कृपाचार्य :** मला या सन्मानाची आकांक्षा नाही.

**त्रिगर्त :** हा प्रश्न केवळ आपल्या सन्मानाचा नसून आमच्या स्वाभिमानाचाही आहे ! उद्याच्या सेनापतीला या त्रिगर्ताचा पहिला प्रणाम असो !

[ आत शिंगांचा आवाज. वेत्रधारी प्रवेश करतो. ]

**वेत्रधारी :** राजाधिराज कौरवेश्वर, अंगाधिपति कर्णराज—

[ दुर्योधन, कर्ण व काही इतर मानकरी प्रवेश करतात. सर्वजण दुर्योधनास उत्थापन देतात. मध्यभागी असलेल्या उच्चासनावर दुर्योधन बसतो. त्याच्या उजव्या हाताच्या आसनावर कर्ण बसतो. ]

**मानकरी :** महाराजाधिराज सम्राट् दुर्योधन महाराजांचा जयजयकार असो ! त्रिवार जयजयकार असो ! !

**दुर्योधन :** माझ्या पराक्रमी बांधवांनो, राजमित्रांनो आणि कौरवांच्या दरबारांतील शूर मानकऱ्यांनो, भारताच्या सर्वश्रेष्ठ सिंहासनावर बसलेला हा दुर्योधन आपणा सर्वांच्या मित्रत्वाचा बंदिवान आहे. विजयाचा मार्ग पराभवातूनच जात असतो. वीरांच्या पराक्रमाचं तेज पराभवानं वाढतं मात्र. गुरुवर्यांच्या वधामुळे आपल्यातील एक अग्रगण्य सेनानी आज नाहीसा झाला आहे. पण निराश होण्याचं कारण नाही. द्रोणाचार्यांच्या वधानं हेच सिद्ध झालं आहे की पांडवांचा आपल्या क्षात्रतेजावर विश्वास नाही. भीतिग्रस्त होऊन ते अधर्माचा, भेकड मार्गाचा अवलंब करीत आहेत. परंतु यातच त्यांचं मरण आहे. आपणा सर्वांना वंदनीय असलेले दोघेही आचार्य आज आपल्यातून नाहीसे झाले आहेत हे आपलं दुर्दैव होय ! परंतु हे दुर्दैव आपल्या पराक्रमाच्या आड येता कामा नये. श्रेष्ठ आदर्शांच्या रक्षणासाठी, थोर ध्येयाच्या साधनेसाठी, द्यावी लागणारी किंमत आहे ही ! परंतु माझी श्रद्धा आहे की आज

द्रोणाचार्यांचं जीवनार्घ्य घेऊन गेलेला सूर्य उद्या कौरवांसाठी अंतिम विजयाचं वरदान घेऊन आल्याशिवाय राहाणार नाही ! सारी धर्मनीति झुगारून अधर्म मार्गानं द्रोणाचार्यांचा खून पाडणाऱ्यांच्या रक्तानं कुरुक्षेत्राचं रणमैदान भिजवल्याशिवाय आम्ही राहाणार नाही.

**मानकरी :** सूड ! आचार्यांच्या खुनाचा सूड !– कौरवांचा विजय होवो– कौरवेश्वराचा विजय असो !

**दुर्योधन :** विजयश्रीनं जर अखेर पांडवांच्या गळयात माळ घातली, तर विजयश्री ही सत्याची व नीतीची सहचरी नसून रानटीपणाची आणि आडदांड कौटिल्याची रखेली आहे असंच आपल्या पुत्रपौत्रांना मानावं लागेल ! पण नाही, असं होणार नाही ! कधीही होणार नाही ! कौरवांच्या–आणि होय, सत्याच्याही पराभवाला मर्यादा आहे ! धर्म, नीति आणि सत्य या गोष्टी जर परमेश्वराच्या घरी प्रिय आणि रक्षणीय असतील, धर्मभ्रष्ट, कुटिल आणि असंस्कृत गवळ्यांच्या टांचेखाली या समाजाचा चुराडा होऊ नये अशी जर त्याची इच्छा असेल, भरतखंडाची प्रतिष्ठा अजिंक्य ठेवणारी सिंहासनं जमीनदोस्त होऊ नयेत असं जर त्याला वाटत असेल, तर कौरवांच्या पक्षालाच आपला पाठिंबा देण्यावाचून खुद्द परमेश्वरालाही गत्यंतर नाही ! मित्रहो, महायुद्धाचा हा दावानळ दुर्योधनाच्या हौसेसाठी भडकलेला नाही. कौरवांच्या राज्यलोभासाठी नाही, की साम्राज्याच्या रक्षणासाठी नाही. रास्त हक्कासाठीं मी अर्ध्याच काय, साऱ्या साम्राज्यावर तुळशीपत्र ठेवायला तयार आहे. परंतु पांडव केवळ भाऊबंदकीच्या हक्कानं येत नाहीत. अनार्यांच्या, शूद्रांच्या, कोळी–कुणब्यांच्या आणि गवळ्यांच्या हीन संस्कृतीचा परिवार घेऊन ते येत आहेत ! ते स्वतः धर्मभ्रष्ट, नीतिभ्रष्ट आहेत आणि म्हणून भारतातील पाखंड्यांनी त्यांना हाताशी धरून हस्तिनापूरच्या साम्राज्यात हा भाऊबंदकीचा तमाशा उभा केला आहे. आमच्या पाठीशी सत्य आहे, नीति आहे; तर पांडवांच्या पाठीशी मथुरेचे माजलेले सांड आहेत. गोकुळचे बदफैली गवळी आहेत ! दुर्दैवानं पांडवांचा विजय झाला तर हस्तिनापूरच्या राजदरबारात वृंदावनच्या गोपगोपींची रासक्रीडा सुरू होईल. भारतांत प्रत्येक सिंहासनावरून पाखंडी गीतांचं प्रवचन होईल ! गवळी ! गवळी ! तो कुटिल, उनाड, माजोरा गवळी ! कंसाच्या वधानं सुरू केलेलं कार्य कौरवांच्या निःपातानं त्याला

पुरं करायचं आहे ! ज्या अधर्मानं त्याचं चरित्र भरलेलं आहे त्या अधर्माचा त्याला धर्म करायचा आहे ! आणि हे सारं सफल होण्यासाठी, भारतातील सनातनी राजवाडे बेचिराख करून त्याला सर्वत्र शूद्रांची सत्ता प्रस्थापित करायची आहे ! म्हणून, बंधूंनो, हा लढा कौरव–पांडवांचा नाही, दुर्योधन – युधिष्ठिरांचा नाही, तर सत्याचा आणि असत्याचा आहे; संस्कृतीचा आणि रानटीपणाचा आहे ! आणि म्हणून विजय मिळविल्यावाचून आपल्याला गत्यंतर नाही. कौरवांचा पराभव म्हणजे जे जे उदात्त आहे, उज्ज्वल आहे, सनातन आहे त्याचा पराभव——

**मानकरी :** नाही, आम्ही पराभूत होणार नाही ! कौरवांचा विजय होईल !

**दुर्योधन :** माझ्यामध्ये अनेक दोष असतील, मी मान्य करतो. सद्‌गुणांचे मुखवटे लावून पापकृत्य करण्याचं धर्मराजाचं कौशल्य माझ्याजवळ नाही ! मी उद्दाम असेन, आततायीही असेन. भावनावेगानं करू नये ते केलं असेल, बोलू नये ते बोललो असेन. पण अंतराळातील साऱ्या देवतांना साक्षी ठेवून सांगतो की, दुर्योधन कधी अधर्मानं वागला नाही. द्रोणाचार्यांचा नीचपणानं खून झाल्यानंतर मला कित्येकांनी सांगितलं की, धर्मयुद्धाच्या परंपरा बाजूला ठेवून आपणही आज मध्यरात्री पांडवांच्या शिबिरावर हल्ला करावा. आणि साऱ्या वैऱ्यांची बायकामुलांसकट कत्तल करावी ! पण अशा अधम कल्पनांचा मी कधीही विचार करणार नाही ! भावी इतिहासकार माझ्या नावाची नोंद काय करतील ती करोत. इतिहास हा जेत्यांचा खुषमस्कऱ्या आणि पराभूतांचा निंदक असतो. पण आपणा सर्वांच्या रूपानं माझ्यासमोर उभा असलेला हा वर्तमान जर मला ग्वाही देईल की, कौरवांचा पक्ष हाच सत्याचा पक्ष आहे——

**मानकरी :** कौरवांचा पक्षच सत्याचा आहे ! पांडव अधर्मी आहेत ! कौरवच धर्माचे पाठीराखे आहेत !

**दुर्योधन :** हेच माझं समाधान आहे ! हेच माझं सामर्थ्य आहे ! दुर्योधन आपल्या सामर्थ्यानं उन्मत्त झाला आहे असा डंका माझे शत्रू सर्वत्र वाजवीत आहेत. होय. खरं आहे ते ! हजारदा खरं आहे ! पण हे सामर्थ्य दुर्योधनाच्या बाहूंमध्ये नाही. शंभर कौरवांच्या शस्त्रांमध्ये नाही. ते आपणा सर्वांच्या अंतःकरणात आहे ! जे समवयस्क आहेत त्यांच्या स्नेहात आहे, जे वडील-

धारे आहेत त्यांच्या आशीर्वादात आहे. भीष्माचार्य आणि द्रोणाचार्य यांच्या नेतृत्वाखालीच आम्हाला विजय मिळेल असं आम्ही मानीत होतो. पण ते झालं नाही. का झालं नाही याची चिकित्सा मी या घटकेला करीत नाही. ती न करणंच बरं ! भूतकाळ दृष्टीआड करून आपल्याला भविष्यकाळाचं स्वागत करायचं आहे. द्रोणाचार्यांनंतर कौरव पक्षाचं नेतृत्व कोणाकडे द्यावं याचा विचार मी केला आहे आणि तोच मला इथं जाहीर करायचा आहे. विचार केला म्हणून म्हटलं खरं, परंतु खरोखर विचार करण्याचं कारणच नव्हतं. उदयाचलावर प्रकट होणाऱ्या दिवसाचं नेतृत्व सूर्य करणार हे जितकं स्वयंसिद्ध, तितकंच कौरवांचं नेतृत्व उद्या कोण करणार हेही निश्चित व स्वयंसिद्ध आहे. माझ्या उजव्या हाताला बसलेले माझे परमप्रिय मित्र, कौरवांचे थोर पाठीराखे, भरतखंडातील सर्वश्रेष्ठ धनुर्धारी, अंगाधिपती कर्णराज, हेच आजपासून कौरव पक्षाचे आणि आपल्याला मिळणाऱ्या विजयाचे नेते होत !

[ दरबारात विशेषतः राजमंडळात एकदम आश्चर्याचे उद्गार निघू लागतात. कर्ण ? कर्णराज सेनापती ? कर्णाकडे नेतृत्व ? — अशी कुजबूज सुरू होते— दुर्योधन चकित होऊन क्षणभर स्तब्ध राहातो. ]

**दुर्योधन :** माझ्या तोंडून उद्याच्या सेनापतीचं नाव बाहेर पडताच, त्याच्या नावाचा सारेजण एकमुखानं जयजयकार करतील असं वाटलं होतं मला ! पण आपल्यापैकी कित्येकांना आश्चर्य वाटल्यासारखं दिसत आहे. आश्चर्य आहे ! आपल्याला आश्चर्य वाटावं हेच खरोखर आश्चर्य आहे ! पण मला वाटतं आपला काहीतरी गैरसमज झाला आहे ! सेनापतीच्या पदासाठी मी कुणाचं नाव घेतलं म्हणून आपण समजता ? मी कर्णाचं नाव घेतलं ! माझ्या उजव्या हाताला बसलेल्या या नरसिंहाचं, भारतातील श्रेष्ठ वीराग्रणीचं, प्रारंभापासून कौरवांची पाठराखणी करणाऱ्या या उदार, पराक्रमी अंगाधीशाचं ! अजून आपण स्तिमित झालेले दिसत आहात ! का? कौरवेश्वराचा जयजयकार करणाऱ्या साऱ्या जिभा एकदम गप्प का झाल्या ? कुरुक्षेत्रावरील कौरवपक्षाचा सेनानायक म्हणजे खुद्द कौरवेश्वरालाही आज्ञा करणारा ! इथे जमलेल्या साऱ्या राजांचे, मांडलिकांचे आणि मानकऱ्यांचे

नेतृत्व करणारा ! त्याचं नाव जाहीर होताच त्याच्या नावाचा जयजयकार आपण सर्वांनी करायला पाहिजे ! करा, आनंदानं उत्साहानं जयघोष करा ! अंगाधिपती कर्णराजाचा, कौरवपक्षाच्या नव्या सेनापतीचा जयजयकार करा ! करा !

[ सर्व सभा शांत राहते. कोणीच काही बोलत नाही, समोर असलेले शल्यादी राजे खाली माना घालून स्वस्थ बसतात. ]

**दुर्योधन** : काय ? सेनापतीच्या नावाचा जयघोष करायला कोणीही तयार नाही ? कौरवेश्वर म्हणून मी आपल्याला आज्ञा करतो, – आपला सहकारी म्हणून आपल्याला विनंती करतो, की सभेत बसलेल्या साऱ्या नृपालांनी व सरदार-मानकऱ्यांनी कर्णाला उत्थापन देऊन त्याच्या नावाचा जयजयकार करावा ! करा !—

**जांघिल** : ( उठून उभा राहून एकटाच तारस्वरात ओरडतो ) अंगाधिपती कर्ण महाराज यांचा जयजयकार असो ! त्रिवार जयजयकार असो ! !

**दुर्योधन** : ( अनावर संतापाने ) कर्णाच्याच एका सेवकाखेरीज, या जांघिला-खेरीज, त्याच्या नावाचा जयजयकार करायला कोणीही तयार नाही ? हा अपमान आहे. केवळ कर्णाचाच नव्हे तर कौरवेश्वराचाही अपमान आहे ! हस्तिनापुराच्या सिंहासनाचा अपमान आहे हा !

[ शल्य हलके उठून उभा राहतो व सभोवार दृष्टिक्षेप टाकतो. आपणा सर्वांच्या वतीनं मी बोलू का — हा प्रश्न त्या दृष्टिक्षेपात अभिप्रेत असतो. नंतर दुर्योधनाकडे पाहून तो संथपणे बोलू लागतो, त्याच्या स्वरात आवेश नाही; छद्मीपणा व आर्जव आहे. ]

**शल्य** : राजाधिराज, केवळ जयजयकाराच्या शब्दांनीच आपलं समाधान होणार असेल तर तो करायला आमची ना नाही ! परंतु ओठातून येणाऱ्या शब्दांना अंतःकरणाचा पाठिंबा नसेल तर त्या शब्दांची किंमत वाऱ्याच्या लहरीपेक्षा अधिक नाही ! आपण सम्राट आहात ! कुरुक्षेत्रावर पडलेल्या छावणीत जाऊन आपण जयजयकाराची आज्ञा दिली तर सारं आकाश जयघोषाच्या आवाजांनी दुमदुमून जाईल ! लोकांना ओरडायला लावणं फार सोपं आहे. गर्जना नेहमी लोकांच्या गळ्यापर्यंत येऊन बसलेल्या असतात ! मोहरेदार

शब्दांच्या चार उतरंडी रचल्या की आपल्याला हवे ते आक्रोश लोकांच्या गळ्यांतून बाहेर काढता येतात ! पण महाराज, या दरबारात लोक नाहीत, राजे आणि मानकरी आहेत ! आपण म्हणाल तर आम्हीही जयघोष करू. पण आमच्या शब्दांपेक्षा आमच्या अंतःकरणांची आपण अधिक कदर करावी अशी विनंती आहे. सेनापतीचं नाव जाहीर करण्यापूर्वी आपण सर्वांचा विचार घेतला असता तर दरबारात आपला आज्ञाभंग करण्याचं पातक आम्हांला करावं लागलं नसतं !

**दुर्योधन :** काय समजू मी या बोलण्याचा अर्थ ?

**शल्य :** कर्णराजांची थोरवी मी अमान्य करीत नाही. आम्ही कोणीही अमान्य करीत नाही ! अनेक आपत्तींतून मार्ग काढीत ते आज या उच्च पदावर अधिष्ठित झाले आहेत. ते थोर आहेत, प्रतापी आहेत आणि राजवल्लभही आहेत. आणि तरीसुद्धा भीष्माचार्य आणि द्रोणाचार्य यांच्यामागून कर्ण सेनापती व्हावेत हे आम्हाला साफ नामंजूर आहे !

**दुर्योधन :** साफ नामंजूर आहे !

**त्रिगर्त :** ( उठून आवेशाने ) साफ नामंजूर ! मद्रेश्वर शल्य राजांनी इथे बसलेल्या सर्व नृपाळांचं मनोगतच बोलून दाखविलं आहे. त्रिगर्तांचा राजा म्हणून मी सुद्धा सांगेन—एकदा नव्हे हजारदा सांगेन—कर्णाचं नेतृत्व आम्हांला साफ नामंजूर आहे ! राजाचं नेतृत्व राजेच करू शकतात, सूतपुत्र करू शकत नाहीत ! नृपाळाना आज्ञा करण्याचा अधिकार फक्त नृपाळाना किंवा आचार्यांना आहे. रथकारांना नाही !

**दुर्योधन :** (क्रोधाने) काय ? कौरवेश्वरानं निवडलेल्या सेनापतीचा असा अधिक्षेप ? आणि तोही कौरवांच्या दरबारात ?

**शल्य :** राजाधिराज, असे रागावू नका ! कौरव पक्षाचे आद्य अधिकारी या नात्यानं या प्रश्नाचा शांतपणानं विचार करण्याची जबाबदारी आपल्यावर आहे ! नव्या सेनापतीचं नाव जाहीर करण्यापूर्वी आपण विचार केला नाही म्हणून आपण म्हणालात. विचार केला नाही हेच खरं ! मला क्षमा करा, पण हा निव्वळ अविचार आहे ! मी पुन्हा सांगतो, कर्णराजांच्या मोठेपणाबद्दल कुणाचंही दुमत नाही. ते शूर आहेत, समर्थ आहेत, निष्ठावंत आहेत. एक कौरवपक्षाचा सेनानायक होण्यास एवढेच गुण पुरेसे होतात असं आम्हांला

वाटत नाही ! कौरव वेगळे आणि कौरवपक्ष वेगळा ! या दोहोंतील भेद राजेश्वरांनी लक्षात घेतला पाहिजे ! कौरवांच्या पक्षात केवळ कौरवांचे सरदार किंवा मांडलिक नाहीत. आपणच मघाशी म्हणालात त्याप्रमाणे हे युद्ध म्हणजे केवळ कौवरपांडवांतील भाऊबंदकीचं युद्ध नव्हे. तसं असतं तर भारतातील सर्व राजांना आपली सैन्यं घेऊन इथं येण्याचं काय कारण ? हे भारतीय युद्ध आहे ! प्रतिष्ठित आणि अप्रतिष्ठित यांच्यातील हा लढा आहे. आणि म्हणून प्रतिष्ठितांचा पुढारी प्रतिष्ठितच पाहिजे !

**कृपाचार्य :** मद्रेश्वर म्हणतात ते योग्यच आहे. हे भारतीय युद्ध आहे. अनेक खानदानी उच्च कुलांतील राजपुरुष, पहिल्या प्रतीचे क्षत्रिय, अनेक सिंहासनांचे स्वामी आणि वारसदार आज कौरवांचा कैवार घेऊन हस्तिनापूरला आले आहेत. या साऱ्या श्रेष्ठ कुलीन क्षत्रियांना कर्णाचं नेतृत्व मानवेल का ? नव्हे-का मानवावं ?

**दुर्योधन :** का मानवावं ? पांडवांचं निर्दालन केल्यावाचून आपणा सर्वांना गत्यंतर नाही म्हणूनच मानवावं !

**त्रिगर्त :** अस्सं ! एका कर्णाच्या सामर्थ्यावरच जर सम्राटांची एवढी श्रद्धा असेल तर इतरांच्या साहाय्याची त्यांनी अपेक्षा करू नये ! ठीक आहे. आजच्या रात्रीच या दरबारातील सारे नृपाळ स्वतःच्या सेना घेऊन आपापल्या देशाकडे कूच करतील ! दिवसा पांडवांच्या शस्त्रांचे आघात सोसायचे आणि रात्री कौरवांकडून अपमानित व्हायचं, हा कार्यक्रम फारसा सुखावह नाही !

**दुर्योधन :** ( भांबावून ) मित्रहो, माझ्या बोलण्याचा असा विपर्यास करू नका ! आपणा सर्वांच्या सहकार्यातच कौरवांचं सामर्थ्य आहे. आपला अपमान मी कसा करीन ?

**शल्य :** शब्दानं नाही, पण कृतीनं करीत आहात ! आम्हांला हे नाइलाजानं बोलावं लागत आहे. अंगराजांनी राग मानू नये. आणि खरोखर, राग मानण्याचं कारणही नाही. कमजात कुळात जन्म होणं हा काही त्या माणसाचा अपराध नव्हे ! मोराच्या पाठीशी रत्नाच्या पंख्यासारखा पिसारा असतो तर वटवाघळाच्या हिडिस आकाराकडे पाहून डोळे मिटून घ्यावेसे वाटतात ! ही ईश्वराची करणी ! हत्तीचं दिमाखदार स्वरूप गेंड्याला लाभलं नाही ही देवाची लीला ! यात कोणाचीच गुन्हेगारी नाही. पण गुन्हेगारी नाही म्हणून

उणीव नाही असे नाही ! सोन्याची अंबारी ठेवायची ती गजराजाच्या पाठीवरच. राजवाड्याच्या उद्यानात स्थापना करायची ती मयूराचीच ! रथकाराच्या हीन जमातीत कर्णराजांचा जन्म झाला यात त्यांचा काय दोष ? स्वतःच्या पुरुषार्थानं ते आज महत्पदाला प्राप्त झाले हाच त्यांचा मोठेपणा ! पण कौरवपक्षाच्या सेनापतीला एवढा मोठेपणा पुरेसा नाही. म्हणून म्हणतो, राजाधिराजांनी कर्णराजांनाही अशा अडचणीत घालू नये !

**दुर्योधन :** माझं दुर्भाग्य आहे ! मी मानतो की कर्णाला सेनापति करणं म्हणजे आपल्या विजयाची निश्चिती करणं होय. गेल्या तीन आठवड्यांत झालेली हानी लक्षात घेता, यापुढं पराभव आपल्याला परवडणार नाही. भारतातील सर्वश्रेष्ठ सेना, सर्वश्रेष्ठ सेनानी आणि सर्वश्रेष्ठ वीरपुरुष कौरवांच्या ध्वजाखाली लढत असता, आपल्याला पराभव का पत्करावा लागला ? प्रखर, साहसी आणि निष्ठावंत नेतृत्वाचा अभाव हेच या पराभवाचं कारण होय. सेनापतिपदासाठी मी कर्णाचा आग्रह धरतो तो याचसाठी. तीन आठवडे आपला पराभव झाला. पण तो कौरवांचा पराभव नव्हता; तर कौरवपक्षातील भीरुतेचा, पांडवांच्या पक्षपाती धोरणाचा, द्विधा मनोवृत्तीचा पराभव होता तो !

**शल्य :** ज्या थोर महात्म्यांनी कौरवपक्षासाठी आपल्या जीवनाची आहुती दिली, त्यांच्या स्मृतीचा आणि त्यागाचा या शब्दांनी गौरव होत आहे असं मला वाटत नाही.

**कृपाचार्य :** पांडवांच्या पक्षपाती धोरणाचा पराभव अं ! धरतीवर पडलेले द्रोणाचार्यांच्या रक्ताचे डाग अजून वाळले नसतील तोच कौरवांच्या दरबारात त्यांच्या कीर्तीवर असा द्रोहाचा शिक्का मारला जात आहे ! राजपुरुषांच्या किरीटाखाली कृतघ्नता भरलेली असते हे वचन कौरवेश्वराच्या बाबतीतही खरं होणार काय ? राजाधिराज, भीष्माचार्य आणि द्रोणाचार्य यांनी नेमका कोणता द्रोह केला याचा स्पष्ट खुलासा कराल तर द्रोह म्हणजे काय चीज आहे हे इथं जमलेल्या मानकऱ्यांना एकदा नक्की कळून तरी येईल !

**त्रिगर्त :** त्या थोर आचार्यांनी पांडवांना त्राहि भगवन् करून अखेरी स्वतःचे देह रणांगणावर ठेवले हा त्यांचा द्रोह; आणि भीष्माचार्य लढत आहेत तोपर्यंत आपण हातात शस्त्र धरणार नाही अशी प्रतिज्ञा करून कंचनींच्या

मांड्यांवर लोळणारे ते निष्ठावंत ! महाराज, हे शब्द आपले नाहीत. अधमांच्या संसर्गानं श्रेष्ठांचा स्वभावधर्म बदलत नाही, असं म्हणतात, पण—

**जांघिल :** ( क्रोधावेगाने उठून ) राजाधिराज, या मोठ्या मानकऱ्यांच्या सभेत माझ्यासारख्या रांगड्या शिपायानं बोलू नये हे खरं. मी कर्णराजांचा चाकर आहे ! आणि इथल्या कोणत्याही राजानं आपलं सिंहासन मला देऊ केलं तरी माझी जागा मी सोडणार नाही, इतकी ती मला मोलाची वाटते ! कर्णमहाराज स्वतः गप्प राहिले तरी मी गप्प राहाणांर नाही ! कर्णराजांना सेनापती करा अथवा करू नका, पण या निमित्ताचा फायदा घेऊन माझ्या स्वामींचा अपमान करण्याचा हा उद्योग असाच पुढे चालू राहिला तर— निक्षून सांगतो-या सभागृहात रक्तपात होईल ! रक्तपात होईल !

**काही राजे :** रक्तपात ? रक्तपात !

[ सभागृहात प्रक्षोभ व कुजबुज होते. ]

**जांघिल :** होय, रक्तपात ! एका अक्षरानं कर्णराजांची यापुढे अप्रतिष्ठा झाली त्या तर रंगेल जिभेचे हा जांघिल तुकडे उडविल्याशिवाय राहणार नाही ! त्यात माझा देहान्त झाला तरी बेहेत्तर ! मग ती जीभ सरदाराची असो, राजाची असो, नाही तर महाराजांची असो !

**कर्ण :** ( अधिकाराने ) जांघिल !

**जांघिल :** ( आवेगाने ) नाही महाराज ! मी कुणाचंही ऐकणार नाही ! नाही, आपलंसुद्धा नाही ऐकणार ! हे सारे असह्य आहे ! मला वाटेल ते शासन करा; पण हा प्रकार मी पुढे चालू देणार नाही ! कर्णमहाराज हीन आहेत, अपात्र आहेत ! अधम कुळातले आहेत ! आग लावा तुमच्या त्या थोर कुळांना आणि उच्चतेला ! माणसाचं मोल डोक्यावरच्या मुकुटांनी आणि गळ्यातल्या जडजवाहरांनी होत नाही. त्याच्या अंतःकरणातल्या माणुसकीनं आणि मनगटातल्या पराक्रमानं होतं ! आपली राजवस्त्रं उतरवून कर्णाच्या सान्निध्यात एक दिवस येऊन राहा. म्हणजे कळेल माझ्या मालकाची पात्रता ! कर्णराजांच्या पराक्रमाचा, औदार्याचा आणि स्नेहाचा या षंढांना फायदा हवा, पण—

**कर्ण :** जांघिल !—

**जांघिल :** महाराज मला क्षमा करा ! मला राहावत नाही ! पण मी निक्षून

सांगतो—

**कर्ण** : जांघिल ! आधी सभागृहाच्या बाहेर चालता हो !

**जांघिल** : ( भांबावून ) महाराज—

**कर्ण** : चालता हो अगोदर ! एक क्षणभर इथं थांबलास तर मला खपायचं नाही ! जा जा !

[ जांघिल खाली मान घालून जाऊ लागतो. ]

**कर्ण** : या ! या राजेरजवाड्यांच्या दरबारात तुझ्यासारख्या शिपायांना बोलण्याचा अधिकार नाही ! शिपायांचा अधिकार फक्त रणांगणावर आणि तोही मरण्यापुरताच ! राजांच्या आणि मुत्सद्यांच्या सभेत शिपाई जर तोंड उघडून बोलू लागले तर रणमैदानं रक्तानं भिजवायचं काम कोण करणार ! जा, मागे पाहू नकोस ! अरे, कर्णानं आजवर इतका अपमान सहन केला आहे की, आता कोणीही नव्यानं त्याचा अपमान करू शकत नाही !

[ जांघिल बाहेर निघून जातो. ]

**दुर्योधन** : अंगराज, या प्रसंगाबद्दल मी आपली क्षमा मागतो.

**कर्ण** : महाराज, आपण क्षमा मागायचं कारण नाही ! जन्मापासून माझ्या कपाळावर कोरलेला लेख आहे हा—त्याला कोण काय करणार ? ( उठून पुढे येतो. ) होय, आपण सर्वजण म्हणता ते सत्य आहे. पण तेसुद्धा संपूर्ण सत्य नाही. ते अधिक भयानक आहे. आपण चाचरत बोलता आहात. प्रशंसेच्या मखमली शब्दांतून आपला आशय प्रकट करण्याचा प्रयत्न करीत आहात ! मीच सांगतो ते ! मी क्षत्रिय नाही, ब्राह्मण नाही, राजपुत्र नाही. होय, मी सूतपुत्रसुद्धा नाही ! कोणत्या स्त्रीनं कोणत्या पुरुषापासून मला जन्म दिला हे कदाचित ब्रह्मदेवाला ठाऊक असेल, पण कोणत्याही ऐहिक मानवाला ते माहीत नाही ! संभावितांची नीती न जुमानणाऱ्या स्त्रीपुरुषांनी मला जन्म दिला आहे. राजाचं कुळ नाही, क्षत्रियाची जात नाही, आईबापांचा पत्ता नाही ! परमेश्वरानं दिलेली देहाची एक देणगी घेऊन मी जगात आलो आहे. माणसाच्या कर्तबगारीपेक्षा, ज्या स्त्रीपुरुषांनी मैथुन करून त्याला जन्म दिला त्यांच्या नावांचं, त्यांच्या घराण्याचं, ज्यांना महत्त्व वाटत असेल त्यांच्या दृष्टीनं मी खरोखरच अधम आहे ! या सन्मानास अपात्र आहे ! शल्यमहाराज, मला राग आलेला नाही. आपल्याकडे तरी काय दोष ! माण-

साच्या शहाणपणाप्रमाणं त्याचा मूर्खपणादेखील सभोवारच्या परिस्थितीनं आणि काळानं निश्चित झालेला असतो ! माणसाच्या मोठेपणाचं मोजमाप करताना, त्याला जन्म देण्यासाठी कोणत्या स्त्रीनं कोणत्या पुरुषाशीं संबंध ठेवला याच गोष्टीचं आपल्याला कौतुक वाटावं यात नवल नाही. कारण अनेकांच्या मोठेपणाचं भांडवल एवढंच असतं की, त्यांना आपल्या आई–बापांची नावं सांगता येतात. परमेश्वराशिवाय आणि पृथ्वीशिवाय मी कुणाचं नाव सांगू ? राजाधिराज, या थोर कुलवंताचं नेतृत्व करायला, सेनापतीच्या पदाला मी खरोखरच नालायक आहे. परंतु पांडवांच्या शस्त्रांपासून इथं जमलेल्या संभवितांचे प्राण आणि कौरवांची प्रतिष्ठा जर आपल्याला सुरक्षित ठेवायची असेल तर— या घटकेला तरी कौरवपक्षामध्ये दुहीचा आणि भेदाचा अग्नी कोणीही पेटवू नये, अशी माझी सर्वांना नम्र विनंती आहे. कर्णाच्या मानापमानापेक्षा कौरवेश्वराच्या विजयाचं महत्त्व मला फार अधिक वाटतं ! आचार्य सेनापती असता मी हातांत शस्त्र धारण केलं नाही हे खरं आहे. पण ते कंचनीच्या मांडीवर लोळण्यासाठी नव्हे— राजवाड्यांच्या अंतःपुरात ज्यांचे जन्म झाले आहेत त्यांना कंचनीच्या मांडीचं कौतुक वाटले ! मातीच्या बिछान्यावर आणि दगडाच्या उशीवर डोकं ठेवून मी जन्माला आलो आहे ! मला विलासाचा मोह नाही आणि मृत्यूचं दुःख नाही ! भीष्माचार्य आणि द्रोणाचार्य यांच्या पायावर कर्णानं हजारदा मस्तक ठेवलं आहे, त्यांनी लाथाडलं असताही ठेवलेलं आहे. आणि भीष्माचार्यांचा शेवटचा आशीर्वाद या कर्णालाच लाभलेला आहे. परंतु मी कोणाचीही खोटी प्रशंसा करणार नाही. दोघा आचार्यांच्या हृदयांत असलेल्या पांडवांविषयीच्या प्रच्छन्न प्रेमामुळेच कौरवांचा आजवर पराभव झाला ! मी शस्त्रत्याग केला तो याचसाठी कर्ण केवळ शस्त्रानं लढू शकत नाही. शस्त्र विजयी होत नाही, निष्ठा विजयी होते. माझ्या हातांत शस्त्र असलं तरी हातामागं अंतःकरण नव्हतं. म्हणूनच मला शस्त्रत्याग करावा लागला. पण आज परिस्थिति पालटली आहे. उद्या अशा अविचल मनानं पांडवांचा संहार करण्याच्या एकमेव निर्धारानं कर्ण रणांगणावर पाऊल टाकायला सिद्ध आहे. आपण मला सेनानायक करा किंवा करू नका. कर्णाची सारी कर्तबगारी कौरवेश्वराच्या आणि आपणा सर्वांच्या

सेवेसाठी सिद्ध आहे. मी जातो.

**दुर्योधन :** ( उठून पुढे जातो )

**कर्ण :** मी जाणं हेच उचित आहे ! आपण विचार करा आणि आपला निर्णय मला कळवा. महाराज, आपण कष्टी होऊ नका. मी पुन्हा सांगतो, मला काहीही दुःख होत नाही. माझ्या हृदयाला कसलीही यातना नाही. माझ्या साऱ्या जीवनशक्ती उद्याच्या युद्धाकडे नजर लावून बसल्या आहेत. पांडवांच्या पराभवाची आणि कौरवांच्या विजयाची एकच एक महत्त्वाकांक्षा माझ्या अंतःकरणाचा कबजा घेऊन बसली आहे, मानापमानाच्या क्षुद्र तमाशानं कर्णाचं मन विचलित होणार नाही. विजय मिळेपर्यंत कोणत्याही गोष्टीचं मन विचलित करून घेणं मला परवडणारच नाही ! राजाधिराज, जातो मी.

[ सभागृहातून बाहेर जातो. ]

## प्रवेश दूसरा

[ कुरुक्षेत्रावरील एका देवालयाचे आवार. पहिल्या प्रवेशानंतर सुमारे एक तासाचा अवधी होऊन गेला आहे. जांघिल व वासंतिका प्रवेश करतात. ]

**जांघिल :** वासंतिक, अजून उजाडलं नाही ना ?

**वासंतिका :** उजाडलं ? आता तर रात्रीची सुरुवात झाली आहे ! दिसत नाही का हा रात्रीचा अंधार ?

**जांघिल :** हा अंधार इतका दाट आहे की, त्यात काहीसुद्धा दिसत नाही ! हे दिवे नसते तर हा अंधारसुद्धा दिसला नसता ! बाकी आकाशात चंद्र दिसतो आहे आणि समोर तू दिसते आहेस; तेव्हा रात्र असावी हेच खरं ! पण हा चंद्र आहे तरी खरं का ? हा चंद्रासारखा दिसणारा पण खरोखर सूर्य तर नाही ना ? वेळापत्रक पाहण्यात गफलत होऊन चुकून रात्री उगवला असेल आणि त्यामुळे लज्जेनं पांढरा पडून असा चंद्रासारखा दिसत असेल ! चंद्र की सूर्य ? रात्र की दिवस ? मोठी पंचाईत आली !

**वासंतिका :** पंचाईत कसली त्यात ?

**जांघिल :** फार मोठी पंचाईत आहे ! हा सूर्य असेल तर मी तुझ्याबरोबर कसा ? सूर्य उगवल्यावर स्त्रियांचं काय काम ? अंधार आणि स्त्रिया सूर्योदया-

बरोबर एकदम नाहीशा झाल्या पाहिजेत ! (स्त्री ही अंधारकन्या आहे. परमेश्वरानं जग उत्पन्न केलं तेव्हा त्यानं प्रकाशापासून पुरुष तयार केला आणि काळोखापासून स्त्री निर्माण केली ! म्हणूनच दिवसा जनावरांसारख्या वाटणाऱ्या स्त्रिया रात्र झाली की देवतांसारख्या दिसू लागतात !) दिवसा समरांगण आणि रात्री स्त्री ही सैनिकाच्या जीवनाची आदर्श व्यवस्था आहे ! म्हणून हा जर सूर्य असेल तर मी या वेळी हातांत शस्त्र घेऊन रणांगणावर हजर असायला पाहिजे. पण ज्या अर्थी मी रणांगणावर हजर नसून तुझ्यासमोर उभा आहे त्या अर्थी ही रात्रच असली पाहिजे.

**वासंतिका :** काय मेला ब्रह्मघोटाळा हा ! दरबारात अपमान झाल्यामुळे आज तुम्ही मद्याचे चार पेले जास्त घेतले हे मला माहीत आहे ! पण म्हणून काय झालं ! खुशाल चंद्राला सूर्य आणि रात्रीला दिवस म्हणता ? जरा वेळानं मला भीम किंवा घटोत्कचसुद्धा म्हणाल !

**जांघिल :** तुला भीम किंवा घटोत्कच म्हणायला मद्याचे चार पेले जास्त घ्यायचं काय कारण ? पहिल्याच पेल्यात काम भागेल ! तुझी अंगलट त्याच वळणाची आहे !

**वासंतिका :** आलात पुन्हा मूळपदावरती ! का हो, मी काय लठ्ठ आहे वाटतं ?

**जांघिल :** लठ्ठ ? तुझं संपूर्ण स्वरूप दाखवायला हस्तिनापुरातील सारे आरसेही पुरे पडायचे नाहीत !

**वासंतिका :** असू दे मी लठ्ठ ! जा एखादी सुकुमार अप्सरा शोधायला !

**जांघिल :** रागावलीस वाटतं ? अगं, पण तू लठ्ठ आहेस म्हणूनच मला इतकी आवडतेस. सडपातळ स्त्री म्हणजे स्त्रीत्वाचा संकोच ! अन्नधान्याची ददात असणाऱ्या कंगाल कवींनीच हे सडपातळपणाचं कौतुक करून ठेवलं आहे. साफ खोटं आहे ते. स्त्री म्हणजे दाही दिशांना डवरणाऱ्या वटवृक्षासारखी हवी ! स्त्रीचं आकर्षण तिच्या शरीरात असतं. म्हणून शरीराचा विस्तार जितका अधिक तितकं तिचं आकर्षणही जास्त ! साधा गुणाकार आहे हा ! गुंजभर सोन्यापेक्षा तोळाभर सोनं केव्हाही अधिक मूल्यवान ! तेव्हा लठ्ठ आहेस म्हणून चिंता करू नकोस ! तू इतकी विस्तृत आहेस म्हणूनच मत्सराच्या दाहक भावनेपासून मी अगदी मुक्त आहे ! तुझ्या शरीराच्या क्षेत्रफळाकडे आणि परिघाकडे पाहिलं की, कोणत्याही सामान्य पुरुषाला तुला

आलिंगन देण्यासाठी पुढे येण्याचा धीरच व्हायचा नाही ! झाडावर पड-लेल्या फाटक्या पतंगाप्रमाणे तो कुठं लोंबकळत राहील याचा नेम नाही !

**वासंतिका :** अस्सं का ? आता मात्र खरोखरीच तुम्हांला मदिरा चढलेली दिसते ! कारण गेले पंधरा दिवस हा कार्यक्रम चालला आहे. मदिरा चढली की तुम्ही मला लठ्ठ म्हणता आणि उतरली की माफी मागून मोकळे होता !

**जांघिल :** बरोबरच आहे ! मद्य हे सत्यप्रिय आणि साहसी आहे ! ते लठ्ठाला लठ्ठ आणि मठ्ठाला मठ्ठ म्हणायला कधीही घाबरणार नाही ! मठ्ठावरून आठ-वण झाली. द्वारकेचा श्रीकृष्ण पांडवांच्या पक्षाला गेल्यामुळे भारतातील सारी अक्कल पांडवांकडे गेली आणि उरलासुरला मठ्ठपणा कौरवांच्या शिबि-रात आला !

**वासंतिका :** कर्णराजांना सेनापती केलं नाही म्हणून हा सारा राग दिसतो आहे !

**जांघिल :** कर्णाला सेनापती केलं नाही म्हणून माझं काय जाणार आहे ? फार तर प्राण जातील ! पण ते आज ना उद्या जाणारच ! हा मानवी संसार म्हणजे नाण्यांचा बाजार आहे ! काही सोन्याची, काही चांदीची, तर काही तांब्याची. पण कोणाची कितीही किंमत असली तरी सृष्टीच्या टांकसाळीत प्रत्येक नाण्यावर मृत्यूनं आपला शिक्का अगोदरच मारून ठेवलेला असतो. मरणाला भिण्याचं काय कारण ? माझ्यासारख्या सैनिकानं मरणाची पर्वा करणं म्हणजे तुझ्यासारख्या स्त्रीनं पातिव्रत्याची पर्वा करण्यासारखं आहे !

**वासंतिका :** माझी अशी निंदा-नालस्ती करायची असेल तर मी आपली हस्तिनापुराला निघून जाते कशी !

**जांघिल :** काही जाऊ नकोस ! कोणी परत बोलावण्याची खात्री असेल तरच रागानं निघून जाण्यात स्वारस्य ! तू हस्तिनापुराला नाही, आणखी कन्या-कुमारीला जायला निघालीस, तरी मी काही एका शब्दानं तुला परत बोल-णार नाही ! पण वासंतिके, तुला असं रागवायचं काय कारण ? तुला पतीही नाही, आणि पातिव्रत्यही नाही. तू वारांगना आहेस—

**वासंतिका :** ( रागाने ) काय म्हणालात ? पुन्हा तो शब्द उच्चारा पाहू !

**जांघिल :** मी वारांगना म्हणालो का ? माफ कर. मला खरोखर म्हणायचं होतं, वीरांगना ! या मद्याच्या कैफात मात्रा वेलांट्यांचं भानच राहात नाही ! माझ्यासारख्या वीराची, वल्लभा, तू वीरांगनाच नाहीस का ?

**वासंतिका :** आता उगाच सारवासारव करीत आहात ! मी उद्या संध्याकाळी तुम्हांला भेटायचीच नाही !

**जांघिल :** उद्या संध्याकाळी मीच तुला भेटेन की नाही याची शंका आहे ! पांडवांचा संहार करण्याचा माझ्या स्वामींनी निर्धार केला आहे ! आजवर झालं नाही असं निकराचं युद्ध उद्या होणार. तेव्हा कदाचित उद्या मी भेटेन-, कदाचित भेटणार नाही. विजयी झालो तर तुला भेटण्यासाठी दोन्ही हात पसरून याच देवळाच्या दाराशी असाच उभा राहीन. पराभूत होऊन परलोकी गेलो तर हेच कार्य करण्यासाठी तुला दुसऱ्या एखाद्या पुरुषाचा शोध घ्यावा लागेल !

**वासंतिका :** अगदी उलट्या काळजाचे दैत्य आहात ! तुम्ही गेलात तर मला काहीच का दुःख व्हायचं नाही ? आज इतक्या दिवसांची ओळख आपली !

**जांघिल :** दुःख होणार नाही असं मी कधी म्हणालो ? पण दुःख नाहीसं करण्याचा एकच उपाय म्हणजे सुख मिळवणं हा होय. आणि साऱ्या सुखांत शरीरसुखाइतकं श्रेष्ठ सुख दुसरं कोणतंही नाही. मानीव सुखं केव्हा दगा देतील याचा नेम नाही. पण शरीराचं सुख मात्र शरीर आहे तोपर्यंत हमखास आनंद देणारं ! म्हणून सांगून ठेवतो, मी गेलो तरी उगाच रडत बसू नकोस ! चटकन उठून आपली उद्योगाला लाग—

**वासंतिका :** अगदी दंडकारण्यातून आलेल्या एखाद्या अनार्यासारखं बोलता आहात ! तुम्हांला आर्य म्हणणं कठीण आहे !

**जांघिल :** आवश्यकही नाही ! आर्यांची महती एवढीच की त्यांनी सुई-दोऱ्याचा शोध लावला ! माणसांची संस्कृती म्हणजे शिंप्याची करामत ! हे कपडे वजा केले म्हणजे माणूस निव्वळ पशू !

**वासंतिका :** तुमचं नुसतं बोलणं ऐकलं तरी माणूस म्हणजे पशू हे कळून येतं !— अगंबाई ही कसली गडबड ऐकू येत आहे ?

[ आत दूरवर जयघोषाचा कोलाहल ऐकू येतो. ]

**जांघिल :** ( आत पाहून ) काय झालं देव जाणे ! काळोखात हजारो मशाली उजळल्या आहेत ! साऱ्या शिबिरात काही तरी प्रचंड उत्पात झालेला दिसतो ! सैनिक बेहोष होऊन नाचत आहेत ! द्रोणाचार्यांच्या वधानं खवळून जाऊन कौरव-पांडवांवर छापा घालण्याची तयारी तर करीत

नाहीत ?–पण असं होणं शक्य नाही. कर्णराज कौरवांच्या पक्षात आहेत तोवर असं अधर्मयुद्ध ते केव्हाही होऊ देणार नाहीत ! –

**वासंतिका :** मग पांडवांनीच हल्ला केला असेल ! धर्मावर प्रवचनं करण्याचं काम धर्मराजावर सोपवून बाकी वाटेल तो अधर्म करायला ते तयार आहेत !

**जांघिल :** नाही, हा कोलाहल लढाईचा नाही ! आनंदाचा, उत्साहाचा आहे ! हा पहा, एक सैनिक सगळे पितर स्वर्गाला गेल्याप्रमाणं उड्या मारीत चालला आहे ! अहो, अहो महाभाग ! जरा थांबाल का ? ( सैनिक प्रवेश करतो ) काय हो, कसली एवढी गर्दी उसळली आहे ? काय झालं तरी काय ?

**सैनिक :** काय झालं ? व्हायला पाहिजे होतं तेच झालं.

**जांघिल :** व्हायला हव्यात अशा अनंत गोष्टी जगात आहेत !

**सैनिक :** पण ही अगोदर व्हायला हवी होती ! याऐवजी दुसरं काही झालं असतं तर आम्हां सैनिकांना ते बिलकूल खपलं नसतं ! वाटेल ते करायचं म्हणजे काय ?

**जांघिल :** अहो, पण झालं काय ? पहिलं काय, दुसरं काय, करणारे कोण, न करणारे कोण ?

**सैनिक :** म्हणजे तुम्ही अगदीच अंधारात दिसता ! अहो महाशय, कर्णमहाराज कौरवांचे सेनापती झाले !

**जांघिल :** वासंतिके, मी काय ऐकतो आहे हे ! माझी मदिरा चढली आहे की उतरली आहे ईश्वर जाणे ! काहो, आपण काय म्हणालात ? कर्णराजासंबंधी काय म्हणालात ?

**सैनिक :** कर्णमहाराज सेनापती झाले !

**जांघिल :** सेनापती झाले ? खरंच झाले ? पण तुम्ही मद्यालयाकडून तर आला नाहीत ना ?

**सैनिक :** मी शिबिरातून आलो ! ती पहा, सारी छावणी आनंदाच्या आरोळ्या मारीत नाचते आहे !

**जांघिल :** ( हर्षभरित होऊन अंगावरील अलंकार काढतो. ) कर्णराज सेनापती झाले ! कर्णराज सेनापती झाले ! ही माळ घ्या, हा हार घ्या, वासंतिके,

वासंतिके ! ही सलकडी घे, या अंगठ्या घे— पण काय हो, हे घडलं कसं ? मूर्खांना शहाणपणा सुचला कसा ?

सैनिक : आम्ही ऐकलं की, दरबारात शकुनी, दुःशासन वगैरे कर्णाचे चाहते गैरहजर आहेत असे पाहून काही राजांनी आणि आचार्यांनी उचल घेतली व कर्णाच्या सेनापतिपदाला विरोध केला. कर्णाच्या बाजूनं बोलायला त्यांचाच एक जांधिल नावाचा सरदार फक्त होता.

जांधिल : ते मला ठाऊक आहे ! अपमान झाल्यामुळे, मद्य पिऊन जगाला शिव्या देत एका देवळाच्या दाराशी बसला आहे तो. पण पुढे काय झालं ?

सैनिक : पुढे व्हायला हवं तेच झालं ! शकुनिमहाराज दरबारात आल्यावर सारा रंग पालटला. त्यांनी शहाणपणानं सर्वांना पटवून दिलं की कर्णालाच सेनानायक करणं आवश्यक आहे ! कर्णाच्या विरोधकांनाही आपला मूर्खपणा कळून आला. एकमतानं कर्णाला सेनापति करावयाचं ठरलं ! आताच सर्व शिबिरात दवंडी दिली आहे की, घटकाभरानं कर्णाला सेनापतिपदाचा अभिषेक होणार आहे ! त्याचाच हा सारा आनंद आणि उत्साह ! सारे शिपाई हर्षानं बेहोष होऊन राजसभेकडे निघाले आहेत ! तुम्हांला ठाऊक नाही कर्ण म्हणजे काय माणूस आहे ते !

जांधिल : नाही ! अद्याप त्यांना मी जवळून पाहिलंही नाही !

सैनिक : मग आता पाहा ! इकडेच येत आहेत ते !

जांधिल : इकडे येत आहेत ?

सैनिक : येत आहेत नव्हे, आलेही ! या ऐका तुताऱ्या ! दुर्योधन आणि शकुनी यांजबरोबर या रणदेवतेचं दर्शन घेण्यासाठी इकडे येत आहेत ते ! पण जीव सांभाळा मात्र ! कौरवेश्वराच्या शरीररक्षकांनी आणि अग्रदूतांनी देवालयाचा सारा परिसर निर्मनुष्य केला आहे ! इथं जवळपास यायची सर्वांना बंदी आहे— मी जातो आता— हातांत समशेरी आणि मशाली घेऊन अग्रदूत सर्वत्र हिंडत आहेत ! पण हे सगळं तुम्ही मला खरंच देऊन टाकलं ना ?

जांधिल : आणखी काही असतं तर तेही दिलं असतं !

सैनिक : शाबास ! तुम्हीही कर्णासारखेच उदार दिसता !

( जातो. )

जांधिल : वासंतिके, तुताऱ्या—शिंगांचा आवाज अगदी जवळ ऐकू येत आहे;

चल, आपण इथून गेलं पाहिजे ! मद्य प्यायलेल्या अवस्थेत महाराजांनी मला इथं पाहिलं तर—चल, चल, ते पाहा अग्रदूत आले ! सारी तयारी करून अभिषेकाच्या समारंभाला मला हजर राहायला पाहिजे ! ( दोघेही जातात. )

[ तुतारी, कर्णे वगैरे वाद्यांचे आवाज जवळ ऐकू येतात, हातात तलवारी व मशाली घेतलेले काही अग्रदूत पुढे येतात व लल-काऱ्या देत निघून जातात. क्षणभराने दुर्योधन, कर्ण व शकुनी हे प्रवेश करतात. अभिषेकसमारंभास उचित असा वेष कर्णाने परिधान केला असून त्याच्या मुद्रेवर प्रसन्नता दिसत आहे. ]

**दुर्योधन** : परिचारक—

**परिचारक** : राजाधिराज—

**दुर्योधन** : राजपुरोहित देवालयात आले आणि पूजेची सिद्धता झाली की आम्हांला वर्दी पोहोचवा.

**परिचारक** : आज्ञा महाराज. ( जातो. )

**दुर्योधन** : अंगराज, आपण सेनापती झालात या वार्तेनं सारं शिबिर उत्साहानं आणि वीरश्रीनं उधाणून गेलं आहे. आपण बाहेर पडताच जयघोषांचं आणि स्वागताचं जे कंदन उसळलं ते पाहिल्यावर मला तर वाटलं, की कुरुक्षेत्रावर पसरलेलं सारं आकाशच आपल्या अनंत आणि अदृश्य जिव्हांनी गर्जना करीत आहे ! खरोखर, सम्राटांनीही हेवा करावा असं हे ऐश्वर्य आहे !

**शकुनी** : राजांचं नेतृत्व राजेच करू शकतात असे उद्‌गार त्रिगर्तानं दरबारात काढले ना ? ते जर आमच्याबरोबर आता शिबिरात आले असते तर त्यांना कळलं असतं की, वीरांचं नेतृत्व वीरच करू शकतात. कर्णाच्या सेनापति-पदाला विरोध करणाऱ्या या राजांनी आणि आचार्यांनी आपल्या कुंपणा-बाहेरचं जग पाहिलेलं नाही हेच खरं !

**दुर्योधन** : मामा, शल्य— त्रिगर्तांनी सभागृहात जो उठाव केला तो पाहून मी खरोखरच भांबावून गेलो होतो. पण कौरवपक्षाचं सुदैव की आपण आल्या-वर आपला युक्तिवाद प्रभावी ठरला आणि सर्वांनी कर्णराजांच्या नेतृत्वाला एकमुखानं संमती दिली.

**कर्ण** : राजाधिराज, सेनापतीचं पद देऊन आपण या सूतपुत्राचा मोठा गौरव करीत आहात. माझ्या मस्तकावरील आपलं ऋण आपण पुन्हा वाढवलं

आहे. मी आपल्याला इतकंच आश्वासन देतो की, या जागेची जबाबदारी मी ओळखतो. माझ्या परम मित्राच्या मस्तकावर भारताच्या सार्वभौमत्वाचा मुकुट ठेवणं आणि पांडवांचा पराभव करणं हीच कर्णाची एकमेव महत्त्वाकांक्षा आहे. या आकांक्षेच्या पूर्ततेसाठी सेनापतिपदाचं साहाय्य होणार नाही, अशी थोडी जरी शंका माझ्या मनात असती, तरी मी या गौरवाचा स्वीकार केला नसता ! कर्णाची शस्त्रं सन्मानासाठी हपापलेली नाहीत, तर केवळ मित्रांच्या सेवेसाठी आणि वैऱ्यांच्या रक्तासाठी ! यासाठीच शल्य-त्रिगर्तांसारख्या राजमित्रांचा विरोध ध्यानात घेऊनही मी या सन्मानाचा स्वीकार करीत आहे.

**दुर्योधन** : शल्य-त्रिगर्तांच्या मनात आता कोठलाही विरोध नाही, याबद्दल मी आपल्याला ग्वाही देतो. शल्यराजांनी स्वतः आपलं सारथ्य पत्करायचं कबूल केलं ते अंतःकरणात कोठलीही साशंकता नाही म्हणूनच !

**शकुनी** : शल्याच्या सारथ्याबद्दल मी मात्र साशंक आहे. तुम्ही दोघांनी त्यासाठी इतका आग्रह धरला नसता तर मी या सूचनेला खास संमती दिली नसती ! अश्वविद्येत शल्य अजोड आहे हे खरं. पण आपण फक्त त्याच्या विद्येचा विचार केलात, त्याच्या स्वभावाचा केला नाही !

**दुर्योधन** : शल्याचं नशीब कौरवांच्या नशिबाशी जखडलेलं आहे. रथावर बसल्यावर तो कर्णाचा विश्वासघात करील हे सर्वस्वी अशक्य आहे !

**शकुनी** : कृतीनं करणार नाही ! पण घोड्याचे लगाम सांभाळण्यात मद्रेश्वर कितीही प्रवीण असले तरी स्वतःची जीभ मात्र त्यांना लगामात ठेवता येत नाही. ही मद्रदेशातील माणसं म्हणजे माजलेल्या जिभांची ! काळवेळ विसरून शल्यराज जर कर्णाला उणं अधिक बोलू लागले तर मोठीच आपत्ती ओढवेल. अंगराजांची प्रकृती अशी ज्वालाग्राही ! समोरचे शत्रू बाजूला राहून रथी आणि सारथी यांच्यातच बेबनाव सुरू व्हायचा !

**कर्ण** : मामा, आपण अगदी निःशंक असा ! मद्रेश्वरांनी स्नेहानं आपला हात आज माझ्या हाती दिला आहे. ते अशी वंचना करतील असं मला वाटत नाही.

**शकुनी** : कर्णा, सूर्याच्या किरणांना कधीही अंधार दिसत नाही ! तुझ्या मनाचं इथं काहीही महत्त्व नाही. अद्यापही या गोष्टीचा फेरविचार करा. संता-

सारखा चेहरा आणि सापासारखी जीभ असलेली ही माणसं फार धोक्याची असतात.

**दुर्योधन** : मामा, माणसांच्या अंतःकरणांना दरवाजे असते तर फार बरं झालं असतं ! ते उघडून आतील भावनांचा शोध घेता आला असता. पण तूर्त माणसाच्या शब्दावरतीच आपल्याला विश्वास ठेवायला पाहिजे !

**शकुनी** : शब्द ही एक गोष्ट अशी आहे की जिच्यावर शहाण्यांनी कधीही विश्वास ठेवू नये ! अंतःकरणातील भावना व्यक्त करण्यापेक्षा त्या लपवण्यासाठीच शब्दांचा उपयोग अधिक होतो.

**कर्ण** : शकुनीमहाराज, आपलं हे तत्त्वज्ञान खरं मानलं तर सारं जग भामट्यांनी भरलं आहे असं मानावं लागेल ! आपणसुद्धा त्याला अपवाद ठरणार नाही ! पण हे खरं नाही. मी तरी खरं मानणार नाही. माझ्या शब्दावर दुसऱ्यांनी विश्वास ठेवावा अशी माझी अपेक्षा आहे. त्याचबरोबर मीही दुसऱ्याच्या शब्दावर विश्वास ठेवणं हे माझंही कर्तव्य आहे.

**दुर्योधन** : मामा, सूर्याच्या किरणांना अंधार दिसत नाही म्हणून आपण म्हणालात. सूर्याचे किरण पडले म्हणजे अंधाराचंच रूपांतर प्रकाशात होतं. कर्णाच्या निवासात जाण्यापूर्वी शल्याची वृत्ती कोणतीही असो, तेथून बाहेर पडताना मात्र तो कर्णाचा मित्र म्हणूनच बाहेर पडला !

**शकुनी** : म्हणजे आपण मित्र आहोत असं त्यानं सांगितलं !

**कर्ण** : हो, त्यानं सांगितलं आणि तेवढं मला पुरे आहे ! आणि मामा, अद्यापही तुम्हांला शंका असेल तर मी आश्वासन देतो की, शल्यानं माझा तेजोभंग करण्याचा प्रयत्न केला तरी तोही मी सहन करीन. सागराकडे गर्जत जाणाऱ्या पुराला झाडाझुडपांची काय तमा ! सागराशी संमीलित होण्याच्या एकाच प्रेरणेनं जीवनाचा तो प्रचंड ओघ, कोठलेही प्रतिकार न जुमानता पुढे धावत असतो. कर्णाचा जीवनप्रवाह अखेरच्या विजयाकडे धावत असताना शल्याचे कटू शब्द त्याला ऐकूसुद्धा यायचे नाहीत !

**दुर्योधन** : असा प्रसंगच येणार नाही ?

**शकुनी** : ठीक आहे ! योग्य वाटला तो इशारा मी दिला. शल्य खरा ठरला तर मी मूर्ख ठरणार हे उघड आहे ! आईच्या मायेप्रमाणं मुत्सद्देगिरीही नेहमी पापशंकी असते. मी मूर्ख ठरो इतकीच परमेश्वराजवळ माझी प्रार्थना !

कर्ण : ( हसून ) मामा, आपण परमेश्वराला मोठ्या पेचात टाकीत आहात !

शकुनी : या जगात जन्माला घालून परमेश्वरानं काय आम्हांला कमी पेचात टाकलं आहे ? कर्णराज ! मी महामूर्ख ठरलो तरी हरकत नाही, पण उद्या शल्याचं सारथ्य तुमच्या विजयाचा मार्ग निर्वेध करो. कारण आपण पराभूत झालो तर त्याहून मोठी आपत्ती वाढून ठेवली आहे ! (पराभूताला प्राणच गमवावे लागतात असं नाही तर कीर्तीही गमवावी लागते !) कौरव पराभूत झाले तर माझा हा अभिमानी पण सरळ अंतःकरणाचा भाचा ' जगातला सर्वांत मोठा खलनायक म्हणून नाव कमावील ! तेजस्वी आणि उदार वृत्तीचा हा महारथी कर्ण एक तापट, उद्धट आणि गर्विष्ठ माणूस म्हणून प्रसिद्धी पावेल. आणि या शकुनी मामाची तर काय अवस्था होईल देव जाणे ! बहुधा माझ्या नावावर एक उलट्या कुटिल काळजाचा म्हातारा असा शिक्का मारला जाईल ! कारण ज्याला विजय मिळेल तो वीर, जो पराभूत होईल तो दरोडेखोर. विजयी होईल तो मुत्सद्दी, पराभव पावेल तो भामटा. जे विजय मिळवील ते सत्य, आणि जे रणांगणावर कोलमडून पडेल ते असत्य ! सत्यासत्याची मीमांसा शेवटी तलवारीच्या धारेनं होत असते ! सत्यालाच विजय मिळतो असं नाही ! तर ज्याला विजय मिळतो तेच सत्य ठरतं ! म्हणून अंगराज, माझा वृद्धाचा आशीर्वाद आहे की, आपण विजयी व्हा !

कर्ण : आपल्यासारख्या वृद्धांचे आशीर्वादच मला विजयाच्या वेशीपर्यंत पोहोचवतील. माझ्या घरात मला आशीर्वाद देणारं कोणीच नाही. सहज मनात येतं, मला आई असती तर तिला माझा हा गौरव पाहून किती आनंद वाटला असता ! रथात आरूढ होताना तिच्या पायांवर डोकं ठेवून तिचे आशीर्वाद घेताना किती समाधान वाटलं असतं !

शकुनी : कर्णा, ज्यांना आया आहेत त्या सर्वांचेच अनुभव काही चांगले नाहीत ! आईचं महत्त्व ती नसतानाच जास्त वाटतं ! न मातुः परदैवतम् हे सुभाषित नेहमी दुसऱ्यांच्या आयांसंबंधी खरं असतं !

कर्ण : मामा, माझं सांत्वन करण्याची मुळीच जरूरी नाही ! आईचा आणि माझा संबंध फक्त जन्मापुरताच आला आहे ! राधिकेनं मला आपल्या पदराखाली घेतलं. मायेनं माझं संगोपन केलं. पण राधिकेची माया मातृ-

त्याच्या पोटी निर्माण झाली नसून अनाथावर पाखर घालण्याच्या औदार्यातून उत्पन्न झाली आहे हे मला जागतेपणी समजलं. आणि तेव्हापासून राधिकेकडेही मी आई म्हणून कधी पाहू शकलो नाही ! कर्णाच्या जीवनात मातेला जागा नाही. परक्या घरी झोपी गेलेल्या मुलाप्रमाणं अंतःकरण एखादे वेळी अचानक आई म्हणून आक्रोश करतं, पण हे आक्रोश बंद करण्याचं माझ्यात सामर्थ्य आहे. कर्णाच्या जीवनात स्त्रीची एकच भूमिका महत्त्वाची आहे, आणि ती म्हणजे वल्लभेची !

**शकुनी :** तीच एक स्त्रीची खरी भूमिका आहे ! मातादेखील अगोदर कोणाची तरी वल्लभा असतेच; त्याशिवाय ती माता तरी कशी होईल ? पुराणात तर माताही वल्लभा झाल्याची उदाहरणं आहेत ! पण पुराणातल्या गोष्टी कशाला ? कुंती ही ज्येष्ठ पांडवांची सख्खी आई ना ? पण तिची उघडी मांडी पाहून प्रत्यक्ष धर्मराजाची कामवासना जागृत झाली ! स्वतःचा सत्यवक्तेपणा सिद्ध करण्यासाठी खुद्द धर्मानंच ही गोष्ट चारचौघांजवळ जाहीर करून ठेवली आहे. अर्थात् हे खरं की कुंतीसारखी सुंदर आणि चिरतरुण माता मिळण्याचं भाग्य सर्वांच्याच नशिबी नसतं !

**कर्ण :** कुंतीसारखी आई लाभणं हे खरोखर भाग्य आहे ! परंतु सौंदर्य आणि चिरयौवन हेच काही कुंतीचे सद्गुण नव्हेत. मुक्या जिभेनं प्रेम करण्याचं अपार सामर्थ्य कुंतीजवळ आहे. शब्दाची जितकी कृपण तितकीच हृदयाची उदार आहे ती. कौरव-पांडवांत येण्याजाण्याचे संबंध होते तेव्हा कुंतीच्या समोर गेल्यावर मला नेहमी वाटायचं, की आपल्याला आई नाही-आणि नाही हेच बरं आहे !–पण ' आई ' म्हणून कोणाला हाक मारायची झाली तर याच स्त्रीला हाक मारावी. तिचे ते मायेनं ओथंबलेले डोळे माझ्याकडे क्षणमात्र वळले की माझ्या अंतःकरणात कालवाकालव होई आणि मातृत्वाच्या भावनेची मंगल उदासीन मूर्तीच आपल्यासमोर उभी राहिली आहे असा मला भास होई !

**दुर्योधन :** अंगराज, पांडवांशी युद्ध करताना कुंतीचे हे करुण डोळे आपल्या दृष्टीसमोर येणार नाहीत अशी मी अशा करतो. कारण ते डोळे आपल्या समोर आले तर त्यांतील अश्रू आपल्याला दिसू लागतील आणि मग पांडवांच्या संहाराचं कार्य दुष्कर होऊन बसेल !

२२८८ ७.१२.९५

**शकुनी** : (पुरुषाच्या पराक्रमाला सर्वांत मोठी भीती स्त्रियांच्या अश्रूंपासूनच असते !)

**कर्ण** : राजाधिराज, आपली भीती अकारण आहे. ही रिकाम्या वेळातली मनाची चेष्टितं आहेत. कुंतीच्या अश्रूंची मला काय पर्वा ? नव्हे, पाची पांडवांचा वध करून कुंतीला रडायला लावणं हेच माझं जीवितकार्य आहे ! कुंतीचं काय, पण जगातल्या साऱ्या माता कुरुक्षेत्राच्या रणमैदानावर येऊन अश्रूंचा पाऊस पाडू लागल्या तरी माझ्या संकल्पापासून मी रेसभर ढळणार नाही ! ज्या एका दिवसाची मी वर्षानुवर्षे वाट पाहात प्रतीक्षा करीत होतो तो उद्या उगवणार आहे. मानवी जीवनाला पृथ्वीशी जखडणारे सारे पाश तोडून साऱ्या शृंखलांतून बंधमुक्त होऊन हा कर्ण उद्याच्या सूर्योदयाला सामोरा जाणार आहे ! कर्णाचा सारा पराक्रम, सारी कर्तबगारी, सारी विद्या उद्या कुरुक्षेत्रावर पणाला लागणार आहे ! हस्तिनापुरातील रंगमंचावर याच पांडवांनी सांगितलं की कर्णासारख्या सूतपुत्राला राजकुमारांबरोबर शस्त्र-परीक्षेत भाग घेता येणार नाही ! उद्या कुरुक्षेत्रावर होणाऱ्या शस्त्रपरीक्षेत पांडवांना पाठीशी घालायला कोणते द्रोणाचार्य येणार आहेत ? मित्रा, तुला आठवतं ना ! भर सभेत झालेल्या अपमानानं घायाळ होऊन मी रंगमंचावर मान खाली घालून उभा असताना, दुर्योधना, तू धावत येऊन मला मिठी मारलीस आणि माझ्या मस्तकावर स्वतःचा राजमुकुट ठेवून सर्वांना ओरडून सांगितलं ना की कर्ण या क्षणापासून अंगदेशचा राजा आहे ! आपल्या दोघांच्याही डोळ्यांतून आसवं वाहात होती. त्या आसवांनी आपल्या जीवनाचे प्रवाह एकरूप झाले. त्या क्षणापासून राजाधिराज, कर्णाचं सारं जीवन आपल्या कल्याणासाठी वाहून दिलं आहे ! राज्य दिलं म्हणून नव्हे तर त्या निराधार कर्णाला कोणाची भीड मुरवत न ठेवता आपण पाठीशी घातलं म्हणून ! मला राज्याचा लोभ नाही ! भारतातील सारी राज्यं बेचिराख करण्याचं सामर्थ्य या कर्णाच्या मनगटांत आहे; पण कुणाच्याही सिंहासनाकडे मी अभिलाषेनं नजर टाकली नाही. माझ्या साऱ्या शक्ती उद्याच्या संग्रामासाठी संकलित होऊन राहिल्या आहेत. आणि म्हणूनच या रणदेवतेचा प्रसाद घेताना, राजाधिराज, आपल्या समोर शकुनी महाराज, आपल्या साक्षीनं, त्या देवतेच्या पायांवर हात ठेवून मी प्रतिज्ञा करणार

आहे, की पाचही पांडवांचा संहार केल्याखेरीज मी शस्त्र खाली ठेवणार नाही !

**दुर्योधन :** अंगराज, आपण माझ्या ऋणाचा उल्लेख केलात, पण खरोखर तुमचंच ऋण माझ्यावर इतकं मोठं आहे, की त्यातून उतराई होण्यासाठी अनेक जन्मही पुरणार नाहीत ! मी फक्त आपल्याला हस्तिनापूरच्या रंगमंचावर हात दिला. पण माझ्या पाठीशी असलेला आपला हात आयुष्यभर माझं रक्षण करीत आहे !

**परिचारक :** ( प्रवेश करून ) राजाधिराज, पूजेची सिद्धता आहे.

**शकुनी :** चला अंगराज, दुर्योधना, रणदेवतेचं दर्शन घेऊन आपल्याला राजमंदिरात जायचं आहे ! सारेजण आपली वाट पाहात असतील !

[ जातात. ]

## प्रवेश तिसरा

[ तीच रात्र. राजमाता कुंती आपल्या महालात देवाच्या मूर्तीपुढे उभी आहे. हातात पूजेचे तबक असून ती मिटल्या डोळ्यांनी देवाची प्रार्थना करीत आहे. प्रार्थना करीत असता महालाबाहेर आलेल्या भीमाचे पुढील शब्द व हास्य तिच्या कानांवर पडते : "—तो सारथीपुत्र कौरवांचा सेनापती झाला ! आणि सेनापती होताच पाची पांडवांचा निःपात करण्याची त्यानं प्रतिज्ञा केली ? " भीमाचे हे शब्द कानी येताच कुंती दचकते. कसल्या तरी असह्य वेदनेने व्याकुळ होते व तिच्या हातातील तबक खाली पडते. क्षणभराने स्वतःला सावरून घेऊन ती जमिनीवर पडलेले पूजासाहित्य गोळा करते व तबक देवाजवळ ठेवून अगतिकपणे आसनावर बसते. भीम आणि नकुल प्रवेश करतात. ]

**भीम :** कर्णाच्या पराक्रमाची आणि समरकौशल्याची भीती पांडवांनी कधीही बाळगली नाही ! आई, तू नेहमी म्हणत होतीस ना, की कर्ण कौरवांचं नेतृत्व कधीही पत्करणार नाही ! ऐक, आताच हस्तिनापुराहून वार्ता आली

आहे की, दुर्योधनानं कर्णाला सेनापती केलं आणि या उपकाराची परतफेड करण्यासाठी पाची पांडवांना ठार करण्याची त्या सूतपुत्रानं प्रतिज्ञा केली आहे.

**कुंती** : ( खाली मान घालून ) असं व्हायचं नाही.

**नकुल** : आई, कर्ण सेनापती झाला हे सत्य आहे. अप्रिय असलं तरी सत्य आहे ते !

**कुंती** : किती भयंकर सत्य आहे हे !

**भीम** : कर्णानं सेनापतिपद स्वीकारावं यात काहीही अघटित नाही ! काहीही अप्रिय नाही ! कर्णाच्या सद्‌गुणांमुळं दिपून गेलेली तुम्हा स्त्रियांची नजर त्याच्या दुर्गुणांकडे नेहमी दुर्लक्ष करीत असते ! आई, तुला वाटायचं की पांडवांचं भांडण कौरवांशी आहे, कर्णाशी नाही. पोटतिडकीनं तो कधी लढायचा नाही. अन् लढला तरी सेनापती व्हायचा नाही ! तुझं मला नवल वाटत नाही. माणुसकीच्या अतिरेकी भावनांनी स्त्रियांची नजर नेहमी अधू झालेली असते. मला आश्चर्य वाटलं ते श्रीकृष्णाचं. शिष्टाईच्या प्रसंगी कर्णाला पांडवांच्या पक्षाला आणण्यासाठी त्यांनी किती यातायात केली ! श्रीकृष्णांनासुद्धा या गोष्टीचा विसर पडला की, कर्ण कितीही थोर महात्मा असला तरी पांडवांचा मात्र तो साता जन्मांचा हाडवैरी आहे !

**कुंती** : कर्ण पांडवांचा हाडवैरी ! काय कारण कर्णाला पांडवांशी वैर करण्याचं ? पांडवांच्या कोणत्या वैभवाचा त्याला लोभ आहे ? वाटेच्या वाटसराला स्वतःचं आयुष्यही उपसून देणारा कर्ण— पांडवांशी वैर करून त्याला कोणतं राज्य मिळवायचं आहे ?

**भीम** : कीर्तीचं महत्त्व राज्यापेक्षाही अधिक आहे ! सिंहासनावर बसलेला राजा नव्हे, तर सिंहासनं आणि राजे निर्माण करणारा प्रतापी सेनानायक म्हणून कर्णाला कीर्ती मिळवायची आहे. दुर्योधनाच्या अंतःकरणात फक्त भाऊ-बंदकीचा द्वेष आहे. पण कर्णाला पांडवांचा पराक्रम खुपतो आहे ! कौरवांच्या अरेरावी मस्तकावर आपल्या शौर्याचं छत्र धरून पांडवांचा आणि कृष्णाचा पाडाव करण्याची त्याची महत्त्वाकांक्षा आहे. भाऊबंदकीच्या वैरापेक्षा महत्त्वाकांक्षेतून आणि मत्सरातून उद्‌भवलेलं वैर अधिक प्रखर असतं ! त्यात ही अधम कुळातल्या माणसाची महत्त्वाकांक्षा ! — उकिरड्यावरचं

रोपटं भोवतालच्या दुर्गंधीमुळं जास्त फोफावतं मात्र!

कुंती : ( आवेगाने ) भीमा, शंभरदा सांगितलं असेल, कर्णाच्या जन्माचा उल्लेख करून त्याचा उपमर्द करू नका. एकमेकाला मारायला तुमच्या तलवारी आणि धनुष्यं पुरेशी नाहीत का? हे विषारी शब्द आणखी कशाला हवेत? कर्णाच्याच काय, कुणाच्याही कुळाची, जन्माची अशी कुचेष्टा करणं हे पाप आहे रे! निव्वळ पाप आहे! कर्दमात उमललेलं कमळ आपल्या सौंदर्याच्या व सुगंधाच्या बळानं देवाच्या पायापर्यंत पोहोचू शकतं! कर्णाचा जन्म अधम कुळातला आहे हा काय त्याचा अपराध आहे? त्याच्या 'आई-बापांनी त्याचा त्याग केला हा काय त्याचा गुन्हा आहे? ज्या चांडाळणीनं आपलं पोटचं पोर दुसऱ्याच्या पदरात टाकलं तिची गुन्हेगारी आहे ही!—

नकुल : आई!

भीम : आई, तुझं अंतःकरण उदार आहे हे मला ठाऊक आहे. पण पांडवांच्या हाडवैऱ्यासंबंधी, त्या नीच रथकारासंबंधी इतक्या आवेगानं, इतक्या आपुलकीनं बोलायचं काय कारण?

कुंती : आईच्या अंतःकरणाची माया दुसऱ्या कुणालाहि कळायची नाही!

नकुल : आईच्या अंतःकरणाची माया! कर्णाशी या मायेचा आणि या अंतः-करणाचा काय संबंध?

कुंती : काय म्हणाले मी? — आईचं अंतःकरण! — हो — आईचंच अंतःकरण! लोकांच्या पायदळी पडणाऱ्या अनाथ मुलाला पाहिलं की प्रत्येक स्त्रीच्या अंतःकरणातील आई जागी होते. त्याला आपल्या पदराखाली झाकण्या-साठी धाव घेते ती. म्हणून म्हटलं, आईच्या अंतःकरणाची माया आहे ही!

भीम : उतू गेलेलं दूध मांजरालाही मिळत नाही आणि माणसालाही मिळत नाही! आई, तुझे हे उद्गार धर्मराजाच्या मातेला शोभण्यासारखे असले तरी वाऱ्यावर वाहणारं हे औदार्य काय उपयोगाचं? माझ्या जड शरीराचा गुणधर्म म्हणून असेल कदाचित, पण आकाशापेक्षा जमिनीवर संचार करणच मला जास्त सोईचं वाटतं. आईनं आपलं मातृप्रेम आपल्या स्वतःच्या मुलापुरतंच मर्यादित ठेवावं आणि वैऱ्यांनी वैऱ्यांचं रक्त पिण्यासाठी आकांक्षा बाळगावी या साध्या सरळ समजुतीच मला शिरोधार्य वाटतात.

**कुंती :** भीमा, मला राजकारण कळत नाही ! पण-पण—मला वाटतं समेटाची वेळ अद्यापही गेली नाही ! झाला तेवढा रक्तपात पुरे झाला असं मानून कौरव-पांडव अजूनही आपला वैराग्नी विझवणार नाहीत का ?

**भीम :** आई, काय भलतंच बोलते आहेस तू हे आज !

**कुंती :** आजच-आजच बोलले नाही तर पुन्हा कधीही बोलता येणार नाही मला ! — अजून समेट होणे अगदी अशक्य आहे का ? — आजच्या रात्रीच हे सारं थांबायचं नाही का ?

**भीम :** समेट ? पृथ्वीला कलंकभूत झालेल्या त्या दरोडेखोरांशी समेट ? समेट, सलोखा, शांतता हे शब्द त्या रौरवाच्या वतनदारांसाठी नाहीत ! प्रत्येक कौरवाचं आणि कौरवांना पाठीशी घालणाऱ्या त्या कर्णाचं धडावेगळं मस्तक लाथेनं तुडविल्याशिवाय आता समेट होणार नाही !

**नकुल :** आई, ज्या दिवशी आम्ही युद्धाचा निर्णय घेतला त्या दिवशी प्रथमतः तुझ्याच पायांवर डोकी ठेवून आम्ही सर्वांनी तुझा आशीर्वाद घेतला !

**कुंती :** होय, खरं आहे ते ! मी त्याच वेळी नाही म्हणून सांगायला हवं होतं ! पण मला धैर्य झालं नाही ! त्याच दिवशी जर मी नाही म्हणाले असते, श्रीकृष्ण हस्तिनापुराहून परत आल्यावर स्वतः उठून दुर्योधनाला, कर्णाला—कर्णाला भेटले असते तर हे सारं अमंगल ओढवलंही नसतं ! पण मी हो म्हटलं — तुम्हांला आशीर्वाद देणारे माझे हे करंटे हात जर कोणी जाळून टाकील——

**भीम :** आई ! आई ! काय झालंय तुला आज ? कसली व्यथा आहे तुझ्या अंतःकरणाला ! जगाला अजिंक्य झालेल्या पांडवांची वीरमाता तू——असं दुःख करण्याचं काय कारण तुला ?

**कुंती :** वीरमाता ! नाही, वीरमाता होण्याची आज मला आकांक्षा नाही ! नुसती माता आहे मी !

**भीम :** समजलो ! कर्ण सेनापती झाला म्हणून तू भयभीत झाली आहेस ! कर्णाच्या प्रतिज्ञेमुळे पांडवांच्या जीविताविषयी तुझं—आईचं अंतःकरण साशंक झालं आहे !

**कुंती :** माझं आईचं अंतःकरण पांडवांच्याच काय, साऱ्या जगाच्या भवितव्याविषयी साशंक झालं आहे ! कुरुक्षेत्रावर चाललेला हा भयानक रक्तपात पाहून

गांधारीप्रमाणं मीही डोळे झाकून घेण्याचं व्रत पत्करलं असतं तर बरं झालं असतं, असं वाटतं मला ! स्वकीयांच्या रक्ताची कारंजी आणि कौरव-पांडवांच्या कुलाचा क्षय पाहण्यासाठीच का देवानं हे डोळे मला दिले ? जखमी जीवांच्या किंकाळ्या आणि असंख्य विधवांचे टाहो, असंख्य मातांचे हंबरडे ऐकण्यासाठी का हे कान लाभले ? माणसाला लागलेली माणसाच्या रक्ताची ही तहान या साऱ्या सृष्टीचा विध्वंस केल्याशिवाय राहणार नाही !

**नकुल :** आई, या लढाईला पांडवांनी कधी आपण होऊन आमंत्रण दिलं आहे का ? कौरवांनीच आपल्या पराक्रमाच्या घमेंडीत हा वैराचा वणवा पेटवला आहे.

**भीम :** पांडवांनी यापूर्वीच लढाईला आमंत्रण दिलं नाही हीच खरोखर त्यांची चूक झाली ! माणसाच्या रक्ताची काय मातबरी ? दुष्टांचं निर्मूलन करून सृष्टी निष्पाप करण्यासाठी भीषण रक्तपाताचीही आवश्यकता असते !

**कुंती :** स्त्रियांच्या डोळ्यांनी या रक्तपाताकडे पाहिल्याशिवाय त्याची भीषणता तुम्हांला कळून यायची नाही ! आईच्या डोळ्यांनी, पत्नीच्या डोळ्यांनी, या रक्तपाताकडे जर तुम्ही क्षणभर पाहू शकाल तर तुमच्या हातांतील हत्यारं जमिनीवर निखळून पडतील ! तुम्ही आपल्या दांडगेपणानं आणि रक्तलालसेनं या नंदनवनाचा नरक करून ठेवला आहे, एवढं खरं. नरक, निव्वळ नरक केला आहे ! विश्वाच्या पसाऱ्यात किडे—कीटकापेक्षा अधिक महत्त्व नसलेली माणसं तुम्ही ! केवळ्या अहंकारानं तुम्ही या लढाया लढवीत बसता ! परमेश्वरानं हे सुंदर जग निर्माण केलं ते काय माणसाच्या वैरानं अन् रक्तानं डागळण्यासाठी ? माणसाला बुद्धी मिळाली ती काय परस्परांचे गळे चिरण्यासाठी ? आपलं मंदिर प्रकाशित करण्यासाठी देवानं माणसाच्या हातात हा दिवा दिला आणि त्यानं करंटेपणानं मंदिराला आग लावण्यासाठी मात्र त्याचा उपयोग केला करंटी—करंटी आहे ही माणसाची जात !

**भीम :** धर्मराज इतके शांतताप्रिय, क्षमाशील आणि उदार का, याचं कारण आज मला उलगडतं आहे ! आई, मी कृष्णासारखा तत्त्ववेत्ता नाही, पण पुरुषांना स्त्रियांची दृष्टी नाही याबद्दल मला समाधानच वाटतं ! स्त्रियांचा जन्म प्रेमासाठी आणि पुरुषांचा जन्म पराक्रमासाठी आहे. स्त्रीच्या प्रेमानं मानवी संसारात सौंदर्य निर्माण झालं असेल, पण या संसाराची प्रगती मात्र

पुरुषाच्या पराक्रमानंच होते !)

**कुंती** : कसला पराक्रम हा ! कसलं शौर्य हे ! वाघानं जंगलात जनावरं मारली तर त्याला हिंस्र म्हणायचं, वाटमारी करून कोणी कोणाचे गळे कापले तर त्याला दरोडेखोरी म्हणायचं, आणि सिंहासनाच्या लोभासाठी, नावाच्या खोट्या प्रतिष्ठेसाठी, काल्पनिक ध्येयाच्या नशेमध्ये माणसं परस्परांची उर फोडायला लागली तर त्याला पराक्रम म्हणायचं ! कसला हा पराक्रम ! पराक्रम आहे–जे व्यथित आहेत त्यांची व्यथा दूर करण्यात, जे दुःखित आहेत त्यांची आसवं पुसण्यात. शौर्य आहे—आपल्या सुखाची माती करून रंजल्यागांजल्यांची सेवा-चाकरी करण्यामध्ये. हे तुमचं शौर्य म्हणजे जंगली जनावरांचं शौर्य ! माणसाचं शौर्य माणुसकीची जोपासना करण्यात आहे ! तिचा वध करण्यात नाही !

**भीम** : आई, कर्ण सेनापती झाला म्हणून तुझं मन आज विचलित झालं आहे ! पांडवांच्या जीविताविषयी भीती वाटत असल्यानं तू असं बोलते आहेस ! पण मी निर्धारानं सांगतो की, पांडवांना कर्णाच्या प्रतिज्ञेची मुळीच भीती नाही ! गोग्रहणाच्या वेळी कर्णासकट साऱ्या कौरवांचं बळ पांडवांच्या शस्त्रांनी जोखलेलं आहे ! ज्या कर्णाच्या भीतीमुळं तू इतकी भांबावली आहेस त्याला जिवंत धरून तुझ्या पायांवर आणून टाकण्याचं सामर्थ्य आमच्या मनगटांत आहे. पण तुझी खरोखरीच इच्छा असेल की आज रात्री पांडवांनी दाती तृण धरून कौरवांना शरण जावं, दरबारात झालेली विटंबना विसरून द्रौपदीनं कौरवांपुढे पदर पसरावा, हस्तिनापुराच्या राज्या-वरील हक्क सोडून पांडवांनी पुन्हा वनवासात जावं,– तर तसं सांग ! त्यालाही आमची ना नाही ! पुत्रांच्या गौरवाची आणि मानापमानाची जर आईला किंमत वाटत नसेल तर पुत्रांनी तरी त्यासाठी तडफडण्याचं काय कारण ?

**कुंती** : नाही, माझं असं म्हणणं नाही ! पांडवांनी दुःखीकष्टी रहावं, अप-मानाचं जिणं जगावं, हे मला कसं सहन होईल ! बाळ, मी वेड्यासारखी बोलत राहिले. मला काय हवंय हे माझं मलाच समजत नाही ! जा तुम्ही आता. तुम्हांला विश्रांती घेतली पाहिजे !

**भीम** : आई, आम्ही जातो—पण तू मात्र उगाच जिवाला त्रास करून घेऊ

नकोस ! पाच अजिंक्य वीरांची तू माता आहेस. तुला काहीही काळजी करण्याचं कारण नाही ! तू स्वस्थ झोपशील ना ?

**कुंती :** हो, जा बाळांनो ! अगदी स्वस्थ झोपेन मी !

[ भीम व नकुल जातात. दासी प्रवेश करते. ]

**दासी :** राणीसाहेब, दिवे मालवायचे का ?

**कुंती :** हो. मालवून टाक सारे दिवे– आणि हे बघ, बाहेर जाऊन सारथ्याला माझा रथ सिद्ध करायला सांग.

**दासी :** आत्ता या वेळी ?

**कुंती :** होय, या वेळी ! ( दासी जाते. क्षणभराने )—मला काय हवं आहे माझं मलाच समजत नाही ! राजमाते, तू खोटं बोललीस ! तुला ठाऊक आहे, तुला काय हवंय ते ! तुला तुझा कर्ण हवा आहे.कर्णासाठीच हा सारा आक्रोश, ही सारी अंतःकरणाची तडफड ! एकट्या कर्णासाठी ? नाही, एकट्या कर्णासाठी नाही. माझी सारी मुलं मला हवी आहेत ! माझा कर्ण मला हवा आहे,माझे पांडव मला हवे आहेत! माझा कर्ण—पण कर्णावरती माझा काय हक्क उरला आहे आता ! माझ्या पोटचा गोळा, पण मी त्याचा अव्हेर केला. त्याची जन्माची वैरीण ठरले. मी कधी पदराखाली घेऊन त्याला दूध पाजलं नाही, कधी मांडीवर घेऊन त्याला अंगाई म्हटली नाही, कधी स्वतःच्या हातानं दोन घास त्याच्या तोंडात घातले नाहीत ! कुबेराच्या संपत्तीवर अधिकार असताना, मी त्याला भणंगाच्या घरात माझ्या हातानं लोटला ! ऐहिक जीवनाची सारी वैभवं त्याच्यापासून हिरावून घेतली आणि कमजातपणाचा कायमचा कलंक त्याच्या ललाटी लावून ठेवला ! चांडाळणी, तू त्याची खरोखर आई असतीस, तर तू जगाला ओरडून सांगितलं असतंस की, नाही, कर्ण सूतपुत्र नाही ! कर्ण अनाथ पोरका नाही. तो माझा पांडवांच्या मातेचा, भीष्माचार्यांच्या सुनेचा, पंडुराजाच्या पट्टराणीचा थोरला मुलगा आहे ! पण तो धीर मला झाला नाही. आजही होत नाही. पण कर्णाला सांगायचं धैर्य मात्र आज रात्री दाखवलंच पाहिजे ! काही झालं तरी मला कर्णाकडे जायला हवं. उद्या कर्ण पाच पांडवांचा वध करणार आणि पांडव कर्णाला ठार करायचा प्रयत्न करणार ! नाही ! उद्याचा दिवस उजाडण्यापूर्वी मला करता येईल ते केलं पाहिजे ! देवा, एक घटकाभर एक घटका-

भरच माझ्या पाठीशी उभे रहा ! कुंतीचं दुःख तुमच्याशिवाय दुसऱ्या कुणाला कळणार आहे ?

[ दासी दिवा घेऊन प्रवेश करते. ]

**दासी** : राणीसाहेब रथ सिद्ध आहे.

**कुंती** : चल, माझी तयारी आहे.

[ दोघी बाहेर जातात. ]

# अंक दुसरा

## प्रवेश पहिला

[ तीच रात्र. कौरवांच्या शिबिरातील एक रस्ता. जांघिल आणि वासंतिका प्रवेश करतात. ]

**जांघिल :** आनंदी आनंद ! वासंतिके, आज माझ्या डोळ्यांचं पारणं फिटलं ! माझी दृष्टी कृतार्थ झाली !

**वासंतिका :** तुमची दृष्टी कृतार्थ व्हायला एखाद्या अप्सरेचंच दर्शन व्हायला हवं !

**जांघिल :** सुंदरीचं दर्शन पुरुषांच्या दृष्टीला आवश्यक आहे. रोजच्या जीवनाची मीठ-भाकर आहे ती ! परंतु डोळ्यांच्या मेजवानीसाठी स्त्रियांच्या सौंदर्यापेक्षा अधिक भव्य देखावे दृष्टीला दिसावे लागतात. आज राजमंदिरात झालेला अभिषेकाचा समारंभ अभूतपूर्व होता. कर्णराजाच्या अभिषेकासाठी कौरवेश्वराचं सारं वैभव कोंदणासारखं उभं राहिलं होतं. सोन्या-चांदीच्या सिंहासनावर, जरतारीच्या पडद्यापुढे आणि जडजवाहिरांच्या झालरीमध्ये माझा मालक त्रैलोक्याच्या राजासारखा तळपत होता !

**वासंतिका :** तुमचा हा साजशिणगार पाहिल्यावर एखाद्याला वाटेल की तुम्हांलाच सेनापतिपदाचा अभिषेक होता ! अगदी विजयादशमीच्या घोड्यासारखे नटले आहात !

**जांघिल :** आजचा प्रसंगच तसा आहे ! आकाशातील नक्षत्रं काढून त्यांची माळ जरी गळ्यात घालता आली असती तरी ती देखील मी घातली असती.

आम्हा पुरुषांच्या आयुष्यात असे नटण्या – थटण्याचे प्रसंग फार क्वचित येतात ! स्त्रियांना नटण्याचं काही वाटत नाही, कारण आयुष्यभर त्यांचा तोच एक उद्योग निष्ठेनं चालू असतो ! पुरुषांची पारध करायला तुम्हांला शरीराचं सौंदर्य पुरं पडत नाही, म्हणून दागदागिन्यांनी आणि वस्त्रांनी त्यांचं आकर्षण नेहमी वाढवीत असता !

**वासंतिका :** स्त्रिया पुरुषांची पारध करतात हे नवीनच ऐकते आहे मी ! खरं म्हणजे पुरुषच स्त्रियांच्या मागे लागतात !

**जांघिल :** बिचाऱ्या पुरुषांना दुसरं गत्यंतर उरत नाही. लोहचुंबक समोर आला की, लोखंड ओढलं जाणारच ! पण पारध करणारं असतं लोहचुंबक, लोखंड नव्हे ! पारध करणाऱ्या तुम्ही स्त्रियाच, पण बिचाऱ्या पुरुषांना वाटतं की, आपणच पारध करीत आहोत. खरोखर, पट्टीचा वीर असो की प्रज्ञाशाली विद्वान असो, स्त्रीच्या समोर गेल्यावर त्याच्या शौर्याचा आणि विद्वत्तेचा अगदी लोळागोळा होऊन जातो. स्त्रिया अबला खऱ्या, पण आपल्या सान्निध्यात पुरुषांना मूर्ख करण्याचं त्यांचं सामर्थ्य फार मोठं आहे !

**वासंतिका :** जे असतं ते केव्हा तरी दिसतं एवढाच याचा अर्थ ! हे कुरुक्षेत्र म्हणजे पुरुषांच्या मूर्खपणाचा एवढा मोठा पुरावा आहे ! एका द्रौपदीचा पदर ओढला तर त्यासाठी रोज हजारो माणसांच्या कत्तली ! तेवढ्यासाठी प्रतिज्ञा किती आणि गर्जना किती ! काय मेलं त्या पदराचं महत्त्व !

**जांघिल :** चुकतेस तू ! हे महत्त्व पदराचं नाही. पदराच्या मालकिणीचं आहे ! उद्या तुझा पदर कोणी ओढला तर साधी शिवीगाळ सुद्धा व्हायची नाही, मग महायुद्धाची गोष्ट तर दूरच !

**वासंतिका :** मी तरी तेच म्हणते ! द्रौपदीच्या पदरापेक्षा माझ्या पदराचं महत्त्व का कमी असावं ? ती राजाची राणी झाली म्हणून एवढं कौतुक ! आम्हा दासांच्या आणि निर्धनांच्या वस्तीमध्ये रोज हजारो दुःशासन निर्माण होतात आणि हजारो पदरांची ओढाताण होते. पण त्याची वार्ता या गल्लीतून त्या गल्लीतसुद्धा जात नाही !

**जांघिल :** अगं, (धनिकांची नीती निराळी अन् निर्धनांची नीती निराळी; सोन्याचे कस वेगळे आणि लोखंडाचे कस वेगळे !)

**वासंतिका :** चुलीत गेलं ते सोनं ! धनिकांच्या नीतीसाठी शेवटी मरायचं मात्र गरिबांनी !

**जांघिल :** गरीब श्रीमंतांसाठी मरत नाहीत, स्वतःच्या पोटासाठी मरतात !

**वासंतिका :** ही श्रीमंतांची राज्यंच मेली बरखास्त केली पाहिजेत !

**जांघिल :** तोच तर द्वारकेच्या श्रीकृष्णाचा उद्योग आहे ! यादवांची सत्ता म्हणजे गरिबांची सत्ता, समाजाच्या खालच्या तळाचा वरच्या तळावरील विजय ! आजच कृष्णाला लोक अवतारी पुरुष मानीत आहेत, काही वर्षांनी त्याला परमेश्वरसुद्धा मानतील ! त्या गोकुळच्या गवळ्यानं साऱ्या प्रतिष्ठित राजेरजवाड्यांना गाईगुरांप्रमाणं हाकलण्याचा उद्योग आरंभिला आहे ! स्त्री-शूद्रांच्या उद्धारासाठी तो नवीन धर्मगीतेची प्रस्थापना करीत आहे ! जीर्ण झालेल्या धर्माचारांच्या आणि संभावितपणाच्या कवचातून तो अवतारी पुरुष भारताला मुक्त करीत आहे !

**वासंतिका :** हे तुमच्या मालकांनी ऐकलं तर एक दिवससुद्धा ते तुम्हांला जवळ ठेवायचे नाहीत !

**जांघिल :** अगं, चाकराची मतं म्हणजे खाली गळून पडलेली मालकाचीच मतं ! कर्णराजांचंही मत माझ्यासारखंच आहे !

**वासंतिका :** मग ते कौरवांच्या पक्षाला कसे ?

**जांघिल :** केवळ मतांचा प्रश्न असता तर कर्णमहाराज पांडवांच्या पक्षातच दिसले असते. पांडव स्वतः कसेही असले तरी ते श्रीकृष्णाच्या प्रकाशात उभे आहेत. पण हा मतांचा प्रश्न नाही. कर्णराजांची निष्ठा कौरवांच्या पक्षाला आहे. मतांपेक्षा माणसामाणसांतील ऋणानुबंधाला ते अधिक मानतात. लहान वयातील पोरकेपणामुळे असेल कदाचित, पण त्यांच्या अंतःकरणाला प्रेमाची चिरंतन भूक लागलेली आहे ! जो प्रेम घेऊन त्यांच्यासमोर येईल, त्याला ते काहीही नाकारणार नाहीत ! कौरवेश्वराचा अभिमान जेवढा मोठा, तितकंच त्याचं प्रेम करण्याचं सामर्थ्यही मोठं ! म्हणूनच कर्णराज कौरवांच्या पक्षात आहेत आणि इकडची पृथ्वी तिकडे झाली तरी कौरवांच्या पक्षातच राहतील.

**वासंतिका :** तुमच्या स्वामींवर कौरवेश्वराचं प्रेम खरं ! आजच्याइतका मोठा उत्सव या राज्यात कधीच झाला नसेल !

**जांघिल :** कर्णमहाराजांवर सर्वांचंच प्रेम आहे. त्यांचे शत्रुदेखील मनातून त्यांच्यावर प्रेम करतात ! भीष्माचार्य आणि कर्णमहाराज यांच्यामधून विस्तव जात नसे. पण अखेरच्या घटकेला आचार्यांनी कर्णराजांना हृदयाशी कवटाळून धरलं आणि त्यांच्या मस्तकावर अश्रूंचा अभिषेक केला. श्रीकृष्ण तर अद्यापही त्यांचं मन वळविण्याचा प्रयत्न करीत आहे. महाराजांशी सतत वैर धरलं आहे ते फक्त नशिबानं !

**वासंतिका :** नशिबानं ?

**जांघिल :** होय, नशिबानं ! कोणत्याही माणसाशी दैवानं इतकं भीषण शत्रुत्व केलं नसेल ! परंतु महाराज आपल्या पराक्रमानं दैवालाही पुरून उरले आहेत !

**वासंतिका :** दैव कधीही पराभूत होत नाही. अखेरचा आघात करण्यासाठी ते केव्हा आणि कोणत्या स्वरूपात समोर उभं राहील याचा नेम नाही ! )

[ कुंती प्रवेश करते ]

**जांघिल :** ही काळोखातून पुढं येणारी आकृती दैवाची नाही एवढं खरं !— बाई, आपण कुणाला शोधता आहात ?

**कुंती :** कर्णाचं निवासस्थान हवंय मला. आपण मार्ग दाखवाल तर फार आभारी होईन.

**जांघिल :** कर्णाचं निवासस्थान ? कशाकरता ?

**कुंती :** मी भिक्षेकरी आहे.

**जांघिल :** बाई दवंडी देऊन दानाची वेळ सर्वत्र जाहीर केली होती. ती वेळ आता संपून गेली आहे. भिक्षेकऱ्यांचा अधिकार फार मोठा हे मला मान्य आहे. पण भीक मागताना त्यांनी सुद्धा काळवेळेचं बंधन पाळलं पाहिजे.

**कुंती :** मला नाही पाळता आलं ते. मार्ग दाखविण्याची आपली इच्छा नाही असं दिसतं.

**जांघिल :** हा प्रश्न माझ्या इच्छेचा नसून दुर्योधनमहाराजांच्या इच्छेचा आहे !

**कुंती :** म्हणजे ?

**जांघिल :** कर्णमहाराज आता विश्रांती घेत आहेत. कोणत्याही याचकाला कोणत्याही वेळी कर्णाच्या निवासस्थानात मुक्त प्रवेश आहे हे खरं, पण कर्णराजांच्या विश्रांतीत व्यत्यय येऊ नये म्हणून कौरवेश्वरानं रात्री त्यांना

भेटण्याची सर्वांनाच बंदी केली आहे ! भिक्षेशिवाय जगातील इतर कोणत्याही गोष्टीचं महत्त्व आपल्याला वाटणार नाही. तरीपण महाराजांना आज विश्रांती घेणं आवश्यक आहे. उद्या संध्याकाळी पांडवांचा निःपात झाला तर कर्णाच्या शिबिरात तुमच्या अंगावर सोन्या-मोत्यांचे अलंकार चढतील ! तुम्ही स्वत: भिक्षेकऱ्यांना दान देत माघारी जाल इतकी भिक्षा मिळेल तुम्हांला !

**कुंती** : नाही ! मला आज—आत्ताच भेटायचं आहे त्यांना.

**जांघिल** : बाई, तुमच्यावर मोठं संकट ओढवलेलं दिसतं ! महाराजांकडे जाऊन तुम्हांला धनच घ्यायचं आहे ना ? मी देतो ते, हे घ्या. पण कृपा करून आता महाराजांकडे जाण्याचा आग्रह धरू नका.

**कुंती** : इतर कोणाकडूनही मला दान नको. कर्णाकडूनच मला हवंय ते–आणि तेही त्यांना प्रत्यक्ष भेटून !

**जांघिल** : तुम्ही सत्त्वपरीक्षेला निघाल्याप्रमाणं दिसता आहात. मी कर्णाच्या शिबिरातील अधिकारी आहे. त्या अधिकारानं मी सांगतो की, तुम्ही इथूनच परत जायला हवं. या वेळेस तुम्ही त्यांना भेटू शकणार नाही !

**कुंती** : प्रत्यक्ष परमेश्वरही माझा मार्ग अडवू शकणार नाही !

**जांघिल** : मला वाटलं होतं, या जगात उन्मत्तपणाचा पत्कर फक्त राजे-महाराजांनी घेतला आहे–पण नाही. कौरवांच्या राज्यातील भिकारीसुद्धा तितकेच उद्दाम दिसतात ! चला बाईसाहेब, आपल्याला महाराजांकडे नेण्यावाचून गत्यंतर नाही ! कारण महाराजांच्या कानावर आपल्या या सत्याग्रहाची वार्ता गेली तर मलाच त्याचे दुष्परिणाम भोगावे लागतील ! पण कृपा करून माझी एक अट तरी मान्य कराल का ?

**कुंती** : कोणती ?

**जांघिल** : महाराज झोपलेले असले तर आपण परत फिरावं !

**कुंती** : हो परत फिरेन मी.

**जांघिल** : ठीक ! चला, महाराज जागे असले तर तुमचं नशीब. चल वासंतिके, या बाईंना महाराजांच्या निवासस्थानापर्यंत पोहोचवून देऊ !

[ सर्व जातात. ]

## प्रवेश दुसरा

[ तीच रात्र. कर्ण आपल्या निवासस्थानी मंचकावर रेलून विश्रांती घेत आहे; जवळ जमिनीवर बसलेली माधवी एक गीत गात आहे. गीत संपताच ती भावनावेगाने पुढे जाऊन त्याच्या पायांवर डोके ठेवते. ]

**कर्ण :** ऊठ, माधवी ऊठ—

**माधवी :** महाराज —

**कर्ण :** हे काय, तू रडते आहेस! माझ्या पायांवरसुद्धा आसवं ओघळत आहेत तुझी! माधवी! ( हात धरून उठवतो. )

**कर्ण :** काय झालं माझ्या कोकिळेला? वासंतिक वैभवाचं मधुर कूजन करता करता हा पावसाळा का एकदम सुरू झाला? माधवी, बोलत का नाहीस?

**माधवी :** महाराज, मला आज भीती वाटते आहे!

**कर्ण :** चार शब्द उच्चारायला किती अडखळतेस? किती चाचरतेस! आज एकाएकी तुला माझी भीती वाटू लागली? कौरवांच्या दायादांना माझी भीती वाटते तेवढी पुरे आहे. पण संसाराच्या मांडवात उमललेल्या तुझ्यांसारख्या सुंदर, कोमल फुलाला भीती वाटावी असं माझ्या हातून काय घडलं आहे? सांगा, राणीसाहेब, कोणता अपराध झाला कर्णाच्या हातून? यां फुलाचं सुगंधी अंतःकरण मी कधी कुस्करलं आहे का!

**माधवी :** आपली परवानगी असेल तर एक विनंती करायची आहे!

**कर्ण :** त्यासाठी परवानगी कशाला? माधवी, आज कित्येक वर्षं माझ्या अंतःपुरात नव्हे, माझ्या अंतःकरणात तू आपल्या सौंदर्यानं आणि सौजन्यानं स्वामित्व गाजवीत आहेस! निःस्वार्थ प्रेम हे मानवी जीवनातील सर्वश्रेष्ठ ऐश्वर्य आहे! व्यवहारात पावलोपावली दग्ध होणाऱ्या पुरुषाच्या अंतःकरणाला स्त्रीप्रेमाची संजीवनी लाभली नाही तर त्याच्या जीविताची स्मशानभूमी होऊन जाईल! हे ऐश्वर्य, ही संजीवनी—माधवी, तुझ्याकडूनच कर्णाला लाभली आहे.

**माधवी :** महाराज, आपली सेवा करण्याचं भाग्य मला मिळालं यातच मी स्वतःला धन्य समजते. मी कसली आपल्याला संजीवनी देणार? पहाटेच्या

दवानं का समुद्राला भरती येणार आहे ! मी भाग्यवंत म्हणून आपल्या प्रेमाचा मला लाभ झाला. या प्रेमाच्या आधारानंच एक विनंती करण्याचं धाडस करते—

**कर्ण :** कसली विनंती ?

**माधवी :** कसं सांगू ?— अशा गोष्टींचा आपल्यापुढे उच्चार करायला देखील लाज वाटते ? महाराज, गेले तीन दिवस—

**कर्ण :** माझ्या जीवितासंबंधी तू चिंताक्रांत आहेस आणि तीन दिवसांत देवापुढे तीनशे नवस बोलली आहेस, एवढंच ना ?

**माधवी :** महाराज, मला भीती वाटते, फार भीती वाटते. गेले तीन दिवस मला भयंकर दुश्चिन्हं दिसत आहेत !

**कर्ण :** दुश्चिन्हं ?

**माधवी :** अशा भाकड गोष्टींवर आपला विश्वास बसायचा नाही हे मला ठाऊक आहे. पण आमच्या अडाणी अंतःकरणांना वाटतं की, या गोष्टी काही अकारण होत नाहीत. कुठे ना कुठे माणसाच्या संसाराशी त्यांचा संबंध आहे !

**कर्ण :** कोणत्या गोष्टी ? कसली दुश्चिन्हं दिसली तुला ?

**माधवी :** माझ्या स्वप्नांची कहाणी काही मी तुम्हांला सांगत नाही— तुम्ही म्हणाल की, तुझ्या मनात भीती आहे म्हणून तुझ्या स्वप्नातही भीती आहे ! पण साऱ्या पृथ्वीवर पाखर घालून बसलेल्या आकाशाला तर कसली भय-भीती नाही ? आज मघाशी तुमच्या अभिषेकाचा समारंभ चालू असताना, तुमच्या मस्तकावर कौरवेश्वरांनी सेनापतिपदाचा किरीट ठेवला आणि सैनिकांना दर्शन देण्यासाठी तुम्ही बाहेर आलात त्याच वेळी—

**कर्ण :** काय झालं ? कुलहीनाला सेनापतिपद मिळालं म्हणून आकाशातील सारी नक्षत्रं अश्रू गाळायला लागली ?

**माधवी :** श्रीफलाएवढा मोठा दिसणारा एक लाल तारा आकाशाच्या मध्या-वरून निखळून पडला ! डोळ्यांपुढं अंधेरी आणणारा देखावा होता. तो तांबडा लाल तारा वेगानं निखळून पडत असताना, आकाशाच्या शिखरा-पासून क्षितिजापर्यंत रक्ताची एक धारच वाहत आहे असं वाटलं.

**कर्ण :** माधवी, विश्वाच्या प्रचंड व्यापामध्ये परमेश्वराच्या सन्निध असलेले हे

अपार तेजोगोल ग्रामजोशांप्रमाणं माणसाचं भविष्य वर्तविण्याचं कार्य करीत आहेत असं मानणं यात माणसांचा गौरव असला तरी त्या नक्षत्रांचा अपमान आहे. यापेक्षा अधिक महत्त्वाचं कार्य विधात्यानं त्यांच्यासाठी योजलेलं असलं पाहिजे. माणसाचं दुर्दैव सांगण्यासाठी अशा तारका निखळून पडत असत्या तर आतापर्यंत आकाशामध्ये एकही नक्षत्र शिल्लक राहिलं नसतं ! )

**माधवी** ( लहानसहान सामान्य माणसांसाठी तारे तुटून पडत नाहीत. ज्यांच्या सामर्थ्यानं आणि नेतृत्वानं धरतीचे रंग पालटत असतात, सगळ्या मानव-जातीचं नशीब ज्यांच्या नशिबांशी बांधलेलं आहे, त्यांच्यासाठीच आकाशात हे नक्षत्रांचे लेख लिहिले जातात—)—महाराज, मला क्षमा करा, पण आपण उद्या रणांगणावर जाऊ नका अशी प्रार्थना आहे माझी !

**कर्ण** : उद्या रणांगणावर जाऊ नको ? माधवी, माझ्या आयुष्यातून भूतभविष्याचे सारे दिवस वजा करून ब्रह्मदेवानं उद्याचाच एक दिवस बाकी ठेवला तरी तो मी रणांगणावर खर्च करीन. सगळी दुश्चिन्हं खरी ठरली तर जास्तीत जास्त काय होईल ? कर्णाच्या आयुष्याची अखेर होईल एवढंच ना ? कर्णाला मृत्यूचं भय वाटत नाही ! व्यक्ताकडून अव्यक्ताकडे जाणारे प्रवासी आम्ही ! (पृथ्वीवरच्या धर्मशाळेतून आम्हांला उठून जायचं आहे हे जर आम्ही ध्यानात ठेवलं नाही तर तो केवळ अप्रबुद्धपणाच होईल ! जन्माच्या वेळीच माणसाचं मरण निश्चित होतं. त्याची भीती कशासाठी ! मनुष्य जगतो कसा आणि मरतो कसा याच गोष्टींचं या नश्वर संसारात महत्त्व आहे ! )

**माधवी** : पण महाराज—

**कर्ण** : जाऊ दे. नवखंड धरित्रीवर कौरवांचं अधिराज्य राहणार की पांडवांचं, याचा निर्णय उद्या लागायचा आहे. आणि हा निर्णय कर्णाच्या बाहुबलानं लागणार आहे !

**माधवी** : महाराज, आपली नजर उद्याच्या संग्रामाकडे लागली आहे. पण मला वाटतं की उद्या कधी उगवूच नये. आजची ही रात्र—ही रात्र काळी वस्त्रं नेसून कसल्यातरी अशिवाची प्रतीक्षा करीत एखाद्या राक्षसिणीसारखी समोर उभी आहे असं वाटतं ! आजच्या रात्रीबरोबर आलेला हा काळोख —

**कर्ण** : उद्याच्या उषःकालात विलीन होणार आहे ! माधवी, याच काय,

कोणत्याही रात्रीची भीती बाळगण्याचं कारण नाही ! रात्रीच्या अंधेऱ्या कहाणीला सूर्याचा सोनेरी पूर्णविराम प्रत्यक्ष विधात्यानंच देऊन ठेवला आहे ! मी आज आनंदात आहे. माधवी, आज मी आनंदात आहे. कोणत्याही अशुभाच्या अथवा भीतीच्या कल्पना आज माझ्या मनाला स्पर्श सुद्धा करू शकत नाहीत ! पण माधवी, माझ्यासाठी तू गाळलेली ही आसवं मी कधीही विसरणार नाही. आपल्यासाठी कुणाचेतरी डोळे निःस्वार्थपणानं ओले होत आहेत याची जाणीव असणं हे फार मोठं भाग्य आहे. माझ्या वैराण आयुष्यात हे भाग्य मला क्वचित लाभलं आहे. लहानपणी मी दूर जाऊन नजरेआड झालो म्हणून राधेनं आसवं गाळली असतील ! श्रीमंतांच्या मुलाप्रमाणं आपल्याही कमरेला मखमलीचं म्यान असावं, ताटात पक्वान्नांचं भोजन असावं, अथवा अंगावर जरतारीची वस्त्रं असावीत म्हणून मी घट्ट धरल्यावर राधेचं दारिद्य दोन्ही डोळ्यांनी रडताना मी पाहिलं आहे. पण तो काळ गेला. राधा गेली आणि माझ्या आयुष्यातली आसवंही गेली ! वाळवंटातील जीवन गेलं ! वाळवंटातील वाऱ्याप्रमाणं सभोवारचे सारे दाह अंगावर घेत मी एकाकीपणानं माझा मार्ग कापीत राहिलो. होय, मी यशस्वी झालो. कल्पनेलाही शक्य वाटलं नाही एवढं यश मी संपादन केलं. पण त्याच्यासाठी केवढी किंमत द्यावी लागली मला ! ज्योतीवरती झेप घेणाऱ्या पतंगाप्रमाणं जीवनातील साऱ्या गोष्टींकडे दुर्लक्ष करून मी उन्मत्तपणानं धावत सुटलो. मी यश मिळवलं ! पण या आनंदातच माझ्या दुःखाची कहाणी आहे. या विजयातच माझ्या पराजयाची वेदना आहे. साऱ्या मधुर मंगल मनोवृत्तींच्या प्रेतावर पाय ठेवून मी यशाची उपासना केली. यश मिळालं. पण एखादे वेळी वाटतं की, जे मिळवलं त्यापेक्षा जे हरवलं ते फार मोलाचं होतं ! माणुसकीचं अधिष्ठान असेल तरच माणसाच्या पराक्रमाचं महत्त्व आहे. नाहीतर जंगलातील श्वापदांचा पराक्रम तो ! ही माणुसकी माझ्या पायाखालून निखळत चालली आहे असं मला वाटतं—

**माधवी :** महाराज, माणूस दुसऱ्याला ओळखतं पण स्वतःला मात्र ओळखत नाही, असं म्हणतात. आपल्या बाबतीत सुद्धा खोटं नाही ते. माणुसकी आपल्या अंतःकरणात माहेरी येऊन राहिलेली आहे !

**कर्ण :** कुणास ठाऊक ! या वणव्यात कोमल सद्गुणांच्या वेली अदग्ध राहिल्या

असतील तर ते आश्चर्यच म्हणावं लागेल! माझ्यासारख्या दारिद्र्यात वाढलेल्या, आईबापांचा ठावठिकाणा नसलेल्या—

**माधवी** : महाराज, वारंवार असं वेडंवाकडं बोलू नये. सारं जग म्हणतं की आपण सूर्यपुत्र आहात!

**कर्ण** : (हसतो) सूर्यपुत्र! सूर्यपुत्र! एका कमजात सारथ्याच्या खोपट्यात वाढलेला हा दरिद्री, बिनबापाचा कर्ण. कौरवेश्वराच्या शेजारी बसू लागल्यावर दरबारातील खुषमस्कऱ्यांनी तयार केलेली ही एक दंतकथा आहे! सूर्यपुत्र कुठला? मी सूतपुत्रदेखील नाही! सूतपुत्र म्हणून माझी नालस्ती करणारेसुद्धा माझा गौरवच करीत असतात. कोणातरी कुमारिकेच्या अथवा विधवेच्या पोटातून बाहेर पडलेला पापाचा गोळा आहे मी! कोण होती माझी आई कुणास ठाऊक! राजमहालात राहणारी एखादी राणी असेल किंवा उकिरड्यावर लोळणारी एखादी कंगाल भिकारीणही असेल!— माधवी, तुला एक सांगून ठेवतो. तुझ्या एखाद्या मैत्रिणीला, बहिणीला, मुलीला कधी काळी असं अनौरस अपत्य झालं, तर जन्माला येताक्षणीच त्याची मान मुरगाळून रक्ताळलेल्या बाळंत्याबरोबर त्याला उकिरड्यावर फेकून द्या! त्याला जिवंत ठेवू नका! नीतीअनीतीची महती मला वाटत नाही! अनिर्बंध संबंधात सुख वाटलं तर ते खुशाल मिळवा. पण त्या सुखाच्या पोटी जन्माला येणारं दुःख मात्र जिवंत ठेवू नका! कपाळावर बलिदानाचा शिक्का मारून त्या हतभागी जीवाला जगामध्ये एकट्यानं पाठवू नका! हिंस्र लांडग्यांनी आणि दांभिक जंबुकांनी भरलेलं जग आहे हे! या श्वापदांच्या गर्दीतून वाट काढणाऱ्या त्या एकाकी निराधार जीवाला ज्या यातना होतील त्याचं पाप आपल्या माथ्यावरती घेऊ नका!

**माधवी** : महाराज—

**कर्ण** : आजच्या या आनंदाच्या आवेगात माझं दुःखदेखील अंतःकरणाची कपाटं फोडून बाहेर येऊ लागलं! पण जाऊ दे, माझ्या पराक्रमाच्या, माझ्या महत्त्वाकांक्षेच्या सफलतेचा सुवर्ण क्षण या अंधाराच्या पडद्यामागं येऊन उभा राहिला आहे! आनंद—साऱ्या वातावरणातून आनंदाचे झरे झिरपताहेत आज!

[पडद्यात—**द्वारपाल** : थांबा जरा. नाही, आपण आत जाऊ

शकणार नाही ! कुंती : मी आत गेल्याशिवाय राहणार नाही ! उद्या नाही ! आजच-आताच मला कर्णाची भेट घ्यायची आहे ! तुम्ही जाऊ देणार नसाल तर इथूनच मी कर्णाला मोठ्यानं हाक मारीन ! कर्णा ! कर्णा !–मला तुझी भेट हवी आहे ! ]

**कर्ण :** कर्णाची भेट हवी आहे ? आणि त्याच्यासाठी एवढी दंगल ! द्वारपाल !–

**द्वारपाल :** ( प्रवेश करून ) महाराज, कोणी तरी स्त्री आपल्याला भेटण्यासाठी आली आहे. मी तिला पुष्कळ सांगितलं की महाराज झोपायच्या तयारीत आहेत——

**कर्ण :** झोपायची तयारी म्हणजे झोप नव्हे ! कर्णाच्या दाराशी कुणासही प्रतिबंध होता कामा नये. नाव ?

**द्वारपाल :** नाव सांगायला तयार नाही ती ! प्रत्यक्ष भेटीत महाराजांनाच नाव सांगेन असं म्हणते ती !

**कर्ण :** एकटीच आहे ?

**द्वारपाल :** होय. एकटीच आहे.

**कर्ण :** ठीक, पाठवून दे तिला आत.

[ द्वारपाल जातो. ]

**माधवी :** मला आज्ञा द्यावी.

**कर्ण :** का ?

**माधवी :** येणारी स्त्री आहे, आग्रही आहे आणि एकटी आहे. आपणही आज आनंदात आहात. मी कशाला राहू इथं ? माझ्यामुळं तिच्या कामात व्यत्यय यायचा एखादे वेळी !

**कर्ण :** ( स्मित करीत ) रुसलीस वाटतं ? न आलेल्या, न देखलेल्या स्त्रीचासुद्धा इतका मत्सर ?

**माधवी :** रात्री पुरुषाच्या महालात असलेल्या स्त्रीला, महालाच्या दाराशी एकट्यानं आलेल्या स्त्रीचा मत्सर वाटणार नाही तर काय होईल ?

**कर्ण :** पण ती कोण आहे, कशी आहे, याचासुद्धा अद्याप पत्ता नाही. ती कोणीही असू शकेल ! दान मागण्यासाठी आलेली एखादी भिकारीण असेल, प्रेम मागण्यासाठी आलेली एखादी प्रमदा असेल, नाहीतर-नाहीतर-( हसतो ) इतकी वर्षे अंधारात दडून राहिलेली माझी ती अज्ञात आईही असू शकेल !

[कुंती तोंडावर पदर ओढून प्रवेश करते व दाराजवळ उभी राहते.]

**कर्ण** : कोण आपण ?

**कुंती** : मी—मी—

**कर्ण** : सांगा, भिण्याचं मुळीच कारण नाही.

**कुंती** : मला आपल्याला—आपल्याला एकट्यालाच भेटायचं आहे !

**कर्ण** : कशासाठी ?

**कुंती** : आपल्या दाराशी मी भिकारीण म्हणून आले आहे. एक दान हवंय मला !

**कर्ण** : कोणतं दान ?

**कुंती** : ते मला इतरांसमोर सांगता येणार नाही.

[माधवी जायला निघते.]

**कर्ण** : ही स्त्री माझ्या विश्वासातील आहे ! ती इथंच राहील. आपण कसलाही संकोच बाळगू नका. काय हवंय आपल्याला ?

**कुंती** : मला—मला माझा मुलगा हवा आहे !

**कर्ण** : तुमचा मुलगा ? हरवला आहे तो ?

**कुंती** : होय.

**कर्ण** : बाई, आपण भलत्या ठिकाणी आलात ! प्रकाशाचा शोध घेण्यासाठी अमावास्येनं अंधाराच्या घरी जाण्यासारखं आहे हे ! तुमचा मुलगा हरवला आहे, माझी आई हरवली आहे, समदुःखातून उद्‌भवलेल्या सांत्वनाशिवाय मी काय करू शकणार ? कुठं होता तुमचा हा मुलगा ?

**कुंती** : इथंच आहे !

**कर्ण** : या कुरुक्षेत्रात आहे ? इथं तुमचा मुलगा शोधून काढणं म्हणजे समुद्राच्या वाळवंटातून हरवलेला रेतीचा कण शोधण्यासारखं आहे ! कर्ण कितीही सामर्थ्यवान असला तरी त्याच्याही सामर्थ्याला मर्यादा आहे ! बाई, हे अशक्य आहे.

**कुंती** : माझा मुलगा इथंच आहे, या महालात आहे. माझ्यासमोर उभा आहे !

**कर्ण** : समोर उभा आहे? समजलो, समजलो! मला आई नाही आणि तुम्हांला मूल नाही, या दोन गोष्टींचं गणित मांडून तुम्ही माझी आई व्हायला सिद्ध झाला आहात ! मी कृतज्ञ आहे. माझ्या आयुष्यातील सर्वश्रेष्ठ दिवस उद्या उगवणार आहे. पांडवांच्या निःपाताची प्रतिज्ञा मला उद्या पुरी करायची आहे.

त्यापूर्वीच्या या रात्री एका खोट्या आईचे का होईना, पण आशीर्वाद मिळाले तर मला हवेच आहेत.

**कुंती :** कर्णा !

**कर्ण :** तुमचं दु:ख खरोखरच्या आईसारखंच दिसतं आहे ! बाई, तुमचं नाव काय ?

**कुंती :** खोटी आई नाही रे ? मी—मी—

**कर्ण :** कबूल, तू खोटी आई नाहीस ! पण नाव काय तुझं ? कुठून आलीस तू ?

( कुंती निर्धाराने पुढे येते व तोंडावरील वस्त्र बाजूला करते. )

**कर्ण :** विस्मित होऊन क्षणभर थांबतो. माधवी—

( माधवी बाहेर जाते. )

**कुंती :** मी पांडवांच्या शिबिरातून आले– माझं नाव–मी—

**कर्ण :** होय, आपण राजमाता कुंती ! भगवती, आपल्या अनपेक्षित दर्शनानं मी भांबावून गेलो आहे. आपल्या येण्याचा व बोलण्याचा मला काहीच बोध होत नाही ! या अवेळी आपण माझ्या निवासात कशासाठी आलात ? आपण मला मुलासारखं मानता हे खरोखर माझं सौभाग्य आहे, पण हे अश्रू कशाकरता ? कोणतं दु:ख घेऊन आपण कर्णाच्या शिबिरात अवेळी येण्याचं हे अपूर्व धाडस केलंत ?

**कुंती :** कर्णा, तुझ्या उदार मनाची प्रचीती साऱ्या जगाला आली आहे. आज मला हवी आहे ती. मला भिक्षा हवी आहे तुझ्याकडून एक. मी राजमाता व महाराणी असले तरी तुझ्या दाराशी भिकारीण म्हणून आले आहे !

**कर्ण :** आपल्यासारख्या श्रेष्ठ व देवतारूप स्त्रिया भिकारीण झाल्यावर, देण्याघेण्याचा तो अपूर्व सोहळा पाहण्यासाठी आकाशातले चंद्रसूर्यसुद्धा जागच्या जागी स्थिर होतील ! आपल्याला दान देण्यानं माझीच श्रीमंती वाढणार आहे ! सांगा, कोणतीही गोष्ट करायला सांगा, कोणतंही मागणं मागा. त्या शब्दांच्या उच्चाराबरोबर तुमची इच्छा सफल झाली असं समजा !– पण राजमाता या आसनावर बसणार नाहीत का ? आपण रात्रीच्या काळोखातून वाटचाल करीत माझ्याकडे यावं या गोष्टीनंच मी खरोखरी लज्जित झालो आहे. आपण बसलात तर—

[ कुंती आसनावर बसते. ]

कर्ण : काय हवंय आपल्याला ?

कुंती : तू मला वचन दिलं आहेस की, मागणीच्या उच्चाराबरोबर ती पुरी होईल म्हणून !

कर्ण : होय, दिलं आहे. आणि कर्णाचं वचन कधीही अन्यथा होणार नाही. केव्हाही झालेलं नाही. अर्जुनाकडून आलेल्या वृद्ध याचकाला कवच-कुंडलांच्या रूपानं स्वतःच्या जीवनशक्तीचंही मी दान दिलं आहे.

कुंती : मला हवं असलेलं दान त्याहूनही द्यायला कठीण आहे ! म्हणूनच विचारते, वचन दिलं हे नक्की ना ?

कर्ण : कर्णाच्या वचनाबद्दल शंका प्रकट करणं म्हणजे, भगवती, त्याचा उपमर्द करण्यासारखं आहे ! सांगा, काय हवंय आपल्याला ? आपल्याला संपत्ती हवी असेल तर कर्णाचा सारा जामदारखाना आपल्या पायांवर समर्पण केला जाईल. पण पांडवांची माता संपत्तीसाठी शत्रूच्या शिबिरात चालून येईल हे संभवत नाही. पाच मुलांच्या रूपानं जगातील सारं ऐहिक ऐश्वर्य तिच्याभोवती उभं आहे. काय हवंय आपल्याला ? —पाची पांडवांचा संहार करण्याचा मी निर्धार केला आहे; त्यांना जीवदान मागण्यासाठी तर आपण आला नाहीत ?

कुंती : समज, मी मागितलं तर देशील का ते ?

कर्ण : होय, तेही देईन ! प्रतिज्ञाभंगापेक्षा याचकाला विन्मुख पाठविण्याचं दुःख कर्णाला अधिक आहे. पांडवांच्या समरशक्तीवरचा विश्वास ढळून राजमाता जर कर्णाकडे येऊन त्यांच्यासाठी जीवदान मागू लागली, तर ते द्यायला मलाही तयार झालं पाहिजे. पण पांडवांच्या पराक्रमाचा असा अपमान करायला आपण तयार आहात का ? माया ही आंधळी असते हे मला ठाऊक आहे. पण पोटच्या पोरांवर इतका घोर अन्याय करण्याइतकी ती आंधळी होऊ शकते का ? पांडवांसाठी जीवदान मागण्याची तुमची तयारी आहे ?

कुंती : होय, मला पांडवांसाठी जीवदान हवं आहे ! पण मला पांडवांसाठी जीवदान हवं त्यांच्या वैऱ्याकडून नको तर मित्राकडून. दानाचं जीवदान नको, हक्काचं हवं आहे.

कर्ण : पांडवांचा माझ्यावर कोणता हक्क आहे ? माझ्यावर कुणाचा हक्क असेल

तर तो फक्त कौरवेश्वराचा !

**कुंती** : माझाही तुझ्यावर हक्क आहे.

**कर्ण** : कसला हक्क ?

**कुंती** : आईचा !

**कर्ण** : होय, ते मी विसरलोच ! आल्याबरोबर आपण माझ्यावर मातृप्रेमाचा वर्षाव करू लागला होता. भगवती, क्षमा करा. पण मानीव आई म्हणून मी आपल्याशी एक शब्दही बोलायला तयार नाही. आईचं नातं इतक्या सुखासुखी मिळत नाही, मानताही येत नाही ! कल्पनेनं आई निर्माण करता आली असती तर कर्णाच्या भोवती मानीव मातांचा वेढा पडला असता— पण होत नाही ते ! ज्या राधेनं स्वतःच्या पदराखाली माझं पालन-पोषण केलं तिलासुद्धा मी आई मानू शकलो नाही ! मग इतरांची काय कथा ! राजकुलाच्या ऐश्वर्यासह आलेलं हे मानीव मातृत्व मी मोठेपणाच्या लालसेनं स्वीकारीन, असा आपला समज असेल तर तो साफ चुकीचा आहे ! जाऊ द्या, या भलत्या विषयाची चर्चा करण्याचं कारण नाही ! मी पांडवांच्या आईशी पांडवांची आई म्हणूनच बोलेन. पांडवांना जीवदान हवं आहे म्हणून सांगा. या घटकेला कौरवेश्वराकडे जाऊन माझ्या सेनापतीपदाचा त्याग करायला मी तयार आहे. माझी छी थू होईल, निंदा–नालस्ती होईल, कर्ण भयभीत झाला असा डांगोरा माझे हितशत्रू पिटतील, पण मला पर्वा नाही त्याची ! मी तुम्हांला वचन दिलं आहे आणि ते पूर्ण करायला मी सिद्ध आहे !

**कुंती** : तुझी निंदा-नालस्ती व्हावी, तुझ्या वीरतेजाची विटंबना व्हावी, हे मलाही सहन व्हायचं नाही—कधीही सहन व्हायचं नाही !

**कर्ण** : मानीव आईच्या प्रेमामुळंच ना ?

**कुंती** : नाही ! मानीव नाही ! मानीव नाही ! कर्णा, कसं सांगू तुला ? मी तुझी मानीव आई नाही ! मी तुझी खरी आई आहे ! खरी आई आहे !

**कर्ण** : काय बोलता आहात आपण ? पुत्रवधाच्या कल्पनेनं आपण भ्रमिष्ट झाला आहात का ?

**कुंती** : मी सांगते ते सत्य आहे ! परमेश्वराला स्मरून सांगते, हे सत्य आहे. कर्णा, जन्मापासून दुरावलेली तुझी आई, तुझी प्रत्यक्ष आई तुझ्यासमोर

उभी आहे. मी मानीव आई नाही. नऊ महिने तुझ्या गर्भाचा भार पोटात वागवला आहे मी.

**कर्ण** : ( भांबावून ) तू माझी आई आहेस ?

**कुंती** : होय !

**कर्ण** : माझा विश्वास बसत नाही ! खोटं आहे हे सारं ! सत्य अप्रिय असतं म्हणतात, पण ते इतकं विलक्षण, इतकं भीषण, असू शकणार नाही. माझ्या ललाटावर दुर्दैवाची तप्तमुद्रा मारलेली आहे हे मला ठाऊक आहे. पण या दुर्दैवाची अशी परिसीमा करण्याइतका परमेश्वर पाषाणहृदयी व्हायचा नाही ! तू माझी आई, म्हणजे पांडव माझे भाऊ ! माझे वैरी माझे भाऊ ! नाही, साफ खोटं आहे हे ! देवी, कशासाठी माझ्या जीवनाशी हा भयानक खेळ करीत आहात ? खोटं आहे सारं ! माझी दिशाभूल करून, मला हतबल करून पांडवांना सुरक्षित ठेवण्याचं हे कुटिल कारस्थान आहे !

**कुंती** : कर्णा, हे खोटं असतं तर रात्री-अपरात्री, आसवं ढाळीत तुझ्या शिबिरामधे एकट्यानं येण्याचं धाडस मला झालं असतं का ? मी सांगते ते खरं आहे. सारं लज्जास्पद आहे. तू माझा पहिला, सर्वांत थोरला मुलगा आहेस. कुंवारपणात मी मोहाला बळी पडले आणि तुला जन्म दिला. मी भयभीत झाले ! थोर कुळाची प्रतिष्ठा चिरेबंद भिंतीसारखी माझ्या सभोवार उभी होती. ही भिंत ओलांडण्याचं, संकटांची परंपरा अंगावर ओढून घेण्याचं धैर्य मला झालं नाही. मी माझ्या लाडक्याचा त्याग केला. राधिकेच्या दाराशी माझ्या पोटचा गोळा नेऊन टाकला !

( तोंड हातांनी झाकून घेते )

**कर्ण** : कारस्थान ! सारं कारस्थान ! कपोल-कल्पित कारस्थान !

**कुंती** : ( वर पाहात ) पाची पांडवांची शपथ घेऊन मी सांगते की मी तुझी आई आहे !— माझ्या डोळ्यांकडे पाहा, मी खरं बोलते आहे हे तुला समजून येईल. तुला आठवत नाही का ? या तीन तपांच्या काळात मी तुझ्याशी कधी बोलले नाही, तुझ्यासमोर येऊन उभं राहण्याचं धाडस केलं नाही. तुझ्या चरित्राचा, तुझ्या मोठेपणाचा लांबून कानोसा घेत सतत अपराधीपणानं मी तुझ्यापासून दूर राहिले. मी तुझी आई नसते तर तुझ्यापुढे यायला मला अशी शरम वाटली असती का ?

**कर्ण** : खरं वाटायला लागलं ! मलासुद्धा खरं वाटायला लागलं ! तुझी नजर नेहमी भीतीनं, लज्जेनं दूर पळत होती. पण त्या भयभीत डोळ्यांतही मायेचा ओलावा चमकून जात असे ! मला नवल वाटायचं ! पण आता उलगडा झाला ! होय. धर्मराजाची आई मोहवश होऊन कुंवारपणात आपल्याला जन्म देईल, पण कर्णाचा तेजोभंग करण्यासाठी ती त्याच्याकडे जाऊन काही कपोल-कल्पित कहाणी सांगेल हे संभवत नाही. हे खरं असावं ! पण हे आणखी कोणाला ठाऊक आहे का ?

**कुंती** : होय, भीष्ममामंजींना ठाऊक होतं. श्रीकृष्णालाही ठाऊक आहे !

**कर्ण** : श्रीकृष्णालाही ठाऊक आहे ! तरीच ! तरीच ! श्रीकृष्णाच्या शिष्टाईचा अर्थ आता माझ्या ध्यानात येत आहे. कर्णा, तू पांडवांच्या पक्षाला येशील तर पांडव तुला थोरला भाऊ मानून साम्राज्याचं उदक तुझ्या पायांवर सोडायला तयार आहेत ! थोरला भाऊ मानून अं ! मला वाटलं माझ्या थोर पराक्रमाला पांडव औदार्याची लाच देत आहेत. पण नाही— तो माझा हक्क होता ! थोरल्या भावाचा हक्क ! मी कुंतीचा मुलगा, पांडवांचा भाऊ ! ज्यांच्या रक्तानं मी उद्या स्नान करणार त्या हाडवैऱ्यांचा भाऊ ! एकाच आईच्या कुशीतून मी आणि माझे वैरी बाहेर पडलो ! ( मोठ्याने हसतो. ) सापडली ! माझी आई सापडली ! जन्मभर मी जिचा शोध करीत होतो ती सापडली ! या— देवदेवतांनो, आकाशात या, आणि माझ्यावर, माझ्या आईच्या अंगावर पुष्पांचा वर्षाव करा ! यक्ष गंधर्वांनो, गीत— वादनाच्या मैफली झडू द्यां. नद्यांनो, सागरांनो, क्षणभर स्तब्ध रहा आणि आपल्या पाण्याचं पवित्र सिंचन आमच्या मस्तकांवर करा. माझी आई सापडली ! कर्णाची आई— कर्णाची आई सापडली !

**कुंती** : ( उठून जवळ जात ) बाळ, कर्णा, लाडक्या——

**कर्ण** : बाळ ! बाळ ! कर्णाची प्रत्येक पावलाला विटंबना करणाऱ्या दुष्टांनो, ऐकलंत का हे ? पांडवांची माता, हस्तिनापुराची सम्राज्ञी, पंडूची पट्टराणी, कर्णाला बाळ म्हणते आहे. मी सूतपुत्र नाही ! अधम कुळातला नाही ! मी महाराणी कुंतीचा मुलगा आहे ! मी राधेय नाही, कौंतेय आहे ! ऐका— विश्वातील साऱ्या सुष्ट-दुष्ट शक्तींनो, दांभिकांनो, वैऱ्यांनो, मित्रांनो, सारेजण ऐका-मी कौंतेय आहे ! [ बेहोष होऊन आसनावर पडतो. ]

**कुंती :** ( त्याला छातीशी घेऊन ) कर्णा, माझ्या लाडक्या ! जरा वरती पाहा !

**कर्ण :** आई ! आई ! मला रडू दे. मला दुसरं काही नको. मला फक्त रडायचं आहे. आईच्या छातीवर पडून रडायचं आहे. आज कैक वर्षं रोखून ठेवलेलं रडू आहे हे ! — आई —

**कुंती :** एवढ्याच समाधानाचा मला अधिकार आहे. कर्णा, तुझ्याजवळ मी वचन मागितलं याची मला क्षमा कर. कसलाही सौदा करायचा नाही मला आता ! तू पांडवांच्या पक्षाला येऊन त्यांना संरक्षण द्यावंस आणि त्यांच्या वैभवाचा ज्येष्ठ अधिकारी व्हावंस असं सांगण्यासाठी मी तुझ्याकडे आले होते. पण आता माझं काहीहीं मागणं नाही. मला काहीही नको. तू मला आई म्हणून हाक मारलीस. जन्मापासून दुरावलेल्या माझ्या लाडक्या बाळाला मी आज हृदयाजवळ घेऊ शकले, यातच सारं काही पावलं आहे मला ! फार मोठ्या सुखाचा या अभागिनीला लाभ झाला आहे !

**कर्ण :** अरेरे ! परमेश्वरा, कर्णाच्या जीवनाशी का अशी क्रूर लीला करतो आहेस ?

**कुंती :** बाळ, जरा शांत हो ना !

**कर्ण :** ( उठून ) शांत होऊ ! आता कुठली आली आहे शांतता ? वणव्या-प्रमाणं जळत राहणं आणि जळता जळता नाहीसं होणं एवढंच शिल्लक राहिलं आहे आता ! तू—तू माझ्या जीवनाचा असा विध्वंस केलास ! पांड-वांच्या पक्षाला येऊ काय ? दुर्योधनाकडे जाऊन त्याला हे सांगू ? — जन्मा-पासून जिनं माझा विश्वासघात केला तिच्या शब्दासाठी, जन्मभर ज्यानं माझ्यावर पराकोटीचं प्रेम केलं त्या मित्राशी ऐनप्रसंगी मी द्रोह करीत आहे म्हणून ? नाही, महाराणी, खोटेपणा, विश्वासघात आणि द्रोह या गोष्टींची सवयीमुळे आपल्याला काहीच खंत वाटत नसेल. पण कर्णाला त्या त्याज्य वाटत आहेत !

**कुंती :** तू कौरवांचा पक्ष सोडावास असा आग्रह मी आता एका शब्दानंही करणार नाही. तू आपल्या मित्रांशी द्रोह करू नकोस !

**कर्ण :** आणि पांडवांच्या रक्तानं माझे हात माखून घेऊ ! वडील भावानं धाकट्यां-साठी आपल्या सर्वस्वाचं बलिदान करावं, आपल्या पराक्रमाच्या पंखांखाली त्यांना सुरक्षित ठेवावं,— पण कर्णाचं नशीब असं बलवत्तर की, त्याला

आपल्या धाकट्या भावांच्या छातीवर धनुष्य रोखल्याशिवाय गत्यंतर नाही. मित्रद्रोह नको म्हणून बंधुद्रोह करायचा आणि बंधुद्रोह नको असेल तर मित्राचा गळा कापायचा! ज्या एकाच गोष्टीचं मूल्य मी जीवनापेक्षा अधिक मानीत आलो तिचा हा विनाश उघड्या डोळ्यांनी कसा सहन करू! आई– आई – कशाला सांगितलंस हे ?

**कुंती** : ही निर्वाणीची रात्र येऊन ठेपल्यावर मला राहवलं नाही. जे धैर्य आयुष्यभर दाखवता आलं नाही ते या अखेरच्या रात्री तरी दाखवावं, अशा निर्धारानं आले मी. माझा अपमान होईल, विटंबना होईल याची मला जाणीव नव्हती असं नाही. पण आईच्या अंतःकरणानं मला धीर दिला. आईच्या अंतःकरणानं मला इथं ओढून आणलं!

**कर्ण** : आईचं अंतःकरण! असली अधम, भेकड अंतःकरणं वरच्या गोजिरवाण्या स्तनांसकट हत्तीच्या पायाखाली ठेचली पाहिजेत. कुंती, तीन पांडवांना तू दूध पाजून वाढवलंस, दोघांच्या मस्तकांवर आपल्या पैठणीच्या पदराची छाया धरलीस! पण या पहिल्या कौंतेयाला मात्र तू हलाहल पाजून त्याचं जीवन बरबाद केलंस; उष्ट्या खरकट्याप्रमाणं त्याला राधेच्या लक्तरात टाकून दिलंस! स्वतःच्या सुखाचा मार्ग निर्वेध करण्यासाठी, चांडाळणी, तू आपल्या हातानं त्याच्या कपाळावर सूतपुत्र या अक्षरांचा जळता शिक्का मारून ठेवलास! आणि पुन्हा म्हणतेस आईचं अंतःकरण! चालती हो इथून!

**कुंती** : कर्णा, मी तुझा अपराध केला आहे, फार घोर अपराध केला आहे. पण या अपराधाचं शासन मी किती सोसलं आहे याची तुला कल्पना नाही. कुणालाही येणार नाही ती! वर्षांमागून वर्षं ही तडफड मुक्यानं सोसते आहे मी. दुःखाची ही आग आत अडवून धरली आहे!

**कर्ण** : ( तिच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करून ) आलीस ती आलीस, पण तीसुद्धा साता जन्मांच्या वैऱ्यासारखी वेळ साधून आलीस! उद्या सकाळच्या सूर्याबरोबर माझ्या जीवनातील सर्वांत महत्त्वाचा, अंतिम गौरवाचा दिवस उगवणार आहे त्या अगोदरच्या या रात्री, एखाद्या मूर्तिमंत अशुभासारखी माझ्यासमोर येऊन उभी राहिलीस! अंतिम विजयाच्या वेशीवर मी उभा असताना, मला काळोखात बुडवण्यासाठी एखाद्या काळरात्रीसारखी पुढं

येऊन टाकलीस ! इतकी वर्षं जे रहस्य तू उरात दडवून ठेवलंस ते आणखी चार घटका तसंच ठेवलं असतंस तर काय तुझ्या छातीला तडे गेले असते ? राधेच्या घरात कदान्नाचे घास मी घशात घालीत असताना तू कधी आली नाहीस; अपमानाच्या शल्यांनी मी विव्हळत असताना तू कधी पुढे येऊन मला हाक मारली नाहीस; आणि ते सारं सहन करून मी अखेर ऐहिक यशाची परमावधी गाठीत असता, तू कैदाशिणीसारखी ' मी तुझी आई ' म्हणून सांगायला आलीस ! कर्णाचा वध पांडवांना शस्त्रानं करता येणार नाही हे तुला ठाऊक आहे, म्हणून आपल्या विषारी शब्दांनी त्याचा नायनाट करण्यासाठी तू अशी अपरात्री आलीस ! मला मारून पांडवांना वाचवण्यासाठी तू आलीस ! माझा तेजोभंग करण्यासाठी आलीस ! लाविणी, औरस पोरांसाठी अनौरस पोराचं रक्त पिण्यासाठी आलीस तू !

कुंती : नाही ! नाही ! साफ खोटं, साफ खोटं आहे हे ! किती भयंकर बोलतो आहेस ! कर्णा, वाटेल ते शासन पत्करायला मी तयार आहे. कुणाचीही छाती फुटून गेली असती इतकं दुःख मी मुकेपणानं सोसलं आहे—पण हे असले आरोप ! हे नाही सहन व्हायचं मला ! कर्णा, लाडक्या, या शब्दांपेक्षा तू मला मरण दिलंस तर ते मी आनंदानं पत्करीन. केलेल्या अपराधाचं प्रायश्चित्त म्हणून हे पाहा, मी तुझ्या पायांवर डोकं ठेवते—तलवारीच्या एका घावानं कुंतीच्या या यातनामय जीवनाचा शेवट करून टाक !

[ कर्णाच्या पायांवर डोके ठेवते. ]

कर्ण : नाटक-नाटक ! अशा नाटकानं मी फसेन असं तुला वाटतं ? या रडण्यामुळं मी तुझ्या पायाला मिठी मारून आई म्हणून हंबरडा फोडीन आणि कौरवपक्षाचा त्याग करीन अशी तुझी कल्पना आहे ? जन्मापासून स्त्रियांच्या कपटीपणाचा प्रत्यय घेतो आहे मी ! मला ठाऊक आहे, कधी आसवांचं तर कधी स्मिताचं आच्छादन घालून तुम्ही स्त्रिया आपली स्वार्थी कारस्थानं जगाच्या बाजारात खपवीत असता ! फुलांप्रमाणं वास घेऊन तुमचा चोळामोळा उकिरड्यावर फेकून द्यावा हेच योग्य ? ज्या पुरुषानं कुंवारपणात तुझी वंचना करून मला जन्म दिला त्याचासुद्धा मला तिरस्कार वाटत नाही. तू त्याचा गळा कापण्याअगोदर त्यानं तुझा गळा कापला एवढंच. जा, महाराणी, आपल्या शिबिरात परत जा. पांडवांना वाचवण्याची आपली

मनीषा पुरी व्हायची नाही. पाची पांडवांचा नाश केल्यावर, रस्त्यावर केराप्रमाणं फेकून दिलेला हा कर्ण, आपला शिल्लक राहिलेला एकुलता एक मुलगा म्हणून जाहीरपणे आपल्यासमोर येईल तेव्हाच पुन्हा आपली भेट ! जा——

कुंती : एका स्त्रीनं जन्मतःच तुझा तेजोवध केला, तेव्हा तू असं बोलावंस यात नवल नाही ! पण तुला स्त्रीहृदयाची, स्त्रीजातीच्या अपार दुःखाची कल्पना नाही ! स्त्रियांची जात दुसऱ्यासाठी हसत असते आणि स्वतःसाठी रडत असते. पुरुषांच्या पायदळी पडूनही स्त्रीजातीनं त्यांचे पाय चुरण्यातच समाधान मानलं आहे. जाते मी कर्णा. एकच मागणं आहे माझं. पांडवांना वाचवून तुझा बळी घेण्यासाठी मी आले हे साफ खोटं आहे ! मी पुन्हा सांगते, आईच्या मायेनं मला इथे ओढून आणलं. यापूर्वी येण्याचा मला धीर झाला नाही हे खरं आहे. सभोवारची बंधनं मला तोडता आली नाहीत ! कोणत्याही सामान्य स्त्रीला ती तोडता आली नसती. या परिस्थितीत तिनं जे केलं असतं तेच मी केलं. मी जळत राहिले, आतल्या आत जळत राहिले. पण आज तू कौरवांचा सेनापती झाल्यावर माझ्यानं राहावलं नाही ! एकदा तरी तुला डोळे भरून पाहावं, तुला मायेनं जवळ घ्यावं, या अखेरच्या रात्री आपल्या नात्याची तुला जाणीव करून द्यावी, आणि आणि हो——भावाभावांतील हा रक्तपात थांबवता आला तर थांबवावा. एवढ्यासाठी मी आले. मी जाते आता. तुला माझे, तुझ्या आईचे अनंत आशीर्वाद आहेत.

[ जाते ]

कर्ण : ( क्षणभराने ) आई म्हणे !—आई ! मातेसारखं दैवत नाही ! आईच्या पदरासारखं भाग्य नाही. सर्वांत श्रेष्ठ प्रेम कोणाचं ? आईचं ! सर्वांत जिव्हाळ्याची माया कोणाची ? आईची ! आई ! आई ! आई ! !—या कल्पनांचे प्रचार करणारे पुराणिक आणि कवी सारे निर्बुद्ध स्त्रीलंपट असले पाहिजेत. त्याशिवाय मातृप्रेमाचे असे खोटे देव्हारे त्यांनी माजवले नसते ! आई म्हणे ! कोणाही पुरुषाचा सहवास मिळाला तर कोणतीही दीड दमडीची स्त्री आई होऊन जाते ! काय गौरव आहे त्याचा ! सारा खोट्यांचा बाजार ! सारं ढोंग ! अतुल मातृप्रेम ! मातेचं अंत:करण ? कोणत्या मूर्खांनी समाजाच्या मनात या

असत्यांची पेरणी करून ठेविली आहे? मूर्खांनी नव्हे धूर्तांनी! या धूर्त स्त्रियांनी! [शरीरसुखाच्या उपभोगातून गाफिलपणे बाहेर पडलेल्या जीवांची वंचना करण्यासाठी, पार्थिव लालसेला धार्मिक हेतूनं शृंगारण्यासाठी, मंचकावरच्या उघड्या-नागड्या भोगांवर खोट्या उदात्ततेचं अच्छादन घालण्यासाठी, या धूर्त स्त्रियांनीच मातृप्रेमाचा हा बडेजाव माजवला आहे!] वासनेच्या बाजारात शरीर निकामी, कवडीमोल झाल्यावर म्हातारपणी अन्नाला मोताद होण्याची आपत्ती येऊ नये म्हणून ही मातृहृदयाची कादंबरी स्त्रियांच्या मतलबी आणि कसबी अंतःकरणातून बाहेर पडली आहे! आई! रस्त्यावरच्या कुत्र्यासुद्धा माता होतात. वारुळातल्या सर्पिणी माता होतात! कर्दमातील किडे-कीटकांच्या माद्यासुद्धा माता होतात! त्यांच्या मस्तकावर कुणी मंगल मातृत्वाचे मुकुट चढविले नाहीत! मग माणसाच्या मादीनंच काय असं पुण्य केलं आहे की तिला परमेश्वराच्या शेजारी नेऊन बसवावं! स्त्री ही पवित्र माता आहे म्हणे! कोणत्या स्त्रीलंपट जिभांनी हे निर्बुद्ध सुभाषितांचे ठोकळे निर्माण करून ठेवले आहेत! नाही–स्त्री ही मादी आहे! फक्त मादी–माणसाची मादी आहे!

[ पडदा ]

# अंक तिसरा

## प्रवेश पहिला

[ त्याच रात्रीचा मध्यकाल उलटून गेलेला आहे. कर्ण प्रवेश करतो. सभोवार झाडाझुडुपांनी भरलेला वन्य प्रदेश असून सर्वत्र दाट काळोख आहे. आकाशात काही चांदण्या चमकताना दिसत आहेत. प्रक्षुब्ध मनःस्थितीत व संथ पावले टाकीत कर्ण प्रवेश करतो, अगतिकपणे क्षणभर उभा राहतो. ]

कर्ण : अनादी कालापासून आकाशात तळपणाऱ्या हे नक्षत्रांनो, तुम्हांला रडता येत नाही का ? परमेश्वरानं तुम्हांला प्रकाशाप्रमाणं अंतःकरणही दिलं असेल तर एका मानवाच्या दुर्दैवाचा हा भयानक विलास पाहून ते खचित द्रवल्याशिवाय राहणार नाही ! माणसाच्या भविष्याचं दिग्दर्शन करण्याइतके तुम्ही त्याच्याशी समरस होत असता, मग त्याच्या दुःखातही तुम्ही सहानुभूतीची साथ देणार नाही का ? तुमचंही नशीब आकाशातील उच्च पदाशी जखडलेलं आहे. स्वतः अंधारात गुदमरत असताना, तुम्हांलाही सभोवारच्या जगावर प्रकाशाचं सिंचन करीत बसावं लागतं-आणि होय, विश्वाच्या पसाऱ्यात तेजाचा एवढा दिमाख मिरवणारे तुम्ही, पण तुमच्याही आईबापांचा पत्ता नाही ! रडा, माझ्यासारखेच रडा ! सगळी चराचर सृष्टी माझ्याबरोबर रडते आहे एवढं तरी समाधान मला मिळू द्या. कोणत्याही माणसाच्या छातीवर पडून स्वतःच्या यातनांची कहाणी त्याला सांगण्याची कर्णाला सवय नाही ! या यातना तुमच्या-

शिवाय कुणाजवळ बोलून दाखवू ? धरणीनं मला जन्म दिला आणि आकाशानं माझ्यावर छत्र धरलं. म्हणून वाटतं की, एखाद्या पर्वताच्या खांद्यावर मान टेकावी, आकाशाच्या पावलांवर मस्तक ठेवावं, नक्षत्रांच्या गळ्यात गळा घालावा, आणि अंतराळाचे सारे मजले भेदून पलीकडे ऐकू जाईल, असा हंबरडा फोडून, विश्वाच्या त्या नियंत्याला विचारावं की, का ? का म्हणून कर्णाच्या आयुष्याचा असा चेंदामेंदा करीत आहेस ? कर्णाची सहनशक्ती मोठी आहे, पण या सहनशक्तीच्या आज चिंध्या झाल्या आहेत !—काय म्हणालो मी ? धरतीनं मला जन्म दिला आहे ? नाही, मला कुंतीनं जन्म दिला आहे. माझी आई आज मला सापडली ! जन्मापासून दुरावलेली माझी आई आज माझ्याकडे आली आणि माझं सारं भावजीवन उद्ध्वस्त करून पुन्हा अंधारात निघून गेली. निघून गेली नाही. मी तिला घालविली, निर्दयपणानं हाकलून दिली ! आयुष्यात प्रथमच भेटीला आलेल्या आईचा मी अपमान केला, धिक्कार केला ! हजारो याचक कर्णाच्या दाराशी आले आणि संतुष्ट होऊन माघारी गेले. परंतु प्रेमाचं दान मागण्यासाठी आलेल्या माझ्या आईला मात्र मी उन्मत्तपणानं अपमानित करून घराबाहेर हाकून लावलं ! अगोदरच जखमी झालेल्या तिच्या हृदयावर मी अधम शिव्या-शापांचे प्रहार केले ! आई ! आई—केवढा पापी गुन्हेगार आहे मी ! जिच्या पावलांचा कानोसा घेण्यासाठी माझी सारी जीवनशक्ती कानात येऊन तिष्ठत होती, ती माझी आई समोर येऊन उभी राहिल्यावर एखाद्या रानटी जनावरासारखा मी तिच्यावर तुटून पडलो—आणि रक्तबंबाळ करून तिला परत पाठविली ! पांडवांच्या आईनंच कर्णाला जन्म दिला हे कर्णाचं दुर्दैव ! त्याचं शासन कुंतीला कशाकरता ! कुंतीनं तुझा त्याग केला ! पण ती दुसरं काय करू शकत होती ? नगरवेशीत उभं राहून तिनं सांगायला हवं होतं का, की हा माझा कुवारपणातील मुलगा आहे म्हणून ! समाजानं बांधलेल्या आंधळ्या निष्ठांचे तट एका व्यक्तीला फोडता येत नाहीत. ओलांडता येत नाहीत. जे धैर्य कुणालाही दाखवता आलं नसतं ते कुंतीनं दाखवलं नाही म्हणून तिचा तिरस्कार करायचा ? कर्णाची अवहेलना झाली, पदोपदी अपमानाचे व उपेक्षेचे घाव त्याला छातीवर घ्यावे लागले. पण हे काय त्याचं एकट्याचंच दुर्भाग्य आहे ? ज्यांच्या आई-

बापांचा राजरोस पत्ता जगाला ठाऊक नाही, अशा शेकडो लोकांना दारिद्र्याच्या व उपेक्षेच्या गर्तेतून वाट काढताना ही सगळी संकटं सहन करावी लागतात !—पण आई अश्रू ढाळीत समोर उभी असताना हा विवेक तुला सुचला नाही. तिच्या पायांवर डोकं ठेवून क्षमायाचना केल्या-शिवाय, तिनं जे मागितलं नाही ते तिला दिल्याशिवाय, या अपराधाचं क्षालन होणार नाही !

[ कर्ण जातो. क्षणभराने काही मशालकरी, माधवी आणि जांघिल प्रवेश करतात. ]

**जांघिल :** देवी, मला वाटतं महाराजांचा शोध घेण्याचा आपला हेतू आता सफल व्हायचा नाही ! या काळोखाचा अंत पाहता पाहता आपण पांड-वांच्या शिबिरात दाखल होऊ.

**माधवी :** हा मार्ग पांडवांच्या शिबिराचा आहे ? महाराज पांडवांच्या शिबिरात तर गेले नाहीत ?

**जांघिल :** कौरवांचे सेनापती पांडवांच्या शिबिरात जातील आणि तेही मध्य-रात्रीच्या काळोखात– हे मला संभवनीय वाटत नाही. महाराज या दिशेला आले हा आपला केवळ तर्क आहे !

**माधवी :** या दिशेनं कोणीतरी जात असल्याचा मला भास झाला. मला अजूनही वाटतं महाराजांचीच आकृती असली पाहिजे ती.

**जांघिल :** हे सारंच अघटित वाटतं ! अभिषेक–समारंभ झाल्यावर महाराज किती आनंदात होते !

**माधवी :** तोंडावर पदर घेऊन अंधारातून आलेली ती कृत्या—ती आली नसती तर फार बरं झालं असतं !

**जांघिल :** दान घेण्यासाठी आलेली ती स्त्री ? तिनं काय केलं ?

**माधवी :** काय केलं परमेश्वर जाणे ! पण महाराजांनी मला पुन्हा परत बोलावलं तेव्हा त्यांच्या बोलण्या-चालण्याचा रागरंग अगदी पालटून गेला होता. प्रत्येक शब्दातून, कृतीतून वैताग आणि क्रोध ओसंडत होता. वाळूचा किल्ला धक्का लागून पडावा त्याप्रमाणं त्यांच्या मनाची शान्ती, त्यांचा आनंद एकाएकी ढासळून पडला होता. डोळ्याला डोळा लागत नव्हता. निखाऱ्याप्रमाणं सारखी तगमग होत होती. शेवटी काही सांगितलं नाही,

सवरलं नाही, बाहेरचा वेष केला अन् तीरासारखे बाहेर निघून गेले—मला फार काळजी वाटायला लागली आहे.

**जांघिल :** देवी ! क्षमा करा मला. पण आपण येथून माघारी जावं असं मला वाटतं. महाराजांनी जाताना कोणाला काही सांगितलं नाही, तेव्हा आपल्या मागं कोणी शोध घेत यावं हेही त्यांना आवडायचं नाही. तुमच्या अथवा माझ्या प्रेमापेक्षा महाराजांच्या इच्छेला आपण अधिक मान द्यायला पाहिजे. चला, मशालकरी, मागं फिरा. चलावं भगवती.

**माधवी :** होय, तुमचं म्हणणं खरं आहे. माझ्या प्रेमापेक्षा त्यांच्या इच्छेचं महत्त्व अधिक आहे. स्त्रीचं प्रेम आणि पुरुषाची इच्छा ह्यांत असणारा विरोध हा स्त्रीच्या प्रेमाला सनातन कालापासून मिळालेला एक शाप आहे, देवा, ते कुठंही असोत. सावलीसारखा त्यांच्या शेजारी उभा राहा, एवढीच प्रार्थना आहे माझी !

[ सर्व जातात. ]

## प्रवेश दुसरा

[ त्याच रात्रीच्या उत्तरार्धाचा प्रारंभ. कुंती आपल्या महालात एका कोचावर मान टाकून आगतिकपणे पडलेली आहे. कोपऱ्यातील चौपाईवर एक मोठा थोरला दिवा जळत आहे. अर्धवट जागृती व अर्धवट निद्रा अशा अवस्थेत कुंती असता कर्ण हलक्या पावलांनी प्रवेश करतो. क्षणभर दूर उभा राहून कुंतीकडे पाहतो आणि नंतर पुढे येतो. ]

**कर्ण :** आई !

**कुंती :** ( जाग आल्याप्रमाणे ) कोण ते ?

**कर्ण :** मी कर्ण.

**कुंती :** कर्ण ? शक्य नाही ! माझ्या अंतःकरणातला घोषच माझ्या कानांवर येऊ लागला आहे ! कोण आहे ते ?

**कर्ण :** आई, मी कर्ण आहे. मला ओळखलं नाहीस का ?

**कुंती :** ( उठून पुढे येत ) कर्णाला मी ओळखणार नाही असं कधी तरी होईल

का ? माझ्या शरीराची मातीसुद्धा कर्ण जवळ आला की थरथरायला लागेल ! होय. कर्णच ! कर्णाचीच मूर्ती दिसते आहे माझ्या डोळ्यांना. पण हे खरं असणं शक्य नाही. मला वाटतं मी स्वप्नात आहे–

**कर्ण** : हे स्वप्न नाही. एका दुष्ट निर्दय स्वप्नातून आपण दोघंही आता जागे झालो आहोत. पुन्हा कधीही शांत झोप येणार नाही इतके जागे झालो आहोत.

**कुंती** : हे सारं खरं आहे ? तू खरंच मला भेटायला आलास ? माझा कर्ण खरंच का मला आई म्हणून हाका मारीत आहे ?–ईश्वरा, दु:खानं मला मारतोस तेवढं पुरे आहे. आता अशा सुखाच्या आघातानं आणखी मारू नकोस ! पण मला अजून वाटतं की, माझ्या वेड्या मनाचा हा खेळ आहे ! अशा अपरात्री, तू माझ्याकडे–पांडवांच्या शिबिरात आलास ?

**कर्ण** : आई, दोन विरोधी शिबिरांमध्ये आपली जीवनं दुभागली जावीत हे तुझं दुर्दैव, आणि माझंही ! पण दुर्दैवाला शरण जाण्याइतका कर्ण दुबळा असता तर आतापर्यंत सहस्र वेळा त्याला आत्महत्या करावी लागली असती. म्हणूनच कोठल्याही परिणामाची क्षिती न बाळगता मी तुझ्या, माझ्या आईच्या दर्शनासाठी आलो आहे !

**कुंती** : पण कशासाठी ? कशासाठी–स्वत:च्या अब्रूवर, जीवावर निखारा ठेवून तू वैऱ्यांच्या शिबिरात आला आहेस ?

**कर्ण** : आईच्या अंत:करणानं तुला माझ्याकडे ओढून आणलं. आता मुलाचं अंत:करण घेऊन मी तुझ्याकडे आलो आहे !

**कुंती** : खरंच ? माझा लाडका बाळ– पण नाही, हे भाग्य स्वीकारण्याचा मला अधिकार नाही ! मी चांडाळणीनं तुझं जन्मापासून तर वैर साधलंच, पण आज तू आपल्या आयुष्यातील सर्वांत श्रेष्ठ असं यश मिळवीत असताना मी तुझ्या वाटेत माझं अमंगल तोंड घेऊन आडवी आले. कोणत्याही आईनं आपल्या पोटच्या मुलाचा इतका सत्यानाश केला नसेल. तूं मला चांडाळीण, कैदाशिण म्हणालास तेच खरं आहे. तुझ्याजवळ येण्याचा अधिकार मी गमावून बसले आहे !

**कर्ण** : मुलाकडे जाण्याचा अधिकार आईला कोणीही देत नाही आणि कोणीही तो तिच्यापासून हिरावू शकत नाही ! आई, मी मघाशी क्रोधाच्या भरात

उच्चारलेले शब्द तुझ्या मनात रुतून राहावेत यात नवल नाही. पण त्या शब्दांच्या वेदना तुझ्या अंतःकरणाला जितक्या झाल्या असतील तितक्याच माझ्याही अंतःकरणाला होत आहेत. त्या शब्दांनी पेटविलेल्या आगीनं मीच सारखा जळत राहिलो आहे ! आई, मला क्षमा कर...उद्वेगाच्या भरात मी बोलू नये ते बोलून गेलो. तुझ्या जखमी हृदयावर नीचपणानं अपशब्दांचे प्रहार केले !

कुंती : बाळ, असं भलतंसलतं बोलू नकोस रे ! माझं काळीज फुटतं आहे की काय असं मला वाटतं ! तुझा राग सहन करायची माझी तयारी आहे. पण तुझं प्रेम...नाही, ते मला सहन होत नाही ! कर्णा, माझ्यावर शापांचा वर्षाव कर. तुझ्या प्रेमाचा मला अधिकार नाही ! इतकं सुख मिळावं अशी माझी पुण्याई नाही !

कर्ण : ( तिच्या पायांवर मस्तक ठेवतो ) आई, माझ्या विश्वातली सारी पुण्याई या दोन पावलांमध्ये आहे—मला क्षमा केलीस ना ?

कुंती : ( त्याला उठवून जवळ घेते ) माझा—बाळ माझा लाडका कर्ण ! ऊठ, माझी कसली क्षमा मागतोस ? महात्मा म्हणून तुझा जगात गौरव होत आहे खरा. पण तुझ्या मनाची ही महात्मता, ही उदारता !—कर्णा, मी भांबावून गेले आहे ! माझ्या अभागी आयुष्यावर सुखाचा, आनंदाचा एवढा वर्षाव कधी झाला नव्हता. कुरुक्षेत्रावरच्या राजकारणाचं काहीही होवो. माझं हरवलेलं ऐश्वर्य आज मला पुन्हा परत मिळालं !—पण— पण तू पुन्हा परत जाणार आहेस का ?

कर्ण : होय. मी परत जाण्यासाठीच आलो आहे. मी पांडवांच्या पक्षाला आलो नाही. मी माझ्या आईच्या दर्शनाला आलो. रणांगणावर जाण्यापूर्वी तिचा आशीर्वाद घ्यायला आलो आहे !

कुंती : स्वतःचं दुर्भाग्य लपवीत आयुष्यभर अंधारात राहिलेली कुंती ही—काय आशीर्वाद देणार ती ! आणि आशीर्वाद तरी कोणता देऊ ! एकाचा विजय म्हणजे पाचांचा पराजय आणि पाचांचा विजय म्हणजे माझ्या एका बाळाचा पराजय ! आपल्या पराक्रमानं, औदार्यानं चिरंजीव हो ! हाच आशीर्वाद आहे माझा !

कर्ण : आईचं कर्तव्य तू केलंस, आता मला मुलाचं कर्तव्य करायचं आहे. जे

वचन तू मागितलं नाहीस ते द्यायला मी सिद्ध आहे. आई, तुझ्या पायाची शपथ घेऊन सांगतो, की तुझ्या साऱ्या मुलांना — माझ्या सगळ्या भावांना मी मारणार नाही ! सत्यप्रिय आणि धर्मशील म्हणून ज्याचं धवल यश कुरूच्या वंशाला ललामभूत झालं आहे त्या युधिष्ठिराला, माझ्या प्राणा-वर प्रसंग आला तरी मी मारणार नाही !

कुंती : कर्णा—

कर्ण : युद्धभूमीवर जय—विजयाप्रमाणं तळपणारे ते माझे धाकटे भाऊ— सावत्र असूनही तुझ्या मायेची सावली ज्यांना सतत लाभली, त्या तुझ्या लाडक्या नकुल—सहदेवांवरही मी शस्त्राचा प्रहार करणार नाही.

कुंती : कर्णा, तुझ्या ऋणातून उतराई होण्यासाठी मी काय करू ?

कर्ण : ज्याच्या भैरव पराक्रमानं शत्रूही विस्मित होऊन उभे राहतात त्या तुझ्या आवडत्या भीमाचा—माझ्या त्या दांडग्या भावाचा, तो माझ्या शस्त्राच्या कक्षेत आला तरी मी त्याचा वध करणार नाही !

कुंती : कर्णा, तुझ्यासारख्या पुत्राला जन्म दिला या एका गोष्टीनंच माझ्या साऱ्या पापांचं क्षालन होऊन गेलं आहे !— अर्जुनावर, माझ्या लाडक्या धनंजयावरही शस्त्रप्रहार करणार नाहीस ना ? सांग, नाही ना करणार ? बोलत का नाहीस ?

कर्ण : अर्जुनाच्या बाबतीत असं वचन द्यायला मी असमर्थ आहे. कुंतीचे पाच पुत्र जिवंत राहतील—अर्जुनासह किंवा कर्णासह !

कुंती : किती भयंकर द्वंद्व आहे हे ! माझ्या कुशीतून निघालेल्या दोन मुलांपैकी एकाला मृत्यूच्या स्वाधीन करायला मी तयार होऊ ?

कर्ण : युद्धात पाऊल ठेवणारे सारेच वीर जीवनाच्या सरहद्दीवर उभे असतात. पण आई, मी अर्जुनाचा वध करीन यापेक्षा अर्जुनाकडून माझा वध होईल हेच आता अधिक शक्य आहे !

कुंती : तू मला हवा आहेस कर्णा ! इतरांसाठी मी तुझ्या जिवावर उदार झाले आहे असं तुला वाटत असेल तर ते खरं नाही. मुळीच खरं नाही. मला तुम्ही दोघेही हवे आहात ! अजूनही हे घडणं शक्य नाही का ?

कर्ण : सर्वस्वी अशक्य आहे ते ! दुर्योधनाशी मी कधीही द्रोह करणार नाही. मनानं द्रोह कदाचित या घटकेला होत असेल ! पण माझं शस्त्र मात्र, माझ्या

जिवात जीव आहे तोपर्यंत दुर्योधनासाठीच लढत राहील. दुर्योधनानं युद्धाची सिद्धता केली ती भीष्म-द्रोणांच्या बळावर नव्हे, तर कर्णाच्या. मी कौरवांच्या छावणीतून उद्या निघून गेलो तर—त्याचं मित्रप्रेम इतकं मोठं आहे की, एका शब्दानंही तो मला दुखवणार नाही, अडविणार नाही ! दुर्योधन मानी आहे पण दिलदार आहे. सुयश चिंतून तो मला निरोप देईल आणि स्वत: अधिक निकरानं, आगतिकपणाच्या आवेशानं लढत राहील ! पण अशा उदारहृदयी, सरळ स्वभावाच्या व मानी मित्राचा विश्वासघात करून त्याला मृत्यूच्या खाईत लोटून द्यावं आणि पांडवांच्या पक्षाला येऊन मी माझ्या जीविताचं रक्षण करावं, राज्यवैभवाचा उपभोग घ्यावा ही कल्पनासुद्धा मला सहन होत नाही. यातून हा एकच मार्ग आहे. दुर्योधनाचा मित्र दुर्योधनासाठी लढेल, आणि कुंतीचा थोरला मुलगा आपल्या धाकट्या भावांच्या जिवाला इजा पोहोचू देणार नाही. पण एका अर्जुनाच्या बाबतीत मात्र तू मला मोकळीक दे ! बंधुद्रोह आणि मित्रद्रोह टाळण्याचा हा एवढाच मार्ग मला शिल्लक राहिला आहे !

कुंती : होय म्हणताना माझं काळीज तुटत असल्यासारखं वाटतं ! पण होय म्हणण्यावाचून गत्यंतर नाही ! माझा अपराध विसरून तू आपल्या पावलानं माझ्याकडे आलास, आणि माझ्या पदरात हे दान घातलंस—हेच फार फार झालं ! आधीच मी तुझ्या मार्गावर जन्मापासून काट्यांची पखरण करून ठेवली. आता त्यात आणखी भर घालण्याची, तुझ्या मनाला अधिक दु:ख देण्याची मला इच्छा नाही ! जा बाळ, आता अर्धी-रात्र संपून गेली आहे. अचानक एखाद्या पिशाच्चाप्रमाणं तुझ्यासमोर उभी राहून मी तुझ्या जिवाला किती यातना दिल्या असतील याची मला जाणीव आहे — पण — पण माझ्यावर रागावू नकोस. माझ्या दुर्भाग्याची कीव कर. आईच्या हक्कानं एवढं एकच मागणं आहे माझं. जा आता—ईश्वर तुला उदंड आयुष्य देवो !— तुझी कीर्ती अजरामर करो— !

कर्ण : आई, जाण्यापूर्वी तुझ्या पायांवर पुन्हा एकदा मला मस्तक ठेवू दे. आपली भेट पुन्हा होईल, न होईल.

कुंती : ( कर्णाला जवळ घेऊन ) बाळ, असं बोलू नकोस रे !

कर्ण : आई, तू माझ्यासाठी कष्टी होऊ नकोस. मी विजयाच्या वेशीवर उभा

असेन की मृत्यूच्या दाराशी असेन. पण मला आता त्याची पर्वा वाटत नाही. विधात्यानं जे ललाटात लिहिलं असेल त्याची जबाबदारी विधाताच सांभाळील !

[ बाहेरून भीम ' आई ' अशी हाक मारतो. ]

**कुंती** : घात झाला ! घात झाला, कर्णा, माझ्या लाडक्या– काय होणार आता !

**कर्ण** : कुणी हाक मारली ?

**कुंती** : भीमानं ! तुला इथं पाहिल्यावर तो– छे ! छे ! तो विचारसुद्धा करवत नाही ! थांब, तू या बाजूला आडोशाला उभा रहा. मी दिवा मालवून टाकते.

( दिवा मालवते, भीम प्रवेश करतो. )

**भीम** : आई !

**कुंती** : कोण आहे ?

**भीम** : अशी बावरतेस का ? मी भीम आहे. पण इथं एकदम अंधार कसा झाला ?

**कुंती** : मी आता झोपण्याच्या तयारीत होते. इतका वेळ डोळ्याला डोळा लागेना म्हणून दिवा लावून जागत बसले होते– आता–आता झोपते मी——

**भीम** : पहाऱ्यावर जाताना तुझ्या महालात दिवा जळताना दिसला. हुंदक्याचाही आवाज कानांवर आल्यासारखं वाटलं, म्हणून असा धावत आलो. आई, कसली काळजी करीत बसली आहेस तू ?

**कुंती** : कसलीही काळजी करीत नाही मी. पाच अजिंक्य वीरांच्या आईला कसली काळजी असणार ? जा, तू स्वस्थ जाऊन झोप पाहू——

**भीम** : राजमाता रडत असताना कोणत्या पांडवाला झोप येईल ? आई, तुला खरंच पांडवांच्या जीविताबद्दल भय वाटतं का ? संध्याकाळपासून पाहतो अन् ऐकतो आहे मी. त्या सारथ्याच्या कमजात अवदालीनं पांडवांचा संहार करण्याची प्रतिज्ञा केली म्हणून का तू इतकी अस्वस्थ झाली आहेस !

**कुंती** : भीमा, भीमा, तू आता जा पाहू ! मला विश्रांती घ्यायची आहे !

**भीम** : भीष्म-द्रोणांसारख्या सर्वश्रेष्ठ योद्ध्यांना जिथं आम्ही धूळ चारली, तिथं नगराच्या चिखलपाण्यातून वाहात आलेला तो नीच रथकार——आम्हांला

पराभूत करणार ?

**कुंती :** माझी शपथ आहे अधिक बोलशील तर ! माझ्या शिणलेल्या जिवाला शब्दाचं ओझं देखील आता सहन होत नाही.

**भीम :** कर्णाच्या प्रतिज्ञेचा आणि पराक्रमाचा विचार तू अजिबात मनातून काढून टाक.

**कुंती :** हो, हो. काढून टाकीन. तू सांगतोस तसं वागेन.

**भीम :** रथाची सुतारकी करणाऱ्यांच्या घरात युद्ध जिंकणारे नेते निर्माण होत नाहीत. तो कवडी-किमतीचा अधिरथ आणि दीडदमडीची राधा——

**कर्ण :** खबरदार ! अधिरथाची व राधेची अवहेलना करणाऱ्या जिभेला तावडतोब प्रायश्चित्त भोगावं लागेल !

**भीम :** कोण हे ? आई, कोण बोलतंय हे ! ( मोठ्याने ओरडतो. ) दिवा ! दिवा ! परिचारक, दिवा ! ——जरासंध-कीचकांसारख्यांना मातीत लोळवणाऱ्या भीमाला प्रायश्चित्त देण्याची भाषा करणारे हे उद्दाम थोबाड—— दिवे ! परिचारक दिवे ! ——आई, कोण चांडाळ तुझ्या महालात शिरून अंधारात लपून बसला ? भीमाला खबरदार म्हणायचं धाडस करणाऱ्या या वाचाटाला——

**कुंती :** भीमा, माझं ऐकतोस का जरा ?

**भीम :** कुणाचंही ऐकणार नाही मी ! काळोखात दडलेल्या या सर्पाला पायाखाली ठेचल्याशिवाय रहाणार नाही मी ! (परिचारक प्रवेश करतो. ) लावा, सगळे दिवे लावा !

**कुंती :** परमेश्वरा ! तूच त्राता आहेस !

[ दिवे लागतात. प्रकाश पडतो. ]

**भीम :** कोण हा ? कोण—कर्ण ? कर्ण ? आई, हा खरंच कर्ण आहे का ? की मला काही तरी भास होत आहे ? होय, तोच हा ! सांग, काळोखात दडून रहाणाऱ्या भेकड माणसा, ——तू कर्णच आहेस का ?

**कर्ण :** होय, मी कर्ण आहे !

**भीम :** तू कर्णच आहेस ? होय, तूच कर्ण ! एरव्ही आपण लपून बसलो आहोत हे विसरून राधेच्या परित्राणासाठी ‘ खबरदार ’ म्हणून ओरडण्याचं शौर्य कर्णाशिवाय इतर कोण गाजवू शकणार ? ( मोठ्याने हसतो. )

वाहवा ! कर्ण ! कर्ण ! कर्ण ! ( दाराजवळ जाऊन ) अर्जुना, नकुला, सहदेवा ! धावा, धावा, इकडे आईच्या महालात या !

**कुंती :** भीमा, हे सारं चमत्कारिक आहे, पण–पण–मी सांगते—

**कर्ण :** भगवती, माझी इच्छा आहे की आपण काहीही सांगू नये, जे सांगायचं ते मी सांगेन.

[ अर्जुन, नकुल व सहदेव प्रवेश करतात. ]

**अर्जुन :** काय दादा, कसली आरडाओरड आहे ही ?

**भीम :** आरडाओरड? इंद्रप्रस्थाच्या सौधावर उभं राहून साऱ्या जगाला पुकारण्यासारखी गोष्ट आहे ही! अर्जुना, पाहिलंस हा कोण आहे तो ? नकुला, सहदेवा, ह्या माणसाला ओळखलंत का ?

**अर्जुन :** कोण–कर्ण ? कर्णमहाराज—

**नकुल :** अंगाधिराज—

**सहदेव :** होय, हे कर्णमहाराजच !

**भीम :** होय, हाच तो कर्ण ! पाची पांडवांच्या संहाराच्या प्रतिज्ञा करणारा हा महारथी कर्ण ! हाच तो कौरवांचा कृष्ण ! दुर्योधनाचा प्रिय मित्र, त्याच्या अधम राजनीतीचा प्रणेता ! कौरवांच्या प्रत्येक कुटिल कारस्थानाला आपल्या धनुर्बलाच्या व शस्त्रविद्येच्या घमेंडीचा पाठिंबा देणारा हाच तो गर्विष्ठ, अहंकारी राधापुत्र !

**कुंती :** भीमा, अर्जुना, आपल्या घरी येणाऱ्या वीर पुरुषाचा अपमान करू नका ! हा पांडवांचा धर्म नाही !

**भीम :** कौरवांना आणि कौरवांचा कैवार घेणाऱ्यांना अवसर मिळेल तिथं पायाखाली ठेचून काढणं हाच पांडवांचा आज एकमेव धर्म आहे ! पांडव धर्मशील असतील; परंतु या धर्मशीलतेचा फायदा स्वतःच्या सामर्थ्यानं व सत्तेनं उन्मत्त झालेल्या या धर्मभ्रष्टांना मिळायचा नाही ! पण आई हा राधापुत्र अशा मध्यरात्री तुझ्या महालात शिरलाच कसा ? आई, सांग तू याला बोलावलं होतंस ?

**कुंती :** नाही, पण–होय मीच–

**कर्ण :** नाही, राजमातेनं मला बोलावलं नव्हतं. मी आपण होऊन इथं आलो आहे !

**अर्जुन** : आपण स्वतः होऊन आलात? कशाकरता?

**भीम** : कशाकरता आलास? पांडवांच्या हाडवैऱ्यानं त्यांच्या शिबिरात असं रात्री-बेरात्री येण्याचं काय कारण? तेही पांडवांकडे नव्हे तर पांडवांच्या मातेकडे. तेही उघडपणानं नाही, तर चोर-निशाचराप्रमाणं लपून छपून! सांग, नीचा—

**नकुल** : सांग राधापुत्रा, कौरवांचं शिबिर सोडून इथं कशासाठी आलास?

**सहदेव** : पांडवांना दगाफटका करण्यासाठी? त्यांचा घात करण्यासाठी? शस्त्र-बलाच्या पोकळ बढाया मारल्यावर स्वतःची प्रतिष्ठा टिकविण्यासाठी असं काही करणं आवश्यकच आहे! सांग. सारथिपुत्रा—

**भीम** ! सांग ! वेळी-अवेळी गगनभेदी गर्जना करणारं हे थोबाड आता बंद का झालं? हलकट माणसा—

**कर्ण** : ( स्वतःशी ) माझे भाऊ—माझे भाऊ आहेत सगळे!

**अर्जुन** : दादा, जरा शांत व्हा. कर्णराज, आपण का आलात हे आम्हांला कळलं पाहिजे!

**कुंती** : ( स्वतःशी ) मीच चांडाळीण माझ्या लाडक्यावरती हे संकट ओढवायला कारण झाले.

**कर्ण** : मी जे सांगेन त्यावर तुमचा विश्वास बसेल की नाही याबद्दल मी साशंक आहे. पण ते खरं आहे. मी चोरून लपून आपल्या शिबिरात आलो, पण त्याचं कारण एवढंच की मला आपल्याला भेटायचं नव्हतं, मला राजमातेला—फक्त राजमातेलाच भेटायचं होतं.

**अर्जुन** : कशासाठी?

**कर्ण** : ( संथ, मंद स्वरात ) मला आई नाही.

**भीम** : साऱ्या जगाला ठाऊक आहे ते!

**कर्ण** : कुंतीसारखी आई मिळाल्यानं मातृहीनाचं दुःख काय असतं हे आपल्याला कळायचं नाही.

**सहदेव** : मातृहीनाचं की हीन मातृत्वाचं?

**कर्ण** : हीन मातृत्वाचंही म्हणा. त्याची मला लाज नाही. मातृत्व कधीही हीन असू शकत नाही!

**भीम** : पण राजमातेकडे येण्याचं कारण?

**कर्ण** : ( हलक्या स्वरात ) माझी खरी माता मला कधी दिसलीच नाही ! राधा होती पण तीही गेली. कौरवेश्वरानं सेनापति-पद देऊन आज माझा सन्मान केला. उद्या मला अखेरचं, निकराचं युद्ध करायचं आहे. त्यापूर्वी या रात्री एखाद्या आईच्या आशीर्वादासाठी, तिच्या पावलांच्या स्पर्शासाठी, माझं मन तडफडू लागलं !

**भीम** : आणि म्हणून तू पांडवांच्या, आपल्या वैऱ्यांच्या आईकडे आलास ? खोटं, साफ खोटं !

**कर्ण** : तुम्ही हे खरं मानावं असा माझा आग्रह नाही. पण हेच खरं आहे. राजमातेकडे पाहताना मला नेहमी वाटायचं की, आपली आई कधी यायची असेल तर ती अशी असावी. माझी आई कधीच आली नाही आणि म्हणून तिच्या पदस्पर्शाची भूक भागविण्यासाठी मी राजमातेकडे आलो. हे एवढंच सत्य आहे. राजमातेकडे पाहताना नेहमी मला मातृत्वाचा प्रत्यय येई, म्हणूनच मी इथं आलो, यात कोठलंही राजकारण नाही. कोठलंही विश्वासघाताचं कारस्थान नाही. एखादी भावना मनात प्रबल झाली की, योग्यायोग्याचा, इष्टानिष्टाचा विवेक माणसाला रहात नाही. अशाच एका अविचाराच्या वादळानं मला इथं ओढीत आणलं. आपली इच्छा असेल तर-कोणतंही शासन मला करा. ते स्वीकारायला मी तयार आहे. राजमातेचा यात कुठेच संबंध नाही एवढं लक्षात ठेवा. मी येणार होतो हेही तिला माहीत नव्हतं. कशासाठी आलो हेही ठाऊक नव्हतं !

**भीम** : आईची तरफदारी करायला सहाव्या माणसाची आवश्यकता नाही ! तुझ्यासारख्या हीन कुलोत्पन्नाला मुलगा म्हणून जवळ करण्याची कल्पनाही तिच्या मनाला कधी शिवायची नाही !

**कर्ण** : होय. राजमातेनं हेच सांगितलं.

**सहदेव** : छान ! हेच सांगणार ती !

**कुंती** : नाही ! तो खोटं सांगतो आहे ! मी त्याला सांगितलं की मी सहाव्या मुलाप्रमाणं तुला मानायला तयार आहे म्हणून !

**भीम** : तुझ्या उदारपणाला शोभेलसं आहे ते. पण पांडवांचा हाडवैरी तो पांडवांचा हाडवैरीच ! कुंतीच्या उदार वात्सल्याचा फायदा त्याला कधीही मिळावयाचा नाही. जा, अंगराज, आम्ही आपल्याला जिवंत सोडतो

आहोत हे आपलं भाग्य माना आणि परत जा. आपलं हृदय आईसाठी तगमगत असेल. पण एवढी मोठी आकांक्षा बाळगू नका ! कुंतीसारखी आई लाभायला सात जन्मांची पुण्याई लागते. आपली आई जिवंत असलीच तर ती कुठं तरी पापाच्या चिखलामध्ये लोळत पडली असेल. एखाद्या दरिद्री खोपटामध्ये आपल्या म्हाताऱ्या शरीराचे अजून सौदे ठरवीत असेल !

**कुंती :** भीमा, मी राजमाता म्हणून निक्षून सांगते, माझ्याकडे आलेल्या अभ्यागताची एका शब्दानं यापुढे कुणी विटंबना केली तर मला ते खपायचं नाही ! कर्णा, जा, या अपशब्दाचं सारं पाप माझ्या माथ्यावर आहे. मला क्षमा कर——

**सहदेव :** आई, तू क्षमा मागतेस ?

**कर्ण :** महादेवी, अपशब्दांची माझ्या मनाला खंत वाटत नाही. आपण उगाच कष्टी होऊ नका. मी अविचारानं आपल्यावर हा प्रसंग आणला, माझाच अपराध आहे हा. जातो मी.

**भीम :** जा, जा ! मातृप्रेमाची कहाणी रचून स्वतःकरिता जीवदान मागण्यासाठी तू आला आहेस हे राजमातेला कळलं नसलं तरी आम्हांला कळलं आहे ! जा—भेकड, नादान ! ( हसतो. )

**नकुल :** जा, भ्याड ! ढोंगी, रणभीरू——

[ वरील शब्दांच्या आरोळ्या मारीत तिघेही पांडव उपहासाने हसतात. अर्जुन खिन्न दृष्टीने कर्णाकडे पाहतो. कर्ण एकदा कुंतीकडे बघतो आणि नंतर मान खाली घालून संथ गतीने बाहेर जातो. क्षणभराने सर्व पांडवही त्याच्या पाठोपाठ जातात. कुंती पुतळ्यासारखी खिळून उभी राहते. मागे जळणाऱ्या एका ज्योतीशिवाय इतर सर्व दिवे मंदावतात—विझतात. ]

## प्रवेश तिसरा

[ दुसऱ्या दिवसाची सायंकाळ. कर्णाच्या निवासस्थानाबाहेरचा भाग. जांघिल आणि वासंतिका प्रवेश करतात. ]

**जांघिल :** वासंतिके तू आज रणांगणावर हवी होतीस——

**वासंतिका :** का ? आज लढतानासुद्धा माझी आठवण झाली ?

**जांघिल :** लढताना स्वतःची सुद्धा मला आठवण राहात नाही, तिथं तुझी आठवण कुठून येणार ?

**वासंतिका :** आताच्च म्हणालात, तू रणांगणावर हवी होतीस म्हणून. मग लढाई करण्यासाठी का माझ्या मदतीची जरूर होती ?

**जांघिल :** लढाईसाठी तुझी मदत ? बाकी स्त्रियांना युद्धावर पाठविण्याची कल्पना वावगी नाही ! आमच्या हातांतील धनुष्यापेक्षा तुमच्या नेत्रशरांनीच अधिक सैनिक घायाळ होऊन पडतील. त्यांतूनही जे शिल्लक राहतील त्यांच्यासाठी जिभेचा दांडपट्टा आहेच ! अडचण एवढीच की तुम्ही हल्ला केल्यावर शत्रू कोण आणि मित्र कोण हा भेद शिल्लक राहणार नाही. शत्रूच्या शिपायांना मारून विजय मिळविण्यासाठी आज सैनिक लढत असतात. परंतु तुम्ही शिपाई होऊन रणांगणावर उतरला की विजयाकडे दुर्लक्ष होऊन शिपायांना काबीज करण्यासाठीच सर्वांची दंगल उडेल !

**वासंतिका :** मग कशासाठी मी रणांगणावर हवी होते ? तुमचं शौर्य पाहण्यासाठी ?

**जांघिल :** माझं नव्हे, कर्णमहाराजांचं. महाराजांच्या नेतृत्वाचा आजचा दुसरा दिवस. आज महाराजांनी जो पराक्रम गाजवला त्याला सीमा नाही. विश्वाच्या संहारासाठी सिद्ध झालेला प्रत्यक्ष रुद्रच युद्धभूमीवर तांडव करीत आहे असं वाटलं !

**वासंतिका :** होय, आज घरोघर कर्णराजांनी गाजविलेल्या शौर्याच्या गोष्टीच बोलल्या जात आहेत. भीष्म-द्रोणांनी देखील पांडवांना इतकं भयभीत केलं नव्हतं म्हणतात !

**जांघिल :** वासंतिके, विजय हा व्याकरणात पुल्लिंगी असला तरी व्यवहारात स्त्रीलिंगी आहे ! त्याचा हात धरून एखाद्या मानिनीप्रमाणं त्याला आपल्याकडे खेचून घ्यावं लागतं. भीष्म-द्रोण थोर लढवय्ये खरे. पण ते विजयश्रीशी वाटाघाटी करीत बसले. तिची मनधरणी करीत बसले. कर्णमहाराजांचा पंथ वेगळा आहे. साऱ्या सेनेसह ते शत्रूवर विजेप्रमाणं चहूंकडून कोसळून पडतात. विजयश्री थरथर कापत त्यांच्यासमोर हात जोडून उभी राहते !

**वासंतिका** : विजयश्री थरथर कापली असेल, पण आज कौरवांना ती मिळाली नाही एवढं मात्र नक्की !

**जांघिल** : त्यालाही महाराजच कारण आहेत ! महाराज शंकरासारखे लढत आहेत हे खरं. पण लढाईच्या ऐन धुमश्चक्रीत ते केव्हा तरी एकदम विमनस्क होतात. त्यांची दृष्टी व चर्या पालटून जाते. कसलंही भान त्यांना उरत नाही. समोरच्या शत्रूकडे एखादे वेळी ते एकदम प्रेमभावानं तो आपला पूर्वजन्मीचा पाठचा भाऊ आहे अशा नजरेनं पाहू लागतात. कसलं तरी भयंकर दु:ख महाराजांच्या काळजाला मधूनमधून तीव्र डंख मारीत आहे असं वाटतं !

**वासंतिका** : कसलं दु:ख आहे ते ? कोणीच का त्यांना विचारीत नाही ?

**जांघिल** : महाराजांना कोण विचारणार ? माझ्यासारख्या काही जवळच्या माणसांच्याच हे लक्षात आलं आहे ! आमची आतडी तुटतात. पण समुद्राचं सांत्वन करायला नदीनाल्यांनी पुढे सरसावून काय उपयोग ? इतरांना कल्पना नाही, पण याच कारणांनी जवळ आलेला विजय आज माघारी गेला !

**वासंतिका** : विजय माघारी गेला ?

**जांघिल** : प्रत्येक पांडवाला आज महाराजांच्या हातून जीवदान लाभलं आहे ! निदान युधिष्ठिराला तर नक्कीच ! नागाच्या तोंडात अडकलेल्या बेडकाप्रमाणं, तो धर्म—सत्याचा प्रवचनकार कर्णराजांच्या शस्त्रजालात सापडला होता. त्याला पळता भुई थोडी झाली. युधिष्ठिराचा शेवट केला असता तर युद्धाचाही शेवट झाला असता ! उद्या पांडव आपलं सर्वस्व पणाला लावून लढल्याशिवाय राहणार नाहीत. पण काही झालं तरी आता विजय आमचा आहे. महाराजांचा आजचा पराक्रम पाहता त्यांच्यापुढे पार्थही घटकाभर उभा राहील असं वाटत नाही !

[ पडद्यात ललकाऱ्यांचे त्यांचे आणि तुताऱ्यांचे आवाज. ]

**जांघिल** : चल वासंतिके, महाराज राजमंडळातून परत आले आहेत. कौरवेश्वरही त्यांना जातीनं पोचवायला आले आहेत असं दिसतं ! चल लौकर.

[ दोघे जातात, दुसऱ्या बाजूने दुर्योधन, शकुनी व कर्ण प्रवेश करतात. ]

**दुर्योधन** : मित्रा, तुझी सूर्यपुत्र ही पदवी आज यथार्थ झाली. चराचराचं दहन करणारं सूर्याचं तेजच आज समरभूमीवर उतरल्याप्रमाणं वाटत होतं. हा अपूर्व पराक्रम पाहून प्रत्यक्ष देवेंद्रालाही स्वर्गात आपल्या सिंहासनाविषयी धास्ती वाटू लागली असेल. असं वीर तेज या कौरवेश्वराच्या डोळ्यांनी कधी पाहिलं नाही !

**शल्य** : कोणत्याही मर्त्य मानवानं असं समरकौशल्य आजवर कधी पाहिलं नसेल. या शल्यानं आजपर्यंत कमी वीर बघितले नाहीत. थोड्याथोडक्या लढायांत भाग घेतला नाही. परंतु अंगराज, आज माझ्या डोळ्यांना दिसलं ते पूर्वी कधीही दिसलं नाही !

**शकुनी** : मद्रेश्वर, कर्णाचं सारथ्य स्वीकारताना आपण साशंक होता, आणि आपण सारथ्य स्वीकारलं म्हणून मीही साशंक होतो !

**शल्य** : अंगराज, आपण आम्हा सर्वांना क्षमा करायला हवी. आपल्याला सेनापतिपद देण्याचा प्रश्न राजसभेत निघाला तेव्हा काही अनुचित शब्द आमच्या तोंडातून बाहेर पडले. रथावर सारथी म्हणून आरूढ झाल्यावरही मी दुराभिमानानं कटू वचनांचा उच्चार करून आपला तेजोभंग केला, पण मला आता त्या साऱ्या गोष्टींचा पश्चात्ताप होत आहे. आपल्या अपूर्व नेतृत्वामुळं, आपल्या वीरतेच्या देदीप्यमान दर्शनामुळं कौरवपक्षाला विजयश्री मिळवून देण्याचं सामर्थ्य केवळ आपल्यात–केवळ आपल्यातच आहे हे आम्हांला पटलं आहे, खरे क्षत्रिय आपण–आम्ही नावाचे मात्र क्षत्रिय !

**कर्ण** : आपणा सर्वांचा मी ऋणी आहे. शल्यराज, आपण कुशलतेनं केलेलं सारथ्य माझ्या स्मरणात स्थिर झालं आहे. आपले कटू शब्द मी केव्हाच विसरून गेलो आहे. आपण मुळीच वाईट वाटून घेऊ नका ! राजाधिराज, आपल्या मित्रऋणातून अंशतः उतराई होण्याची संधी मला मिळाली आहे. ती माझ्या हातून सफल होवो किंवा त्या प्रयत्नातच कर्णाच्या जीविताचा शेवट होवो हीच माझी ईश्वराजवळ प्रार्थना आहे.

**दुर्योधन** : पराक्रम आणि विजय यांचं साहचर्य असेल तर अंगराज, आपल्या नेतृत्वाखाली कौरवांना विजय मिळाला आहे असं मानायला आजही काही प्रत्यवाय नाही !

**शकुनी** : आज धर्मराज आपल्या रक्षकांसह रथ पिटाळून शिबिराकडे पळत

सुटला तेव्हां पांडवांची विजयाशाच रणांगण सोडून पळते आहे असं वाटलं ! कर्णा, तू अर्ध्यावर त्याचा पाठलाग थांबविलास, नाही तर आज ज्येष्ठ पांडवांची शंभर वर्षे पुरी भरली होती !

**दुर्योधन** : अंगराज, आम्ही आता आपला निरोप घेतो. उद्याच्या विजयासाठी आपल्या दीर्घ विश्रांतीची आवश्यकता आहे.

( तिघेही जातात )

**कर्ण** : ( क्षणभर स्तब्ध राहून ) विजय ! विजय ! भावाच्या रक्तानं माखलेला आणि आईच्या आसवांनी भिजलेला हा विजय माझ्या अंत:करणाला कधी समाधान देईल का ? काल–परवापर्यंत मला पराभवाची धास्ती वाटत होती, आज मला विजयाची धास्ती वाटत आहे ! परमेश्वरा, अशा विजयापासून माझ्या वैऱ्यांनासुद्धा सुरक्षित ठेव ! विजयदेवते, इतकं भेसूर स्वरूप घेऊन तू कधी कुणाच्या समोर आली होतीस का ? पुष्पांचा हार घेऊन वीरांना सामोरे येण्याचा तुझा परिपाठ, पण माझ्यासाठी मात्र आज अश्रूंची माळ घेऊन तू पुढे येत आहेस ! कुठं आहे ते तुझ्या डोळ्यांतलं लाघवी चांदणं ? मला तर त्यांत खदिरांगार पेटलेले दिसत आहेत ! ओठांवर स्मित नाही, भाई-बंदाच्या छातीतून उपसलेलं रक्त निथळतं आहे त्यांवर ! नको, अशा क्रुद्ध दृष्टीनं कर्णाकडे पाहू नकोस ! तू येऊ नकोस !– मला विजय नको. कर्ण पराभव पत्करायला तयार आहे. आई, भावांच्या शवांवर उभारलेला हा गौरव मला नको आहे ! मी शस्त्रसंन्यास घ्यायला तयार आहे !– शस्त्र-संन्यास घ्यायला कोण तयार आहे ? कर्ण ? कर्ण इतका नादान झाला आहे का ? द्रोणाचार्यांनी पुत्रवधाच्या शोकात शस्त्र खाली ठेवलं म्हणून त्यांची उद्धटपणानं कुचेष्टा करणारा कर्ण स्वत: शस्त्रत्याग करीत आहे ? नाही, कालयत्री शक्य नाही ! लक्षावधी माणसं मेली आहेत, मरत आहेत. तिथं पांडवांच्या रक्ताची व कुंतीच्या अश्रूंची काय मातब्बरी ! सगळ्या कुरुक्षेत्रावर अश्रूंचा पर्जन्य पडला तरी कर्ण आपल्या संकल्पापासून रेसभरही ढळणार नाही ! मित्राच्या अपार ऋणातून मुक्त होण्याची, जीवनातील सर्वश्रेष्ठ कर्तव्य बजावण्याची ही संधी आहे. ती अशा नेभळेपणानं घालवून बसू ? मातृप्रेमाच्या आणि बंधुप्रेमाच्या भाकड गोष्टींसाठी माझी सर्वोच्च महत्त्वा-कांक्षा अशी नष्ट होऊ देऊ ?– माझ्या परम मित्राचा असा ऐन वेळी

विश्वासघात करू ? नाही नाही—

( जातो. )

## प्रवेश चौथा

( तिसऱ्या दिवसाची दुपार. कुंती आपल्या महालात एकटीच उभी आहे. )

**कुंती :** दुर्दैवी माणसांच्या वाट्याला जे सुख येतं ते सुद्धा बरोबर दुःखांचा परिवार घेऊन येतं ! मी कर्णाकडे गेले नसते तर फार बरं झालं असतं ! माझ्या सामर्थ्याची मर्यादा मला समजली नाही. कुरुक्षेत्राच्या रणमैदानावर उसळलेला आगीचा डोंब, एका आईच्या डोळ्यांतील पाण्यानं कधी विझणं शक्य आहे का ? माझ्यासारख्या हजारो लाखो अभागिनी घरोघर रडत असतील, तडफडत असतील. पण मला वाटलं, मी पांडवांची आई आहे, कर्णाची आई आहे. एका आईची सहाही मुलं एकत्र आली तर युद्धाचा हा वणवा विझेल. माझी सगळी मुलं मला परत मिळतील. पण एकदा युद्ध सुरू झालं की ते स्वतःच्या गतीनंच वाहात जातं. माणसांच्या नियंत्रणापलीकडे गेलेलं प्रचंड यंत्र तिथे स्वतःच्या वेगानंच घणघणू लागतं ! अंतःकरणाचे कोठलेही पाश, माणुसकीच्या कोणत्याही मर्यादा तिथं शिल्लक रहात नाहीत. माझा दुरावलेला कर्ण मला परत मिळाला, मला आई म्हणून त्यानं हाक मारली. पण- पण या सुखानंच पुढचं अलोट दुःख दोघांसाठी ओढून आणलं! युद्धाला खीळ बसली नाहीच, पण कर्णाच्या आयुष्याचा मात्र मी बोजवारा केला. मित्रांशी द्रोह करायचा नाही म्हणून कर्ण पराक्रमाची शर्थ करून लढतो आहे खरा. पण त्याचं मन उद्ध्वस्त झालं आहे, म्हणूनच काल समोर आलेल्या विजयाला त्यानं आपल्या हातानं दूर लोटून दिलं ! बाळ, तुझी जागा कुठं आहे याचा तुला निर्णय होत नसेल. मलाही आज होत नाही तो. परवापर्यंत पांडवांच्या विजयासाठी प्रार्थना करणारी कुंती, आज कोणाच्या विजयानं आपल्याला अधिक समाधान होईल, कोणाच्या पराभवानं अधिक दुःख होईल, या मर्मभेदक प्रश्नाचं उत्तर शोधीत बसली आहे. तुझ्याप्रमाणं मीही त्याच दुःखाच्या कटाहात तडफडत बसले आहे,

एवढं एकच सांत्वन उरलं आहे आता !

**दासी :** ( प्रवेश करून ) देवी, नकुलमहाराज आले आहेत.

**कुंती :** नकुल ? या वेळी ? अजून सायंकाळ व्हायला किती तरी अवकाश आहे ! आताच दूतानं सांगितलं की आज नकुल रणांगणावर आपल्या क्षात्रतेजानं सूर्यासारखा तळपत आहे म्हणून !

( नकुल प्रवेश करतो. )

**नकुल :** सूर्यालाही काजव्याप्रमाणं हतप्रभ आणि हास्यास्पद करण्याचं सामर्थ्य काही महावीरांमध्ये असतं !

**कुंती :** हतप्रभ ? हास्यास्पद ? माझा मुलगा रणांगणावर हास्यास्पद होऊ शकतो ?

**नकुल :** इतरांचं कुणास ठाऊक ! पण चौथा पांडव आज कुरुक्षेत्रावर हास्यास्पद झाला यात मात्र शंका नाही ! आई मी आज पराभूत झालो. या अशा पराभवापेक्षा मरण पत्करलं असतं !

**कुंती :** बाळ, तुझं दुःख नुसतं पराभवाचं दिसत नाही. रणांगणावर विजय-अपजयाचं चक्र अखेरपर्यंत मागेपुढे जात असतं. तुझ्यासारखा वीर पुरुष अशा पराभवानं हताश व्हायचा नाही ! हे पराभवाचं दुःख नाही !

**नकुल :** हे अपमानचं दुःख आहे !

**कुंती :** अपमानाचं ?

**नकुल :** माझा अपमान झाला की सन्मान झाला, विटंबना झाली की गौरव झाला हेही मला खरोखर समजत नाही ! साता जन्मांच्या वैऱ्यानं पाठीवरून हात फिरवला, प्रेमळ हातानं गोंजारलं, आणि घरी जाऊन आईचा आशीर्वाद घे म्हणून सांगितलं तर तो गौरव मानायचा का ?

**कुंती :** काय सांगतो आहेस तू हे ? कुणी—कर्णानं— का हे सारं केलं ?

**नकुल :** होय, आज कर्णानं मला जीवदान दिलं. का दिलं—परमेश्वर जाणे !

**कुंती :** प्रत्यक्ष कर्णानं आज तुझ्याशी युद्ध केलं ?

**नकुल :** मीच पुढं जाऊन कर्णाला आपल्या अंगावर घेतलं ! कुठल्या तरी दैवताचा वर असल्याप्रमाणं मी आज यशस्वी होत होतो. त्या यशाच्या उन्मादात धर्मराजांवर ओढवलेल्या आपत्तीचा सूड घेण्यासाठी मी कर्णाचा वेध घेऊन त्याला सामोरा गेलो.

**कुंती :** आणि मग— ? कर्ण तुझ्याशी लढला ? त्यानं तुला पराभूत केलं ?

**नकुल** : कर्णाकडून केवळ पराभूत होण्यात कसलाही अपमान नाही ! आई, मी निकरानं लढलो, कर्णासारख्या महाप्रतापी वीराशी प्राण पणाला लावून झुंज दिली !

**कुंती** : शाबास, कुंतीच्या मुलाला शोभेलसं वागलास तू !

**नकुल** : हेच शब्द, हेच शब्द कर्णानं उच्चारले. माझं समरकौशल्य कर्णापुढं पांगळं पडलं. एका घटकेच्या आत कर्णानं माझा रथ मोडून टाकला. माझे सारे रक्षक ठार केले. माझ्या हातांतली सारी आयुधं निकामी केली आणि विरथ करून मला भूमीवर पाडलं !

**कुंती** : आणि नंतर ?– त्यानं तुझ्यावर शस्त्राचा प्रहार केला नाही ?

**नकुल** : मी धुळीमध्ये अखेरच्या आघाताची– मरणाची वाट पहात असता, कर्ण आपल्या रथातून खाली उतरला आणि प्रेमानं मला कवटाळून म्हणाला, ' शाबास, नकुला कुंतीला अभिमान वाटावा असा पराक्रम गाजवलास तू ! आता परत शिबिरात जा आणि– कुंतीचं दर्शन घे, तिचे आशीर्वाद घे. '

**कुंती** : ( स्वतःशी ) कुंतीचं दर्शन ? कर्णा, कुंतीच्या अभद्र दर्शनानंच तुझ्यावर ही संकटांची परंपरा ओढवली !

**नकुल** : त्यानं तुला एक निरोप सांगायची मला विनंती केली.

**कुंती** : निरोप--माझ्यासाठी निरोप सांगितला ?

**नकुल** : त्यानं सांगितलं, कुंतीला म्हणावं, शोक करण्याची वेळ आली तरी शोक करू नकोस ! मला काही उमज पडला नाही. पण तो हसला आणि त्यानं मला जायला सांगितलं. जीवदान देणाऱ्याशी प्रतारणा करू नये म्हणून मी तुझ्याकडे आलो, तुझा आशीर्वाद घेऊन मी आता परत कुरु-क्षेत्रावर जात आहे.

**कुंती** : शोक करण्याची वेळ आली तरी शोक करू नकोस !

**नकुल** : आज कर्ण रुद्राप्रमाणं रणांगण गाजवीत आहे. पांडवांचा पराजय झाला, त्यांच्या प्राणावर प्रसंग ओढवला तरी शोक करू नकोस एवढाच या शब्दांचा अर्थ असावा. आई, मी आज्ञा घेतो तुझी. आजची सायंकाळ जयपराजयाची कौल देणारी आहे. कर्णाच्यासमोर उभं रहाण्याचं सामर्थ्य पार्थाशिवाय दुसऱ्या कोणत्याही वीरामध्ये नाही ! पार्थ आणि कर्ण यांच्यात आज रणकंदन झाल्याशिवाय रहाणार नाही. मला रणांगणावर राहिलं

पाहिजे. आई, जातो मी!

[ अभिवादन करून आणि आशीर्वाद घेऊन नकुल जातो. ]

कुंती : शोक करायची वेळ आली तरी शोक करू नकोस! कर्णा, तुझ्या निरोपाचा अर्थ मला समजला. तू दुर्योधनासाठी शौर्यानं लढत आहेस आणि शेवटी माझ्यासाठी स्वतःचं बलिदान करणार आहेस! नाही, कुंती हे बलिदान घेण्याचा तुला अधिकार नाही. कर्णाच्या रक्तानं माखलेलं पांडवांचं यश तुला, पांडवांनाही कधी समाधान देणार नाही! आता हे टाळण्यासाठी एकच एक मार्ग आहे. आणि तो पत्करण्याचं धैर्य कुंती दाखवणार आहे. चांडाळणी तुला रणांगणावर जाऊन आपलं मातृत्व जाहीर करण्याबाचून आता गत्यंतर नाही. आतापर्यंत भ्याडपणानं जे टाळलंस ते या घटकेला केलं नाहीस तर तुझ्यासारखी पापीण नाही! कर्णा, मी आले! माझ्या बाळाकडे मी धावत येत आहे! अर्जुन आणि कर्ण यांच्यात आज निकराचं युद्ध होणार आहे! —मी दोघांच्या रथांमध्ये जाऊन उभी राहते आणि अर्जुनाला सर्वांसमक्ष सांगते की, तुझ्या भावावर — माझ्या थोरल्या मुलावर— शस्त्राचा प्रहार करू नकोस म्हणून! — होय. हा एकच मार्ग आहे आता. दासी– दासी! दासी!!

[ बाहेर जाते. ]

## प्रवेश पाचवा

[ त्याच दिवसाची सायंकाळ. कुरुक्षेत्राचा एक भाग. एका बाजूस कर्णाचा रथ असून त्याचे एक चाक जमिनीत खोलवर रुतलेले आहे. योद्ध्याच्या वेषात असलेला कर्ण ते चाक उपसून काढण्याचा यत्न करीत आहे. ]

जांघिल : ( प्रवेश करीत-रक्तानं माखलेला ) महाराज—स्वामी—

कर्ण : कोण जांघिल? जांघिल, तिथेच उभा रहा. माझ्याजवळ येऊ नकोस. शत्रू या स्थळावर बाणांचा आणि अस्त्रांचा वर्षाव करीत आहे! भावाच्या पराजयानं संतप्त झालेला अर्जुन तीन वेळा सिंहासारखा माझ्यावर तुटून पडला. तीन वेळा मी त्याला लीलेनं मागं परतवलं आहे. पण पृथ्वीनं

पांडवांचा पक्ष घेऊन माझ्या रथचक्राचा अधाशीपणानं घोट घेतला आहे. शल्यमहाराज माझी सेना घेऊन शत्रूला अडविण्यासाठी अग्रभागी गेले आहेत! पण—जागेवरचा मारा कमी झालेला नाही. हे चक्र बाहेर निघेपर्यंत कुणीही माझ्याजवळ येऊ नका—

**जांघिल** : महाराज, मला आता मृत्यूची भीती उरलेली नाही!

**कर्ण** : म्हणजे?

**जांघिल** : स्वामी, मी अगोदरच मेलो आहे, मेल्यासारखाच आहे! सात्यकीशी लढताना त्याचे बाण लागून माझ्या छातीची चाळणी झाली आहे. फुटून गेली आहे ती! पण महाराज, मी आनंदात आहे! सात्यकीच्या सेनेचा चुराडा करून मी मरता मरता त्यालाही पिटाळून लावलं आहे! आपल्या अंगावर तो चढाई करू पहात होता. म्हटलं जांघिलाच्या प्रेतावर पाय ठेवल्याशिवाय तुला कर्णराजांपर्यंत पोचता यायचं नाही—! महाराज, आपल्यासारख्या देवमाणसाची सेवा करण्याचं भाग्य मला लाभलं! भाग्याचं जीवन लाभलं, आता भाग्याचं मरण मिळतं आहे! आता एकदा आपल्या पायांवर—आपल्या पायांवर—

**कर्ण** : ( पुढे जाऊन ) पायांवर? जांघिला, अरे खरी देवमाणसं तुम्ही! किती सहजपणानं, किती उदारपणानं तुम्ही जिवाचं दान देता! ये मित्रा, तुझी जागा माझ्या हृदयाजवळ आहे. पायाशी नाही!

[ दोघेही भेटतात. ]

**जांघिल** : महाराज, मी धन्य झालो. शेवटची एक विनंती आहे. आग्रहाचं मागणं आहे.

**कर्ण** : कोणती विनंती– कसलं मागणं?

**जांघिल** : आपण विरथ झाला आहात. आपण ताबडतोब माघारी जा. या ठिकाणी चाक उपसून काढण्याच्या नादामध्ये राहू नका! अर्जुन पुन्हा आपल्यावर चढाई करण्याच्या तयारीनं येत आहे. पण अजून वेळ आहे!–आपण विरथ, निःशस्त्र आहात ही वार्ता सर्वत्र पसरली आहे. धर्माधर्माची तमा न बाळगता अर्जुन आपल्यावर निकराचा हल्ला केल्याशिवाय राहणार नाही! म्हणून आग्रहाचं सांगणं आहे, आपल्या आवडत्या सेवकाचा शेवटचा हट्ट आहे. आपण परत जा— आपण परत जा—

**कर्ण** : ज्या मागण्या पुऱ्या करता येत नाहीत त्याच ऐकायचं सध्या कर्णाच्या नशिबी आलं आहे !

**जांघिल** : स्वामी, मला जास्त बोलवत नाही– आपण परत जा––

**कर्ण** : ( हसतो. ) परत जाऊ ? आणि परत जाऊन काय करू ? जांघिला, तुझी छाती फुटली आहे, माझं कपाळ फुटलं आहे ! मी लढतो आहे खरा. पण मला काहीही सुचत नाही, उमजत नाही. माझी शस्त्रविद्या देखील मला आठवेनाशी झाली आहे. पण आता माघारी जाणं शक्य नाही !

**जांघिल** : महाराज, माझी शपथ आहे ! आजपर्यंत आपल्याजवळ कधी काही मागितलं नाही. हे एकच मागतो आहे. युद्ध अजून आपल्या बाजूचं आहे. आपण जिवंत राहाल तर कौरवांच्या पक्षाचा, आपल्या पक्षाचा, निश्चितच विजय होईल––

**कर्ण** : आपला पक्ष ? कोणता पक्ष माझा ! जांघिल, माझा पक्ष कोणता याचीच मला भ्रांत पडली आहे. शेजारी मित्र आहेत. आणि समोर भाऊ आहेत– कोणता पक्ष माझा ?

**जांघिल** : महाराज, आपण हे काय बोलत आहात ? आपण बेचैन आहात, उद्विग्न आहात, आपण शिबिरात माघारी जा––

**कर्ण** : नाही, जांघिल, वीराचं मस्तक तुटलं तरी त्याचा नुसता हात क्षणभर शस्त्र परजीत राहतो. लढणं हाच एक कर्णाचा धर्म आहे. या धर्मापासून मी परावृत्त होणार नाही. आणि कशासाठी होऊ ? मला प्रकाश दिसतो आहे तो फक्त मृत्यूच्या दिशेलाच. मी लढता लढता मरेन. माझ्या मित्राच्या ऋणाची भरपाई करता करता मरेन. एवढं चाक मात्र––

**जांघिल** : महाराज, हे चक्र रथाचं नाही, दुर्दैवाचं चक्र आहे ते ! – आपण नाही ऐकत– महाराज, आपला निरोप घेतो मी. परमेश्वर आपल्याला– ( मरतो ).

**कर्ण** : जा, जांघिल, सुखानं जा – होय, तू म्हणालास ते खरं आहे ! हे चक्र दुर्दैवाचंच आहे, क्षमाशील, सर्वांना पोटाशी धरणारी म्हणून या धरित्रीचा लौकिक– पण तीही कर्णाशी वैर धरून त्याचा घात करायला सिद्ध झाली !

[ दूरवर अस्त्रांचा लखलखाट दिसतो व रथांचा आवाज ऐकू येतो.]

**कर्ण** : नाही ! मी असा पराभव पत्करणार नाही ! हे रथचक्र बाहेर निघालं तर अजूनही मी पार्थाचा वध केल्याशिवाय राहणार नाही ! पार्थाचा––

कुंतीच्या आवडत्या अर्जुनाचा वध ! अर्जुनाला मारून तू आईच्या समोर गेलास तर ती तुला जवळ करील का ? कर्णही तिचा मुलगा असला तरी तो दुरावलेला आहे—— अर्जुन तिच्या पदराखाली वाढलेला— अर्जुनाचं दुःख तिला अधिक होईल— पण मी राजेश्वराला वचन दिलं आहे— कुंतीच्या अश्रूंची मी कदर करणार नाही.

[ चाक उपसू लागतो. रथांचा आवाज जवळ ऐकू येतो. शंखांचे रणवाद्यांचे आवाज ऐकू येतात.—— बाणांचा व अस्त्रांचा वर्षाव होतो, रंगभूमीवरील प्रकाश अंधुक होत जातो. ]

कर्ण : आला ! — माझा भाऊ— माझा पराक्रमी शत्रू जवळ येऊन ठेपला ! ( मोठ्याने ) थांब अर्जुना, एक घटकाभर थांब ! तू वीर आहेस, कुंतीचा मुलगा आहेस ! तू शत्रूवर अधर्मानं आघात करणार नाहीस !— थांब, मी संकटात आहे ! मी तुला भ्यायलो नाही. कर्ण कुणालाही भिणार नाही — पण हे चाक वर निघेपर्यंत मला अवसर दे— मला रथारूढ होऊ दे— मला सशस्त्र होऊ दे—अर्जुना, अधर्मानं लढू नकोस——

[ रंगभूमीवर पूर्ण काळोख होतो. त्या काळोखात शस्त्रास्त्रांच्या प्रकाशरेषा विजांप्रमाणे लखलखतात. ]

कर्ण : थांब, अर्जुना, तुझ्या वीर वृत्तीला लांछन लावू नकोस——

[ **एक आवाज** : ( सहास्य ) अर्जुना ! हीच वेळ आहे ! हा कर्ण धर्मयुद्धात अजिंक्य आहे ! पृथ्वीनं त्याचं रथचक्र गिळून तुला आज अखेरची संधी दिली आहे. कर, बाणांचा, अस्त्रांचा, वर्षाव कर !—— ]

कर्ण : श्रेष्ठ पांडवा, अधर्माचा आश्रय करू नकोस !

[ **एक आवाज** : अधर्म ? अधमा, आज तुला धर्माचं स्मरण झालं काय ? उन्मत्तांनो, धर्म हा शब्द उच्चारण्याची तरी तुमची पात्रता आहे काय ? हा आमचा अधर्म नाही. तुम्ही सर्पाप्रमाणं पोसलेला हा तुमचाच अधर्म आज तुमचा नाश करीत आहे ! पार्था, अस्त्रांचा वर्षाव कर !—लाक्षागृहात पांडवांना जाळण्याचं कारस्थान करताना हा धर्म तुम्हांला आठवला नाही ! द्यूता-मध्ये असत्याचा आश्रय घेताना तुम्हांला धर्माचं स्मरण झालं

नाही ! भर राजमंडळात पांचालीच्या निरीला हात घालताना तुम्ही धर्माचा विचार केला नाही ! तुम्ही पावलोपावली लाथाडलेला धर्म आता तुमचं रक्षण करील काय ? अर्जुना, कसलाही विचार करू नकोस—या सुवर्णसंधीचा फायदा घे आणि या गर्वाढ्य सूतपुत्राचा नायनाट कर ! ]

**कर्ण :** म्हाताऱ्या विधवांप्रमाणे गतगोष्टींचा डांगोरा पिटणाऱ्या वीरांनो तुम्हांला कर्णाचे प्राणच हवे आहेत ना ? घ्या, खुशाल घ्या ! हा महारथी कर्ण— हा धर्मनिष्ठ कर्ण— उघड्या छातीनं तुमच्या पुढं उभा आहे. कर्णाचा प्राण घ्या, पण कौरवांच्या अधर्माबद्दल आक्रोश करू नका ! धर्म हा शब्द उच्चारण्याचा अधिकार तुमच्यापेक्षा कौरवांनाच अधिक आहे ! कौरव अभिमानानं वागले, अधर्मानं वागले नाहीत. भीष्म, द्रोणांसारख्या श्रेष्ठ महात्म्यांचे अधर्मानं, असत्यानं खून पाडून तुम्ही जो पापाचा डोंगर रचला आहे त्यापुढं लाक्षागृहाच्या आणि द्यूताच्या शेळपट गोष्टींची काय कथा ? आई ग-मारा, कर्णालाही अधर्मानंच मारा ! कर्णाचा पराभव फक्त अधर्मच करू शकेल ! दुर्योधना, मी तुझ्यासाठी—आई ! मारा-मारा—हाय !—

[ रथाजवळ कोसळून पडतो. रंगभूमीवर एकदम पूर्ववत् प्रकाश पडू लागतो. पडद्यात कोलाहल : पडला ! कर्ण पडला !— महारथी कर्णाचा निःपात झाला !—शाबास पार्था, शाबास ! शाबास कर्णा, वीरासारखा लढलास—पूर्ण प्रकाश. एका बाजूने कुंती धावत येते व कर्णाचे मस्तक मांडीवर घेते. दुसऱ्या बाजूने भीम, अर्जुन व नकुल प्रवेश करतात. ]

**कुंती :** बाळ, मी तुझ्यासाठी धावत आले होते रे ! पण उशीर झाला !

**भीम :** महारथी कर्णाचा निःपात झाला ! कौरवांचा सेनापती, कौरवपक्षाचा आधारस्तंभ कोसळून पडला !आई, तू इथं रणांगणावर कशी ? आणि हे काय ?

**कुंती :** भीमा, कौरवांचा सेनापती गेला नाही, दुर्योधनाचा मित्र गेला नाही ! माझा कर्ण गेला ! माझा मुलगा गेला ! भीमा, अर्जुना, तुमचा थोरला भाऊ गेला रे !

**अर्जुन :** थोरला भाऊ ? काय म्हणतेस आई हे ?

कुंती : होय, थोरला भाऊ ! मीच त्याचा जन्मापासून त्याग करणारी, त्याची हरपलेली आई. मीच चांडाळणीनं त्याला जन्म दिला ! आणि आज त्याला मरणही दिलं !

कर्ण : आई, तू सर्वांना सांगितलस ? मी थोरला भाऊ हे पांडवांना सांगितलंस आई-आई-माझ्यासाठी तुला किती यातना भोगाव्या लागल्या असतील ग ! माझ्या आईला मी दुःखी-कष्टी केलं हे एवढं एकच दुःख मला आहे, बाकी काही नाही—

कुंती : बाळ, माझं सारं दुःख या क्षणाला नाहीसं झालं आहे ! तुझ्यासारख्या महावीराला मी जन्म दिला एवढंच समाधान, एवढाच अभिमान शिल्लक राहिला आहे आता. जा, लाडक्या, सुखानं, शांततेनं जा बरं ! कसलंही दुःख मनांत ठेवू नकोस. या दांभिक जगात तुझी मानखंडना झाली. तुला अघोर आपत्ती सोसाव्या लागल्या. पण कुरुक्षेत्रातील कोणत्याही वीराला लाभणार नाही असं पुण्य तुझ्या पदराशी आहे. स्वर्गाच्या वेशीमध्ये उभा राहून प्रत्यक्ष परमेश्वर तुझी वाट पाहात असेल. बाळ, माझे– तुझ्या आईचे अखेरचे आशीर्वाद घेऊन जा—

कर्ण : अमृताचा–अमृताचा अभिषेक होत आहे माझ्या अंतःकरणावर ! साऱ्या जखमा भरून गेल्या. सगळ्या वेदना नाहीशा झाल्या ! आई, मी सुखानं जातो आहे. अशा सुखाच्या मरणासाठी दुःखानं भरलेली शंभर आयुष्य पत्करायला मी तयार आहे. आई, माझ्या वैऱ्यांकडून मी मारला गेलो नाही. कोणताही शत्रू मला पराभूत करू शकला नसता. मला माझ्या भावांनी-माझ्या लाडक्या पराक्रमी भावांनी मारलं ! त्यांना म्हणावं, हे कळल्यावरती दुःख करू नका !

अर्जुन : दुःख करू नका ! आई, काय झालं माझ्या हातून हे ? कुरुक्षेत्रावरील हा सर्वश्रेष्ठ वीर, हा महारथी कर्ण, हा अलौकिक महात्मा आमचा भाऊ आणि या करंट्या हातांनी मी त्यांचा वध केला, आणि तोसुद्धा अधर्मानं ! आई, हे आधी का नाही सांगितलंस ?

भीम : मातृहत्येचं पातक पत्करूनसुद्धा या गदेनं तुझ्या मस्तकाचा चुराडा करून टाकावा असं वाटतय मला !

अर्जुन : दादा–

**भीम** : काय केलंस हे ! हा कर्ण आमचा भाऊ आहे हे अगोदर ठाऊक असतं तर साऱ्या पृथ्वीचं राज्य मिळवून ते आम्ही त्याच्या पायावर वाहिलं असतं; नाही—पृथ्वीच्या राज्यावरही लाथ मारून आम्ही त्याच्या पायाची सेवा करीत बसलो असतो !

**कर्ण** : भीमा, अर्जुना; आपल्या आईला कुणीही काही टाकून बोलू नका ! दुःखाचा डोंगर तिनं— आयुष्यभर छातीवर बाळगला आहे ! तुम्ही कोणीही कष्टी होऊ नका. मला तुमच्या हातून मरण येत आहे हे माझं मोठं भाग्य आहे. शेवटी-अगदी शेवटच्या घटकेला का होईना, पण माझी आणि भाग्याची गाठ पडली. माझ्या आईच्या मांडीवर मी पडलो आहे— माझे लाडके भाऊ माझ्याजवळ उभे आहेत ! आई— आई— जातो मी— माझा दुर्योधन कुठे आहे ? त्यानं मला जन्मोजन्मीचं ऋणी केलं आहे— त्याला माझे प्रणाम सांगा— आई, मी तुझा मुलगा— तुझा कर्ण—

[ मरतो. ]

**कुंती** : कर्णा ! माझ्या बाळा—

[ पडदा. ]

IRBK-0122684